नागपूर महानगरपालिकेच्या दि. 20.02..2018 मंगळवार रोजी दुपारी 12–25 वाजता राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 37 | क | नंदा शरद जिचकार | महापौर |
| 2. | 20 | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | उपमहापौर |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| 6. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 7. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 8. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 9. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 10. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 11. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 12. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 13. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 14. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 15. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 16. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 17. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 18. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 19. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 20. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 21. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 22. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 23. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 24. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 25. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 26. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 27. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 28. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 29. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 30. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 31. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 32. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 34. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 35. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| 36. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 37. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| 38. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 39. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 40. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |
| 41. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 42. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 43. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 44. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 45. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 46. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 47. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 48. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 49. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 50. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 51. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 52. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 53. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 54. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 55. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 56. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 57. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 58. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 59. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 60. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 61. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 62. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 63. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 64. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 65. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 66. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 67. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 68. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 69. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 70. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 71. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 72. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 73. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 74. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 75. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| 76. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |
| 77. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 78. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 79. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| 80. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 81. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 82. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 83. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 84. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 85. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 86. | 23 | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 87. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 88. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 89. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 90. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 91. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 92. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 93. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 94. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 95. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 96. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 97. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 98. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 99. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 100. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 101. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 102. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 103. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 104. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 105. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 106. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 107. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 108. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 109. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 110. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 111. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 112. | 30 | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्य |
| 113. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 114. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 115. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 116. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 117. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 118. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 119. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 120. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 121. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 122. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |
| 123. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 124. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 125. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 126. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 127. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 128. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 129. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 130. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 131. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 132. | 35 | अ | संदिप रमेश गवई | सदस्य |
| 133. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 134. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 135. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 136. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 137. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 138. | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 139. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 140. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 141. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 142. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 143. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 144. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |
| 145. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| 146. | मानद सदस्य | | मा.श्री. अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| 147. | मानद सदस्य | | मा.श्री.वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| 148. | मानद सदस्य | | मा.श्री.गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| 149. | मानद सदस्य | | मा.श्री.किशोर दामोदरराव जिचकार | सदस्य |

अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 2. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 3. | 14 | अ | शिल्पा ईशांत धोटे | सदस्या |
| 4. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| 5. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 6. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 7. | मानद सदस्य | | मा.श्री.पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |

उपस्थित अधिकारी
श्री.अश्विन मुदगल, निगम आयुक्त
श्री.हरिश दुबे, निगम सचिव

महापौरः— सर्वांचे स्वागत आहे. सभेची कार्यवाही सुरू करण्यात येते.

ठराव क्रमांक 167 :— मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले व सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

अभिनंदन प्रस्ताव

राजेश चरपे/ललेन्द्र करवाडे/रवि गजभिये/
योगेश चिवंडे/राजेश भिलकर

संविधान फाउंडेशन नागपूरच्या वतीने दै.सकाळ चे पत्रकार श्री. राजेश चरपे, दै. नवभारत चे पत्रकार श्री. ललेन्द्र करवाडे, दै. महाराष्ट्र टाईम्स चे पत्रकार श्री. रवि गजभिये, दै. भास्करचे पत्रकार श्री. योगेश चिवंडे व दै. पुण्यनगरीचे पत्रकार श्री. राकेश भिलकर यांना “डॉ. भिमराव रामजी आंबेडकर संविधान सन्मानाने” गौरविण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा सर्वांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सत्यपाल महाराज

सातव्या अखिल भारतीय महाराठी संत साहित्य संमेलनात पहिला संत चोखामेळा पुरस्कार मुख्यमंत्री श्री.देवेन्द्र फडणवीस यांच्या हस्ते सुप्रसिध्द सप्त खंजीरी वादक समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांना प्रदान करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

अथ तिवारी

फेडरल बँक, महाराष्ट्र टाईम्स आणि टाईम्स ऑफ इंडीयाच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे नुकत्याच झालेल्या “स्पीक फॉर इंडिया” च्या अंतिम स्पर्धेत माजी स्थायी समिती सभापती व ज्येष्ठ नगरसेवक श्री. दयाशंकर तिवारी यांचे सुपुत्र अथ तिवारी यांना सर्वश्रेष्ठ वक्ता म्हणून शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांचे हस्ते प्रथम पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

अनुप देशमुख/पूनम कडव/कमलेश लांजेवार
प्रतिमा बोंडे/पीयूश आकरे/अशोक पाटील

क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या ‘शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार’ बुध्दीबळातील आंतरराष्ट्रीय मास्टर अनुप देशमुख, आंतरराष्ट्रीय हॅण्डबॉलपटू पूनम कडव, दिव्यांग खेळाडू कमलेश लांजेवार, प्रतिमा बोंडे यांच्यासह स्केटर्स पीयूश आकरे व आटयापाटया खेळाच्या प्रगतीसाठी प्रयत्नरत अशोक पाटील यांना जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

प्रवीण देशपांडे

मूळ नागपूरचा व हल्ली स्केटिंग क्षेत्रात पुणे येथे कार्यरत प्रवीण देशपांडे या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या स्केटरला महाराष्ट्र शासनाने प्रशिक्षक गटातून मानाचा छत्रपती पुरस्कार घोषित केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौरः— सन्माननिय सदस्य सभेच्या कार्यवाहीला सुरुवात करीत आहे. प्रश्नोत्तराचा तास सुरु करीत आहे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, मी एक प्रश्न टाकला होता, तो प्रश्न या विषयपत्रिकेमध्ये का नाही आला, कारण की अत्यंत चांगला असा विषय होता. या देशाचे पंतप्रधान आदरणिय नरेंद्रजी मोदी यांनी लोकांना पकोडयाचा व्यवसाय करण्याकरीता एक चांगले माध्यम आहे आणि त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवुन नागपूर महानगरपालिकेने शहरातील हजारो बेरोजगारांना पकोडयाचा व्यवसाय करण्याकरीता जागा उपलब्ध करुन दयावा असा तो विषय होता आणि तो विषय विषयपत्रिकेमध्ये का घेण्यात आला नाही त्या संदर्भात माहिती दयावी.

महापौर :— निगम सचिवांनी उत्तर दयावे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, आजच्या सभेकरीता 13 प्रश्न आले होते आणि यामधुन आपल्याला सभेच्या कामकाजाच्या नियमावलीनुसार फक्त 10 प्रश्न चर्चेकरीता विषयपत्रिकेवर घ्यायचे बंधन असल्याकारणामुळे आपण पहिले आलेले 10 प्रश्न हे घेतलेले आहे आणि सन्माननिय सदस्य यांचा जो प्रश्न आहे तो 12 तारखेला 13 नंबरवर आला असल्याकारणामुळे तो प्रश्न घेतला असुन त्याचे उत्तर मा.आयुक्तांच्या माध्यमातुन त्यांना देण्यात आले आहे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, लहानसा विषय आहे. एका लाईनमध्ये उत्तर येवु शकते, की येथील बेरोजगारांना महानगरपालिकेतर्फे पकोडयाचा व्यवसाय करण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात.

महापौर :— आयुक्तांनी या संदर्भात लेखी उत्तर आपणांस दिलेले आहे.

प्रश्न क्र 66ः— अतिक्रमण अनधीकृत बांधकामाच्या नस्त्या झोनसहीत कुठल्या तारखेला विभागात आल्या व त्यावर कुठल्या तारखेला कार्यवाही करण्यात आली का,? संदर्भात प्रश्न

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, जो या विभागाचा विभाग प्रमुख म्हणजे उपायुक्त आणि त्याचा वरच्या स्तरावरचा अधिकारी असेल त्यांनी नियमाप्रमाणे उत्तर दयावे. मा.महापौरजी मला 3 उत्तर मिळाले आहे. आज एक सभागृहात मिळाले, एक मला माहितीच्या अधिकारात उत्तर मिळाले ते हे आहे. सकाळी पाटील साहेबांनी

मला त्याचे अपग्रेड व्हर्जन आणुन दिले ते तिसरे, जे मला सकाळी पाटील साहेबांनी उत्तर आणुन दिले त्यामध्ये सांगण्यात आले की 515 फाईल आहे त्यापैकी 15 नस्तीवर कारवाई झाली आणि 500 नस्तीवर कारवाई झालेली नाही. ही त्याची पुर्ण यादी आहे. मला प्रशासनाला विचारायचे आहे. अतिक्रमण विभागाकडुन कशी कारवाई होते या संदर्भात माहिती दयावी.

उपायुक्त (श्री.मोहिते):— मा.महापौरजी, झोनमधुन नस्ती आल्यानंतर सर्वप्रथम अतिक्रमण विभागाकडे जाते आणि त्या विभागामध्ये जे उपलब्ध कर्मचारी आहेत त्याप्रमाणे त्यामध्ये प्रायरिटी ठरवुन पुढील कार्यवाही केली जाते.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, प्रायरिटी कोण ठरविते, समजा 1 तारखीला 1 नस्ती आली आणि दुसरी नस्ती 2 तारखेला आली. पहिले कारवाई 1 तारखेच्या नस्तीवर होते की 2 तारखेच्या नस्तीवर होते.

उपायुक्त (श्री.मोहिते):— मा.महापौरजी, 1 तारखेच्या नस्तीवर होते.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, असे होते काय? 1 तारखेला आलेल्या नस्तीवर पहिल्यांदा कारवाई आणि 2 तारखेला आलेल्या नस्तीवर दुसऱ्यांदा कारवाई अशी प्रॅक्टीस महानगरपालिकेमध्ये होते काय? त्यातील नियम, अटी शर्ती, निकष, कायदा काय आहे ते सांगावे

उपायुक्त (श्री.मोहिते):— मा.महापौरजी, नियम किंवा निकष म्हटल्यापेक्षा ही प्रचलित पध्दतीनुसार कारवाई व्हायला हवी.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, अशा प्रकारे प्रचलित नियमांव्दारे कारवाई नसेल झाली तर अशा अधिका—यांवर महानगरपालिका किंवा प्रशासन काय कारवाई करेल? मी कोर्ट केस संदर्भात बोलत नाही, जी क्लीअर केस आहे त्या संदर्भात मी बोलत आहे. एक नस्ती 1 तारखेला आली दुसरी नस्ती 2 तारखेला आली आणि तिसरी नस्ती 3 तारखेला आली, 3 तारखेला आलेल्या नस्तीवर पहिले कारवाई झाली आणि 1 तारखेवर झाली नाही.

उपायुक्त (श्री.मोहिते):— मा.महापौरजी, यामध्ये दोषी आढळल्यास त्यावर कारवाई करण्यात येईल,

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, या संदर्भात तुम्ही फाईल तपासा, पुर्ण नियम पाहुन मग कारवाई करा परंतु काय कारवाई होणार आहे ते सांगा. मी या संदर्भात सांगतो की ज्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई व्हायला पाहिजे त्यावर 6/6 महिने कारवाई झालेली नाही. मग एखादी केस नेहरुनगरची असेल, एखादी केस गांधीबागची असेल, आणि 500 फाईल प्रलंबित आहे. हे तुमचे उत्तर आहे माझे नाही. 515 फाईल आल्या त्यातील 15 वर कारवाई झाली आणि 500 फाईलवर कारवाई नाही झाली हे तुमच्या विभागाने उत्तर दिले आहे. त्यामुळे मला येथे काय कारवाई अपेक्षित आहे ते मला सांगा नियमानुसार व एम.एम.सी. ॲक्टनुसार, व कायद्याच्या बाहेर काहीच करु नका, तुम्ही सांगु शकत नसाल तर मा.महापौरजींना माझी विनंती आहे की मा. आयुक्तांनी सांगावे.

निगम आयुक्त :— मा.महापौरजी, झोनमधुन अतिक्रमन विभागाकडे ज्या काही नस्ती येतात त्याची प्रायरिटी झोनकडुन ठरवुन दिली जाते. त्यानंतर अतिक्रमन विभागामार्फेत देखील त्याची प्रायरिटी ठरविली जाते. अतिक्रमन विभाग प्रायरिटी ठरवितांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेला मनुष्यबळ, पोलीसची उपलब्धता, न्यायालयाचे आदेश किंवा इतर काही महत्वाचे जर अतिक्रमण असेल तर ते काढण्याच्या दृष्टीकोणातुन प्रायरिटी आपण ठरवित असतो. ही वस्तुस्थिती आहे की झोनमधुन जे काही फाईल्स् अतिक्रमण विभागाकडे आलेली आहे त्यांची संख्या 515 आहे आणि त्यापैकी 15 नस्तीवर कारवाई झालेली आहे असे अतिक्रमण विभागाने म्हटलेले आहे. याची तारीखवार माहिती प्रश्नाच्या उत्तराच्या स्वरुपामध्ये आपण दिलेली आहे. तारीखवार माहिती जर आपण पाहिली तर 2008 पासुन 2018 पर्यतच्या फाईल्स वेगवेगळया झोनच्या अतिक्रमण विभागाकडे प्राप्त झालेली आहे. यामध्ये प्रायरिटी ठरवितांना जसे मी मघाशी म्हटले की झोनची प्रायरिटी आणि अतिक्रमण विभागाकडे उपलब्ध असलेला मनुष्यबळच्या प्रायरिटीच्या आधारावर इतर काही एक्सीजन्सी असेल त्या आधारावर प्रायरिटी ठरविली जाते. तर प्रायरिटीप्रमाणे त्या ठिकाणी काम झाले नसेल तर नियमाप्रमाणे तपासुन जे काही प्रशासकीय अनुशासनात्मक नियम आहे त्यामध्ये ज्या वेगवेगळया तरतुदी आहे शिक्षेच्या संदर्भात त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, जे आपण प्रायरिटी ठरवितो याचे काही निकष असतील, माझे क्लीअर

म्हणणे आहे की, कोर्ट इतर गोष्टी या सर्व वगळुन मी म्हणत आहे. कोर्टाचे मॅटर असेल तर कोणी म्हणुच शकत नाही की तुम्ही कारवाई करा. या सर्व गोष्टी सोडुन जी क्लीअर फाईल आहे प्रत्येक झोनची जी फाईल पहिल्यांदा आली तीच्यावर पहिल्यांदा कारवाई व्हावी असा नियम आहे परंतु आपल्या महानगरपालिकेत तसे होतांना या 500 फाईलमध्ये दिसत नाही. त्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की या संदर्भात आयुक्तांनी चौकशी करावी आणि चौकशीअंती जर अधिकारी दोषी आढळला तर त्यांनी त्यांच्या रिपोर्टमध्ये त्यांच्यावर कारवाई करुन सभागृहाला कळवावे असा आदेश आपण दयावा.

महापौर :– आयुक्तांनी आता उत्तर दिलेले आहे. (बेल)

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी माझा उपप्रश्न असा आहे की 500 अतिक्रमण धारकांवर कारवाई झालेली नाही मनुष्यबळ नसल्यामुळे ही कारवाई करण्यासाठी आपल्याला किती मुनष्यबळ लागेल आणि किती कालावधी पर्यत आपण ही कारवाई करु शकणार आहे या संदर्भातील माहिती दयावी.

महापौर :– मा.सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे अतिक्रमण विभागाकडुन नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावयास पाहिजे परंतु असे न होता सहा–सहा महिने फाईल जागेवरुन हलत नाही यावरुन प्रथमदृष्टया असे लक्षात येते की मानसिकरित्या तयार होवुन गैरवाजवी तडजोड करुन ही यंत्रणा अतिक्रमण विभागाव्दारे राबविण्यात येत आहे. म्हणुन प्रत्येक नस्तीची तपशीलवार तपासणी करुन केलेल्या कार्यवाही बद्‌दल संपुर्ण चौकशी करुन आयुक्तांनी संबंधितांवर कार्यवाही करावी.

प्रश्न क्र 67:– नागपूर शहरातील म.न.पा. सफाई कामगारांच्या मस्टरवर घेण्यात येत असलेल्या बोगस हजेरीबाबत तसेच प्र.क्र. 3 मध्ये दि. 16.11.2017 ते 13.12.2017 या कालावधीत हाजरी स्टॅन्डवर मस्टरवर घेतलेल्या चौकशी संदर्भात प्रश्न.

श्रीमती.नसीम बानो :– मा.महापौरजी, नागपूर शहर मे 8000 सफाई कर्मचारी है उसमे से प्रत्यक्ष रुप से 3600 कर्मचारी काम करते है। अनेक कर्मचारी काम न करते हुये वेतन ले रहे है। लेकीन प्रशासन कुंभकरन निंद ले रहा है। जनप्रतिनिधी द्वारा सभागृह मे बार बार आवाज उठाने पर भी उनकी आवाज दबाई जाती है। इसकी वजह क्या है। बोगस हाजरी द्वारा मनपा को चुना लगाया जा रहा है ।

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.सदस्यांव्दारा उठाया गया जो प्रश्न है वह बिलकुल सटीक है। मै भी उस बारे मे कई बार अधिकारी को अवगत करा चुका हुॅ। लेकीन जहा तक देखा गया की यह टोटल पक्षपात का मामला है। जिस तरीके से सफाई कर्मचारी काम करते है, उनकी जो हजेरी लगाई जाती है, उसके उपर किसी का भी ध्यान नही होता। इसके उपर विशेष ध्यान देना पडेंगा। नगरसेवक की जिम्मेदारी प्रभाग के अंदर साफसफाई रखने की है। आज तो देश के प्रधानमंत्री स्वच्छता अभियान चलाने के लिये कलम छुडवाकर झाडु हाथ मे लेने का काम करा रहे है। आप के अधिकारी हमारे पास बार–बार आते है। हमे बोलते की चलो झाडु पकडो और बताओं समाज को कि सफाई कितनी जरुरी है। ऐसे समय अपने सफाई कर्मचारी अपने प्रभाग के अंदर काम करने नही आते, इस विषय के उपर सभागृह क्या निर्णय लेंगा इसकी पुरी जानकारी दि जायें।

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, मा.नगरसेविका महोदयांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याच्यामध्ये मस्टरची चौकशी करण्यासंदर्भात आहे. आणि हा गैरहजर कर्मचा–यांसंदर्भात आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, यामध्ये माझा एक उपप्रश्न आहे की,

श्री.प्रफुल्ल गुडधे :– पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, या ठिकाणी उपप्रश्न विचारण्याची परवानगी जर मला नाकारता तर मा.महापौरजी आपण दटके साहेबांना का देता,

महापौर :– त्यांना अजुन परवानगी दिली नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी त्यांना तुम्ही परवानगी दिली पाहिजे या मताचा मी आहे. उपप्रश्न विचारण्याचा या सभागृहातील प्रत्येक सदस्यांचा अधिकार आहे. जो इतर सदस्यांना अधिकार आहे तो दटके साहेबांना सुध्दा आहे म्हणुन मा.महापौरजी आपण दटके साहेबांना परवानगी प्रदान करावी. दटके साहेबांची विनंती मान्य करा, ही विनंती करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

श्रीमती.नसीम बानो :– मा.महापौरजी, मेरे प्रभाग 3 मे संतोष परेसकर यह निरीक्षक पद पर तथा बन्सीलाल समुद्रे, जमादार पदपर कार्यरत होते हुये मनोज जुगेल यह सफाई कामगार दिनांक 13.12.2017 को सुबह 7.20

को सफाई कामगारोंके मस्टर मे लगाये गये गैरहजेरी(A) पर ओव्हर रायटींग कर खुद ही सफाई कर्मचारी की झुठी सही करते हुये पकडा गया। इस प्रकरण मे तारीख 16.11.2017 से तारीख 13/12/2017 को मस्टर कालावधी की चौकशी करने बाबत मे म.न.पा प्रशासन आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त, आरोग्य इन्हे पत्र क्र. 219/2017 ता. 26.11.2017 द्वारा अवगत कराकर चौकशी तथा कारवाई की मॉग की थी। मेरे पत्र पर क्या कारवाई की गई तथा सफाई कामगार मनोज जुगेल को मस्टर से छेडछाड करने का क्या म.न.पा. ने अधिकार दिया है ? यह प्रश्न मे भाषण द्वारा उठायी थी । तथा इस की जानकारी सभागृह को दी जाने की मांग की थी । साथ ही ऐसे गंभीर प्रकरण मे श्री मनोज जुगेल सफाई कामगार, संतोष पसेरकर निरीक्षक तथा झोन अधिकारी श्री. डी.व्ही. रंगारी झोन 9 को तत्काळ निलंबीत किया जाये यही मेरी सभागृह से विनंती की थी ।

श्री.परसराम मानवटकर :– मा.महापौरजी, दि. 13/12/2017 को मै वहापर ही खडा था उस टाईम मे दो कर्मचारी वहापर आये । 5 मिनीट मे दोनो ने हजेरी लगाई, मैने उनसे पुछा की हजेरी क्यु लगायी तो वह हजेरी लगाकर भाग गये।

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, सन्माननिय सदस्य जो प्रश्न पुछ रही है उन्हे जवाब प्रशासन से अपेक्षित है ना की सभागृह के किसी सदस्य से, उसलिये प्रशासन मॅडम को जवाब दे उसके पश्चात यदी संबंधित नगरसेवको को शिकायत है तो वह अपना विषय रखें, परस्पर चर्चा सभागृह मे ना करे, प्रशासन जवाब दे, कोई नगरसेवक यहापर जवाब न दें।

वैद्यकीय अधिकारी एस (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, तक्रारी नुसार तपासणी केल्यानंतर मा.नगरसेवक यांचे समाधान न झाल्यामुळे मा.आयुक्तांनी अतिरिक्त उपायुक्तांना चौकशीचे निर्देश दिलेले आहे त्या निर्देशाच्या निकषांप्रमाणे कारवाई करण्यात येईल, मा.सदस्यांचे म्हणणे आहे की आपले कर्मचारी कामावरुन गायब होतात किंवा गैरहजर राहतात त्या अनुषंगाने घडयाळीचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, या विभागात आपण ट्रायल बेसीसवर 12 कर्मचा–यांना घडयाळी बांधल्या होत्या त्याचाही रिपोर्ट काय आहे तेही यांनी सांगावे.

वैद्यकीय अधिकारी एस (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, 9 लोकांच्या हातावर आपण ट्रायल बेसीसवर घडयाळी बांधल्या होत्या, त्यामध्ये असे निर्देशनास आले की कुणी दोन तास, कुणी अडीच तास कामाच्या क्षेत्रामध्ये आढळले नाही.

श्री.तानाजी वनवे :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, सफाई कामगारांच्या संदर्भामध्ये अनेक मा. सदस्यांनी प्रश्न उचलले अनेक लोक घरी बसतात आणि ते कामांवर जात नाही. त्यांचे फाईव्ह स्टार बंगले,त्यांची व्यवस्था, मला नाव ही सर्वाचे माहिती आहे. अशा परिस्थितीमध्ये घर बसल्या त्यांना पगार मिळतो आणि पगाराच्या मोबदल्यामध्ये त्यांचे कमीशन संबंधित अधिका–यांना जाते या संदर्भात पुढच्या वेळी मी तुम्हाला पुराव्यासहीत माहिती देतो. किती लोक कोणत्या कोणत्या झोनमध्ये जात नाही आणि त्यांच्या हजेरी लावतात त्याची माहिति सर्व झोनल अधिका–यांकडुन आपण घ्यावी.

श्री.नरेंद्र (बाल्या) बोरकर :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, आज हा विषय येथे मांडला आहे हा प्रश्न यांचा नाही तर पुर्ण नगरसेवकांचा प्रश्न आहे. आज मी वारंवार तक्रार करतो की माझ्याकडे 200 माणसे आहे त्यामधुन 100 माणसे गायब राहतात, मी आपल्या तर्फे विनंती करतो की, याची जबाबदारी झोनल अधिका–यांची राहते त्याचबरोबर सहा.आयुक्तांना सुध्दा जबाबदारी देण्यात यावी, त्यांनी सुध्दा ते चेक केले पाहिजे. 200 सफाई कर्मचारी राहिल्यानंतरही लोकांच्या वारंवार तक्रारी येत आहे. सफाई कर्मचारी घरी बसल्या हजेरीवर सहया करतात आणि फुकटाचा पगार घेत आहे. काही लोक तर इन्स्पेक्टर किंवा जमादार यांना फोन करतात फक्त हजेरी लावण्यासाठी.

श्रीमती हर्षला साबळे :– मा.महापौरजी, प्रभाग 17 मध्ये जेवढे साफसफाई कर्मचारी काम करतात त्यांची मला माहिती देण्यात यावी.

श्री.प्रकाश भोयर :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मला या विषयासंदर्भात अजुन एक माहिती दयायची आहे जेव्हा हे परमनंट सफाई कर्मचारी आहे. तुम्हाला सांगतो मा.महापौरजी, ते स्वतः कामाला नाही येत त्यांच्या बदली तो फक्त सही मारायला येतो त्यांच्या बदली दुसरे 4 ते 5 हजारामध्ये दुसरे त्यांच्या बदल्यात ते काम करीत असतात. आज यांना जे पगार वाढले आहे 30 ते 40 हजार रुपये झाले आहे त्यांना 5000 दयायला काही हरकत नाही. जे डेलीवेजेस वाले जे कर्मचारी आहे ते ईमानदारीने काम करतात आता यानंतर

जितके लोक परमनंट आहे त्यांना परमनंट राहु दयावे आणि त्यांना रिटायर्ड होवु दयावे यानंतर नागपूर महानगरपालिकेचा जो कारभार आहे तो डेली वेजेसच्या कर्मचा–यांच्या माध्यमातुन म्हणजे ज्याला 10 ते 12 हजार ज्यांना पगार मिळतो तो 5 किंवा 6 हजार रुपये प्रत्येक कर्मचा–यांना देवु शकनार नाही.

(बेल)

श्री.राजेंद्र सोनकुसरे :– मा.महापौरजी, माझ्या प्रभागामधील स्थायी आणि अस्थायी कर्मचारी प्रभागात बरेच ठिकाणी झाडू मारतांना दिसत नाही आणि जेव्हा सकाळी मी दौरा केला असता, असे आढळले की, सर्व सफाई कर्मचा–यांची येण्याची व जाण्याच्या वेळेच्या ठिकाणी मस्टरवर सही झालेले आढळून येतात. जेवढया कर्मचा–यांनी सही केलेली असते तेवढे कर्मचारी मला दिसून येत नाही तसेच प्रभागात साफ सफाई होत नाही. अशी नागरिकांची तक्रार माझ्याकडे येत असते. सुपरवायजरला फोन केला असता, कर्मचारी सुटीवर आहे असे मला सांगण्यात येत असते व त्या तारखेला हजेरी पटलावर सही झालेली असते. यावर काय कार्यवाही करण्यात येईल या संदर्भात प्रशासनाने सांगावे.

महापौर :– सर्व सन्माननिय सदस्यांची समस्या एकच आहे त्या संदर्भात प्रशासनाने उत्तर दयावे.

वैद्यकीय अधिकारी, एस (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, आपल्या येथे सफाई कामगारांच्या वेळा सकाळी 6 ते 2 अशा आहे. मध्ये 1 तास त्यांना लंच टाईम असतो. आपण त्यांना जी वॉच देणार आहे त्यामध्ये जे कर्मचारी तेथे कार्यरत राहणार त्यामध्ये टाईमिंग येणार आहे. जेवढया वेळ ते कार्यरत राहणार किंवा काम करणार त्यावरुन त्यांचा पगार निघणार आहे.

श्री.पुरुषोत्तम हजारे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, जी घडयाळ आपण त्यांना देणार आहे त्यांनी आपल्या हाताला बांधलेली घडयाळ जर त्यांनी दुसऱ्याला दिली आणि तो घरी निघुन गेला तर टाईमिंग तर येणारच आहे.

वैद्यकीय अधिकारी, एस (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, त्या घडयाळमध्ये अशी व्यवस्था आहे की आपण त्या कर्मचा–यांशी कॉल करुन बोलु शकतो आणि त्यांचा चेहरा आपल्याला त्या घडयाळामध्ये दिसणार आहे.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, सफाई कर्मचारी हे टॅक्स विभागामध्ये काम करतात, दवाखान्यामध्ये ऐवजदार काम करतात, प्रवर्तन विभागामध्ये ते काम करतात, फायलेरिया विभाग, बाजार विभागात ते काम करतात, सिव्हील कार्पोरेशनमध्ये ते चपराशांचे काम करतात, वर्कशॉप विभाग, जलप्रदाय विभाग, शाळेमध्ये हे ऐवजदार काम करतात आणि त्यांच्यावर घडी लावतच आहे आपण त्यांच्या मृत्युनंतर त्यांना सरकारी फायदा व सोयीसुविधा त्यांना देणार आहे. त्यांच्या आरोग्याच्या विषयी काय प्रावधान आहे ते पण बघायला पाहिजे. जे स्थायी कर्मचारी आहे त्यांना आपण पुर्ण फॅसिलीटी देतो परंतु ऐवजदारांचे काय? शिकले सवरले पोरं आहे, त्यांच्याकडे चांगल्या चांगल्या डिगरी आहे, चांगल्या चांगल्या डिगरी म्हणजे त्यांच्याकडे सॅनेटरी इन्स्पेक्टरच्या कोर्सेस केले आहे, वेल्डर आहे, फिटर आहे, ड्रायव्हर आहे. काही ऐवजदार 18/18 तास काम करतात इमरजन्सीमध्ये सुध्दा आपण त्यांना पाठवितो, यांच्या संदर्भात मानवतेच्या दृष्टीकोणातुन याचा विचार व्हायला पाहिजे, लोक कमी आहे आणि काम जास्त आहे. आपण त्यांना एक साधा ड्रेस सुध्दा देवु शकत नाही, त्यांना हॅन्डग्लोज, मास्क ही दुरची गोष्ट आहे, या संदर्भात मा.महापौरजी, आपण रुलिंग दयावे.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, प्रश्न क्र 67 वर अनेकांनी आपले विचार या ठिकाणी व्यक्त केले. ऐवजदारांना चांगल्या संधी उपलब्ध करुन दयाव्यात, त्यांच्या मुलांकरीता चांगली व्यवस्था उपलब्ध करुन दयावी, या संदर्भात कुठल्याही पक्षांचा सदस्य असेल त्याला या विषयाबद्दल निश्चितच सहानुभूती आहे. हे केलेच पाहिजे परंतु हे होत असतांना नसीम बानो यांनी मांडलेला प्रश्न, तानाजी वनवे साहेबांनी मांडलेला प्रश्न, आणि इतर अन्य नगरसेवकांनी मांडलेला प्रश्न हा देखील अत्यंत महत्वाचा आहे. मा.महापौरजी, साडेचार हजार कर्मचारी असतांना चार हजार ऐवजदार असतांना या शहराचा स्वच्छता अभियानामध्ये नंबर मागे का लागतो, याचा देखील विचार या संपुर्ण सभागृहासकट प्रशासनाने करणे अत्यंत आवश्यक आहे. ही सत्य परिस्थीती आहे की, सकाळी 6 ते 2 ही वेळ आहे परंतु किती कर्मचारी खरोखर 6 वाजता येतात, हे या येथल्या सर्व नगरसेवकांना विचारा, किती कर्मचारी दोन म्हणजे दोन वाजेपर्यत काम करतात हे देखील खरोखर बघितले पाहिजे, अनेकदा असे घडले आहे झोनल अधिका–यांना ज्यावेळी लिस्ट मागतात नगरसेवक की आमच्या प्रभागामध्ये जे कर्मचारी कार्यरत आहे त्याची तुम्ही यादी दया, मी आपणाला सांगतो की अनेक झोनल अधिकारी यादी देखील पुरवत नाही. त्याच्या मागचे कारण काय आहे, माझी आपणाला विनंती आहे की या प्रश्नाच्या

निमित्ताने सभागृहामध्ये जी साधक बाधक चर्चा या विषयावरती झालेली आहे, हा विषय अत्यंत गंभीर आहे. यामध्ये जबाबदार कोण आहे हा विषय वेगळा आहे. परंतु हे होत असतांना आपण या ठिकाणी प्रशासनाला निर्देश दयावे की सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांची जे नियमीत आहे आणि जे अनियीमत आहे ज्यांची आपण ऐवजदारांची पुर्ण यादी, ते कुठल्या प्रकारचे कामे करतात, कुठल्या जागेवर काम करतात, याची संपुर्ण यादी येणाऱ्या 15 दिवसाच्या कालावधीमध्ये सर्व नगरसेवकांना देण्यात यावी आणि नगरसेवकांच्या मार्फत कोण कुठल्या भागामध्ये काम करीत आहे याची देखरेख नगरसेवक अनेकदा घेत असतात लक्षात येते की भिषण परिस्थिती या ठिकाणी सन्माननिय सदस्य श्री.प्रकाश भोयर यांनी मांडली की मी कामाला येतो फक्त सही करतो, आणि त्याच्या जागेवर काम करण्याकरीता दुसरा माणुस सबलेड करतो ही अत्यंत भीषण परिस्थती आहे. यामध्ये सर्वात जास्त नुकसान जर कोणाचे होत असेल तर तुमच्या आणि आमच्या नागपूर शहरांचे होते, ते काम करीत नाही त्यांचे पगार देतो त्यांना पगार मिळतात ते दुसऱ्यांना सबलेड करतात आणि स्वतः मात्र प्रायव्हेट ठिकाणी काम करतात त्यामुळे ही जर सर्व परिस्थिती बदलायची असेल तर कडक धोरण येणे गरजेचे आहे. माझी प्रशासनला आपल्या मार्फेत विनंती आहे की याच्यामध्ये कुठल्याही पध्दतीची हयगय बिलकुल बाळगु नये जो काम करीत असेल त्याच्या पाठीवर हात ठेवला पाहिजे परंतु जो काम करीत नसेल तर त्याच्या संदर्भात कठोर भुमिक देखील घेतली पाहिजे. आणि यामध्ये संपुर्ण सभागृह हे प्रशासनासोबत राहील की स्वच्छतेकरीता ज्या काही नविन उपाययोजना आपण करीत आहे आपण बायोमॅट्रीक केले ते किती दुर्देवाचे होते, बायोमॅट्रीक मध्ये आपण पैसा टाकला त्या बायोमॅट्रीक मध्ये वेळ यायची, त्याच्यावर पाणी पडले. त्या बायोमॅट्रीकच्या मशीन्स खराब झाल्या, आता आपण घडयाळे आणली, घडयाळमध्ये चेहरा दिसणार आहे परंतु हे होत असतांना या संपुर्ण घडयाळांचे इम्प्लीमेंटेशन करुन त्याचा रिपोर्ट योग्य पध्दतीने घेवुन प्रसंगी कठोर कारवाई करावी लागली तरी प्रशासनानी कठोर कारवाई करावी असे सक्त आदेश या प्रश्नाच्या रुपाने आपण प्रशासनाला दयावी ही मी आपणांस विनंती करतो.

महापौर :— मा.सत्तापक्ष नेता यांनी जी अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त केली आहे त्या अपेक्षाची परिपुर्तता प्रशासनाने करावी. येणाऱ्या काळामध्ये नागपूर शहरात स्वच्छ सर्वेक्षण होणार आहे. सर्व मा.सदस्यांचा पाठिंबा आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने या विभागाकडे विशेष लक्ष घालून या विभागाला एक शिस्त लावण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करावा.

प्रश्न क्र 68ः— फुटाळा चौपाटी वरील व्यापार करणाऱ्या व्यावसायिकांचा कर आकारणी कोण करतो? संदर्भात प्रश्न

श्री.किशोर जिचकार :— मा.महापौरजी, या फुटाळा तलावाच्या समोर काही वर्षापासुन एक चौपाटीचे स्वरुप आले आहे. गंमत अशी आहे मा.महापौरजी, जागा पी.के.व्ही.ची आहे त्याच्यावर बांधकाम केले एन.आय.टी. ने आणि पैसे आणखी कोणी कमवित आहे. नागपूर शहराच्या हद्दीत असल्यामुळे निश्चीतच आपण त्यांच्याकडुन टॅक्स आपण घेत असतो. पण माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला या भागाचा टॅक्स किती मिळाला याची माहिती प्रशासनाने दयावी.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने येथे एकुण 18 मिळकतीवर प्रॉपर्टी टॅक्सचे असेसमेंट झालेले आहे. आणि वार्षिक मागणी 31,14,434 रु आहे. बकाया रक्क्म 2,42,89,694 रु. आहे.

श्री.किशोर जिचकार :— मा.महापौरजी, बकाया रक्कम करीता प्रशासनाकडुन काही कारवाई केली आहे काय?

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौरजी, 7/09/2017 ला वारंट कारवाई केली आहे. वारंट कारवाईच्या दरम्यान 29 लक्ष रुपये वसुल झालेले आहे. ज्या थकबाकीदारांनी रक्कम जमा केलेली नाही त्यांच्यावर वारंट कारवाई करुन ती मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे व अटकावनी करण्यात आलेली आहे.

श्री.किशोर जिचकार :— मा.महापौरजी, माझी माहिती अशी आहे की येथे संपुर्ण फुडझोन आहे. येथे वेगवेगळया प्रकारचे व्यवसाय येथे सुरु आहे. तसेच त्यांनी कायद्याचे उल्लंघन केले आहे. आपल्याकडुन आजपर्यंत दीड ते दोन कोटी रुपयांची वसुली तेथुन बाकी आहे. आणि आपण छोटया छोटया लोकांना त्रास देत आहे. जे मोठे व्यावसायिक जे आहे त्या भागातले त्यांच्याकडे आपण टॅक्सची मागणी करीत नाही. हे किती

दिवसात आपण त्यांच्याकडुन करुन घेवु,

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौरजी, नियमानुसार पुढील रुल नं. 42 नुसार जप्तीची कारवाई केलेली आहे. त्याच्यानंतरची जी ऑक्शन प्रक्रीयाच्या संदर्भात धरमपेठ झोनच्या सहा.आयुक्तांना निर्देश देवुन ते करण्यात येईल.

श्री.किशोर जिचकार :— मा.महापौरजी, जेव्हा नागपूर शहरामध्ये एन.आय.टी. चे अस्तीत्व संपले आहे त्यामुळे तेथील बाजारपेठ आपल्या ताब्यात घेण्यासाठी आपण प्रशासनाला निर्देश दयावे.

श्री.ऋषीकेश (बंटी) शेळके :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, नाईक रोडवर सन्माननिय आमचे चिखले बंधु आहे. त्याच्या येथे एक मंतीमंद मुलांची शाळा होती, तर त्या मतीमंदाच्या शाळेमध्ये सन्माननिय प्रफुल्लजी गुडधे यांना माहिति आहे तो विषय, त्या मतीमंदाच्या शाळेला आपण तेथे सिल लावले आहे. हजार फुटाची शाळा होती, किरायाची शाळा होती, जवळजवळ साडेचार ते पाच लाख रुपये आपण त्यांना टॅक्स पाठवित आहे. दुर्भाग्य असे आहे नागपूर शहराचे आणि शोकांतिका सुध्दा आहे नागपूर महानगरपालिकेची की मतीमंदाच्या शाळेने कर नाही भरला म्हणुन आपण मतीमंदाच्या शाळेला सिल लावले तेथे एकुण 108 मुले त्या शाळेत आहे. भांडे चौकात शाळा आहे त्यांना तेथे सुध्दा आपण त्यांना नोटीस बजावली आहे. माझे म्हणण्याचे तात्पर्य ऐवढेच की आपण लहान लहान मतीमंदाच्या शाळेला तेथे जर सिल लावुन राहिलो आपण जाऊन बघा तेथे, सन्माननिय पाटील साहेबांना सुध्दा माहिती आहे. तर जे लोक तेथे पैसे कमवित आहे त्या लोकांवर आपण कारवाई करीत नाही आणि मतीमंदाच्या शाळेला आपण सिल लावत आहे, ही शोकांतिका आहे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौर महोदया, चालु आर्थिक वर्षात जे काही थकबाकीदार आहे सगळया थकबाकीदारांवरती आपण कारवाई सुरु केल्या आहे. हे प्रथम वर्ष आहे की या वर्षात मालमत्ता विक्रीला काढली आहे. सर्वांवरती कारवाई होईल कोणालाही स्पेअर दिला जाणार नाही. नियमानुसार कारवाई करण्यात येईल. जर मतीमंद शाळा जरी थकबाकीदार असेल तर नियमानुसार त्यांच्यावर कारवाई होणार.

श्री.ऋषीकेश (बंटी) शेळके :— मा.महापौरजी, त्यांनी वारंवार आपल्याकडे विनवण्या केल्या तरी सुध्दा आपण त्या लोकांचे ऐकले नाही.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, ज्या संबंधित एजन्सीने हे टेन्डर काढले होते त्या एजन्सीची माहिती घ्यावी, ते शुध्द अतिक्रमण आहे. त्यामुळे आयुक्त साहेबांनी प्रशासनाच्या माध्यमातुन याची माहिती काढुन ते शुध्द अतिक्रमण आहे, ते टेन्डर संपले आहे. एन.आय.टी. कारवाई नसेल करत तर आपल्या माध्यमातुन कारवाई करुन ती जागा आपण ओपन केली पाहिजे. ते ना टॅक्स देत ना त्यांना आपण सिज करतो, ते एन.आय.टी. ने टेन्डर काढले आहे त्यावर लोक पैसे कमवित आहे. ते कचरा उचलत नाही आपले लाईट वापरतात, त्यामुळे याच्यावर आपल्या प्रशासनानी निट एन.आय.टी कडुन माहिती घेवुन उर्वरित कारवाई करावी.

निगम आयुक्त :— मा.महापौरजी, फुटाळा चौपाटीच्या अनुषंगाने यापुर्वी माहिती घेण्यात आली होती. या ठिकाणी फुड झोन एन.आय.टी मार्फत बी.ओ.टी. तत्वावर चालविण्याचे एन.आय.टी. ने करार केला होता. ज्यावर काही वाद सद्यस्थितीमध्ये न्यायालयामध्ये चालु आहे. परंतु महानगरपालिकेच्या अधिकाराच्या बाबतीत मा.सदस्य श्री किशोर जिचकार यांनी विचारले आहे की, यावर महानगरपालिकेचा हक्क कोणता आहे तर हक्काच्या संदर्भात शहरातील जेवढया काही मालमत्ता आहे त्याच्यावर टॅक्स लावण्याचा हक्क महानगरपालिकेचा आहे. त्या अनुषंगाने ज्या काही मिळकती तेथे आहे त्यावर 31 लाख रुपयांचा चालू टॅक्स लावण्यात आला आहे. याशिवाय 2 कोटी 42 लक्ष रुपयांची जुनी थकबाकी आहे. ते वसुल करण्याच्या दृष्टीकोणातुन काही पाऊले उचलली पाहिजे, म्हणजे नोटीस देणे, वारंट कारवाई करणे, ऑक्शनची कारवाई करणे, ती कारवाई आपण सुरु केली आहे आणि ती कारवाई तशीच सुरु राहणार आहे. सन्माननिय दटके साहेबांनी जो विषय उपस्थित केला एन.आय.टी ने जो करार केला आहे त्या लोकांच्या सोबत तो न्यायप्रविष्ट आहे गरज पडल्यावर आपण महानगरपालिकेच्या माध्यमातुन त्यामध्ये इंटरविन होण्याची भुमिका आपण त्यामध्ये स्वीकारु शकतो,

प्रश्न क. 69:— नागपूर महानगरपालिकेत किती कंत्राटदाराच्या कंपन्या काम करीत आहे. त्या कंपन्याचे कंत्राटदार काम करीत असलेल्या कामगारांना किमान वेजेस कामगार कायदयानुसार भुगतान करण्यात येते का? संदर्भात प्रश्न

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, आपल्या महानगरपालिकेमध्ये जे कार्मचारी ज्या संस्था काम करतात त्यांच्या कर्मचा—यांना मिनीमम वेतननुसार पगार देण्यात येतो काय या संदर्भात मी प्रश्न विचारला त्याचे उत्तर

मिळाले आहे परंतु ऑरेंज सिटी वॉटर वर्क्सच्या संदर्भात 24 तास पाणीपुरवठा होतो तेथल्या कर्मचा–यांना बरोबर वेतन मिळत नाही ब–याचशा कर्मचा–यांनी त्यांना मिनीमम वेतन मागितले म्हणुन त्यांना बंद करण्यात आले आणि ते लोक सभागृहाच्या बाहेर अनषण आंदोलन करीत आहे हा आपल्या समोर मोठा पुरावा आहे. या कंपनीमध्ये खरोखर किती लोक काम करतात आणि त्या लोकांना आपण मिनीमम वेजेस प्रमाणे वेतन देतो काय या संदर्भात माझी माहिती पक्की आहे. त्यामुळे मिनीमम वेजस प्रमाणे त्यांना वेतन देत नाही या संदर्भात कार्यालयाने उत्तर दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी या संदर्भात उपप्रश्न आहे. महानगरपालिकेतील जेवढे कर्मचारी आहे ते कंत्राटी कामगार असतील किंवा स्थायी कामगार असतील, अस्थायी कर्मचारी असतील, रोजनदारी कर्मचारी असतील या सर्वांना कुठल्या किमान वेतन कायदयान्वये किमान वेतन दिले पाहिजे या संदर्भातील शासन निर्णय झाला आहे. तो शासन निर्णय जो होता तो 24 फेबुवारी 2015 चा होता. हा शासन निर्णय महानगरपालिकेला लागु होतो किंवा नाही या संदर्भात जेव्हा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळेस तत्कालीन अति.आयुक्त श्रीमती.नयना गुंडे मॅडम, यांची अपर कामगार आयुक्त, नागपूर यांच्यासोबत चर्चा झाली. त्या अनुषंगाने 29/03/2016 ला अपर कामगार आयुक्त यांनी पत्र व्यवहार महानगरपालिकेला केला, त्यामध्ये म्हटले की सदर जे दर वर नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कायम, हंगामी तसेच सर्व कंत्राटी कामगारांना ते लागु आहे. या वरुन हे निश्चीत झाले, की महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विविध कंत्राटी कामगारांना ते दर दिले पाहिजे जे 2015 च्या शासन निर्णयाप्रमाणे जो स्थानिक स्वराज्य संस्थासाठी शासनाने निर्धारीत केलेले दर आहे त्याप्रमाणे लागु केले पाहिजे. आणि या चर्चेच्या आधारावर तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर साहेबांनी एक प्रशासनिक आदेश काढला, त्या आदेशाची तारीख आहे 2/06/2016 आणि याची प्रत सर्व विभाग प्रमुखांना आणि सहा. आयुक्तांना दिली आहे. यामध्ये त्यांनी 25 प्रकारचे नोटींग केलेले आहे. त्यांना जी कार्यवाही अवलंबवयाची आहे म्हणजे खाजगी कंत्राटदाराला एखादे काम महानगरपालिकेचे देत असतांना त्या संदर्भात कामगारांना कसे वेतन दिले पाहिजे, त्याची कार्यपध्दती काय अवलंबली पाहिजे या संदर्भात 02/06/2016 ला परिपत्रक काढले आणि त्या परिपत्रकामध्ये स्पष्ट नमुद केले आहे की महानगरपालिकेतील सर्व कंत्राटी कामगारांना 24/02/2015 च्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अनुज्ञेय राहील. या ठिकाणी सन्माननिय विरोधी पक्षनेते श्री.तानाजी वनवे साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आणि त्यांच्या उत्तराचे मी अवलोकन केले, त्यामध्ये त्यांनी म्हटले ओ.सी.डब्लु. किमान वेतन कायद्यानुसार भुगतान करण्यात येत आहे असे कळविले आहे. म्हणजे विभाग प्रमुख काय म्हणतो की, फक्त किमान वेतनाप्रमाणे देवुन राहिलो असे फक्त कळविले त्यांनी तर त्याचे मॉनेटरिंग आम्ही करतो काय ते करीत नाही. कुठल्या किमान वेतनाच्या परिपत्रकाप्रमाणे आपण वेतन देत आहे या संदर्भामध्ये विभाग प्रमुख मुद्यामपणे संधीग्धता पाळुन राहिले आहे. दुसरे सुरक्षा रक्षकांना 18,591/– रु प्रती महा वेतन देतो असे या उत्तरामध्ये नमुद आहे. आज 18,591 आपण त्यांना त्याच्या बॅक खात्याच्या माध्यमातुन देतो काय? तर यामध्ये विभागप्रमुख काहीही बोलत नाही. तिसरे संगणक ऑपरेटर 25,695/– प्रति महिना या संदर्भात माझी माहिती आहे की, 25,659 रु त्यांना त्याच्या बॅकेच्या खात्याच्या माध्यमातुन त्याच्या अकाउंटमध्ये जमा होते. आता परिवहन विभाग, परिवहन विभागाचे विभाग प्रमुख लिहीतात की उद्योग उर्जा व कामगार विभागाचे दिनांक 20/7/2010 च्या अधिसुचनेनुसार आम्ही त्यांना वेतन देय करुन राहिलो आहे. मा.महापौरजी ज्या अर्थी मा.आयुक्तांनी हे स्पष्ट केले की आपल्याला कुठल्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अनुज्ञेन आहे हे निश्चित केल्यानंतर आता ते कसे म्हणु शकतात की 20/07/2010 च्या परिपत्रकाप्रमाणे आम्ही वेतन देत आहोत. त्याही पेक्षा त्यांनी स्वतः एक पत्र दिले त्या कंत्राटदार कंपनीला की जो आपण 24 फेब्रुवारी 2015 च्या शासन निर्णयाप्रमाणे किमान वेतन सर्व ड्रायव्हर, कंडक्टर व त्यांच्या कर्मचा–यांना वेतन दिले पाहिजे असे परिवहन व्यवस्थापकांचे पत्र आहे आणि या उत्तरामध्ये कॉट्रडीक्शन आहे. तिसरे प्रकाश विभाग किमान वेतन कायद्यानुसार वेतन देत आहे. कायद्यानुसार म्हणजे कुठल्या परिपत्रकानुसार, त्यांना बॅकेच्या खात्यामार्फत चेक मार्फत किंवा ए.टी.एम. मार्फत त्यांना वेतन देण्यात येत आहे काय? त्याला मॉनेटरींग करणारी व्यवस्था आपण निर्माण करु शकलो काय? त्या संदर्भात कुठलेही उत्तर नाही. हॉटमिक्स विभागामध्ये किमान वेतन कायद्यानुसार आम्ही देवुन राहिलो ऐवढे साधे मोघम उत्तर आहे. पेंच प्रकल्पामध्ये सुध्दा तसेच उत्तर आहे. आम्ही किमान वेतन कायद्यानुसार देवुन राहिलो. मात्र माझा प्रश्न असा आहे की मा.आयुक्तांनी सर्व परिपत्रकांचा अभ्यास केल्यानंतर तत्कालीन आयुक्तांनी हा निर्णय घेतला की स्थानिक स्वराज्य संस्थासाठी जो शासन निर्णय आहे 24

फेब्रुवारी 2015 या शासन निर्णयामध्ये नमुद केलेले किमान वेतन महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या सर्व रोजंनदारी,कंत्राटी सर्व कामगारांना लागु होईल, हा निर्णय झाल्यानंतर आता विभाग प्रमुख आपल्या पध्दतीने आपल्या मताप्रमाणे वेगळा जी.आर. तेथे आणत आहे. प्रकाश विभागामध्ये वेगळा जी.आर. आहे. तुमच्या परिवहन विभागामध्ये वेगळा जी.आर. आणला, पाणीपुरवठा विभागामध्ये वेगळा जी.आर. आणला, ज्या अर्थी महानगरपालिकेमध्ये शासनानी स्पेसीफीक जी.आर. दिला आहे. या कार्यपध्दती ज्या अवलंबवयाच्या आहे त्यामध्ये 16,17,18,19,20 असे हे जे पॉइंट आहे त्यामध्ये स्पष्ट जबाबदारी फिक्स केली आहे. ती जबाबदारी विभाग प्रमुखावर आहे. तुम्हाला टेन्डर काढतांना सुध्दा किती कर्मचारी त्या कामावर इनव्हॉल होतील याची सुध्दा तुम्हाला माहिती घ्यायची आहे. त्याचे कामगार ऑफीसमध्ये नोंदणी झाली आहे की नाही, या संदर्भातील सर्व कार्यपध्दतीचा दिशानिर्देश झाल्यानंतर सुध्दा त्या कार्यपध्दतीचे सर्व विभाग प्रमुख काम करतात किंवा नाही या संदर्भात माहिती प्रशासनाच्या मार्फत दयावी.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, माझे यामध्ये क्र 1 क्र 4 सामान्य प्रशासन विभाग त्यानंतर परिवहन विभागाच्या संदर्भात परिवहन विभागाच्या कंपनीचे आर.के.सिटी बस, स्मार्ट सिटी बस सर्व्हीसेस, स्कॅनिया व्हेईकल्स् या चारही कंपन्या ज्या आहे, आज माझ्या माहिती प्रमाणे शहरामध्ये पुर्ण बससेवा बंद आहे. आणि हा गंभीर प्रश्न आहे. या कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना पगार देत नाही. किमान वेतन कायद्याप्रमाणे म्हणुन त्या लोकांनी स्ट्राईक पुकारलेला आहे. आता तो स्ट्राईक वैध आहे की अवैध आहे प्रशासनाने त्याचा विचार करावा परंतु तो अत्यंत गंभीर पध्दतीने मुलांना बसेसची व्यवस्था होत नाही. हा अत्यंत गभीर प्रश्न आहे. या प्रश्नावर त्याच्या मिनीमम वेतनप्रमाणे त्यांच्यावर आपण काय कार्यवाही केलेली आहे. दुसरे कनक रिसोर्सेस च्या संबंधामध्ये फारच गंमत आहे. कनक कंपनी सांगते की आम्ही मिनीमम वेजस प्रमाणे वेतन देतो, परंतु कनक कंपनी ज्या मानसाला कामावर लावते त्याला दोन–दोन महिने, तिन –तिन महिने फुकट काम करुन घेते आणि त्याच्यानंतरही त्याची हजेरी लावत नाही. आणि मिनीमम वेजेस प्रमाणे वेतन जर दयायचे असेल तर तेवढया दिवस त्याला अबसेंट ठेवते आणि अबसेंट ठेवल्यानंतर मग त्याला तेवढा पगार देते आणि सांगते की आम्ही त्यांना नियमाप्रमाणे वेतन देत आहे. सुपर हायजेनिक कंपनीची माहिती या मध्ये आरोग्य विभागाने दिलेली नाही. या उत्तरामध्ये जी माहिती दिली आहे ती पुर्णतः खोटी आहे. आणि इलेक्ट्रीक विभागामध्ये एकालाही मिनीमम वेजेस मिळत नाही. विद्युत विभागामध्ये जेवढे कॉट्रक्टर आहे त्यांनी दाखवुन दयावे आणि कार्यालयाने सांगावे की कोणाला आपण मिनीमम वेजेस दिले आहे. येथे अनेक कंपन्या आहे, साधना इलेक्ट्रीकल, निशांत इलेक्ट्रीकल, सोनु इलेक्ट्रीकल, दत्त इलेक्टीकल, श्री.एन्टरप्रायजेस, अमित इलेक्ट्रॉलिक असोसिएशन, बालाजी असोसिएट, हॉटमिक्समध्ये केवलरामानी आणि बेलखोडे दोनच लोकांची माहिती या ठिकाणी दिली आहे. ती माहिती अस्पष्ट आहे. वॉटर मॅनेजमेंटच्या संबंधित दिलेले आहे. मे.हेंजर बायोटेक कंपनीची जी माहिती दिली आहे ती सुध्दा खोटी दिली आहे. नरसाळा, हुडकेश्वर योजनेची जी माहिती दिली आहे ती सुध्दा खोटी आहे. सायबर टेक कंपनीचा तर सावळा गोंधळ आहे. त्यांनी कोणतेच काम बरोबर केलेले नाही. सभागृहामध्ये तर सर्व सन्मानिय सदस्य त्यावर बोलले, त्या सायबर टेक कंपनीच्या लोकांना पगार मिनीमम वेजस प्रमाणे मिळत नाही. अशी तक्रार आमच्याकडे आलेली आहे. त्यांनी सांगितले की आम्ही काम बरोबर करतो पण आम्हाला पगार बरोबर मिळत नाही. तर या सर्व गोष्टींची सखोल चौकशी करुन जे दोषी अधिकारी असतील त्याच्यावर किंवा दोषी कंत्राटदार असतील त्याच्यावर आपण कारवाई करावी, अशी मी आपणासं विनंती करतो.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, सन्माननिय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेला विषय जो आहे तो खरोखर अत्यंत महत्वाचा आहे. ज्या पध्दतीने हे प्रायव्हेट कॉटेक्टर महानगरपालिकेमध्ये काम करीत असतील आणि किमान वेतन आयोगाच्या धर्तीवर ते वेतन देत नसतील तर हे प्रिन्सीपल एम्प्लॉयर म्हणुन आपल्यासाठी गंभीर बाब आहे. त्यामुळे आपल्या मार्फत प्रशासनाला विनंती आहे की, सन्माननिय विरोधी पक्ष नेत्यांनी जे काही प्रश्न उचलले आहे त्या सर्व कंपन्याचे व प्रायव्हेट कॉटेक्टरचे जे काही वेतन आहे त्याच्यामध्ये मी देखील वाचले त्यात लक्षात असे येते की, त्यामध्ये उत्तर असे दिले आहे. उदाहरणार्थ सायबर टेक कंपनीमध्ये असे उत्तर दिले आहे की सायबर टेक कंपनीव्दारा तेथील कर्मचा–यांनी कुठलीही तक्रार केलेली नाही, तक्रार केली नाही म्हणजे काय? म्हणजे तक्रार केली नाही तर त्यांना आपण किमान वेतन आयोगाच्या खालचे वेतन आयोग दयायचे असे आपण ठरविलेले आहे काय? त्यामुळे या संपुर्ण कंपन्यांचा अभ्यास करुन अति.आयुक्त दर्जाच्या अधिका–यांनी या संपुर्ण विषयांची चौकशी करुन या कंपन्यांना बोलावुन त्यांच्याकडुन ॲफीडीव्हीड घेवुन हा संपुर्ण विषय

सभागृहाच्या पटलावर  येणा–या 30 दिवसामध्ये कालावधी मध्ये ठेवण्याचे आदेश आपण प्रशासनाला दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, माझा जो उपप्रश्न आहे 24 फेबुवारीचा 2015 चा जो शासन निर्णय आहे, तो महानगरपालिकेला लागु होतो काय ? या संदर्भात मा.आयुक्त यांची उत्तर देण्याची तयारी सुध्दा आहे.

निगम आयुक्त :– मा.महापौर महोदया, मा.विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की किती कंत्राटदार कंपनी महानगरपालिकेमध्ये काम करीत आहे. आणि त्यांना किमान वेतन कायद्यानुसार भुगतान करण्यात येतो किंवा कसे ? किमान वेतन कायद्यानुसार बंधनकारक गोष्ट आहे जर कोणताही प्रिन्सीपल एप्लॉयर किमान वेतन कायद्याप्रमाणे जर वेतनचे भुगतान करीत नसेल तर त्याला प्रॉसिक्युट केल्या जावु शकतो, त्यामुळे महानगरपालिका एकुण 30 वेगवेगळे मनुष्यबळ सेवा पुरवठादार किंवा सर्व्हीस पुरवठादार मार्फत जे सेवा देत आहे त्यांना किमान वेतन कायदा लागु आहे त्यानुसार त्यांना वेतन दिल्या जातो. या विषयाच्या अनुषंगाने दोन अधिसुचना शासनाच्या माध्यमातुन अस्तित्वात आहे. एक अधिसुचना 20/07/2010 ची अधिसुचना आहे. जी परिवहन कर्मचा–यांसाठी स्पेशल अधिसुचना आहे. दुसरी एक जनरल अधिसुचना आहे जी 24 फेबुवारी 2015 ला लागु करण्यात आलेली आहे. या अधिसुचनेमध्ये सर्व प्रकारच्या कामगारांचा उल्लेख आहे परिवहन सोडुन त्यामुळे परिवहनचे जे कर्मचारी आहे त्यांना 20/7/2010 चा किमान वेतन कायद्याची अधिसुचना आहे त्याप्रमाणे वेतनाचे भुगतान देण्याची सेवा पुरवठादार मार्फत करण्यात येतो. उर्वरित जे 23 सेवापुरवठादार आहे त्यांना आयुक्तांनी 02/06/2016 ला जे परिपत्रक काढले आहे त्याप्रमाणे 24 फेब्रुवारी 2015 च्या अधिसुचनेप्रमाणे त्यांना वेतन देण्यात येत आहे. सन्माननिय सत्तापक्ष नेता यांनी जो विषय या ठिकाणी सांगितले जे कर्मचारी वेगवेगळे सेवापुरवठादार कंपनीच्या माध्यमातुन महानगरपालिकेने सेवेसाठी घेतले आहे त्यांना किमान वेतन कायद्यानुसार त्यांना ते मिळत आहे की नाही याची खातरजमा अति.आयुक्त यांच्या माध्यमातुन करुन घेतली पाहिजे ते आम्ही खातरजमा करुन घेवु आणि पुढील सभेमध्ये त्याची रिपोर्ट आम्ही सबमिट करु.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, मा.आयुक्तांच्या उत्तरावरुन हे स्पष्ट झाले की परिवहन सोडुन बाकी सर्व कंत्राटी कामगारांना हा 24 फेब्रुवारी 2015 चा जी.आर. लागु होतो. मग आपल्या स्टारबस साठी का लागु होत नाही. स्टारबस कर्मचा–यांची जी मागणी आहे वारंवार संप होत आहे. त्यामुळे सर्व नागरिक वेठीस धरल्या जाते. या कर्मचा–यांची मागणी आहे की आम्हाला 24 फेबुवारी 2015 च्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन दयावे ते त्यांना देतात की नाही हा माझा प्रश्न आहे.

निगम आयुक्त :– मा.महापौरजी, स्टारबस चा जो वंश निमय प्रोजेक्टचा जो कॉट्रॅक्ट होता तो नेट कॉस्ट कॉट्रॅक्ट होता तो 28 फेब्रुवारी 2017 ला संपला आणि 1 मार्च 2017 पासुन ग्रॉस क्रॉस कॉट्रॅक्टच्या आधारावर स्टार बसचे एकुन 3 पुरवठादाराच्या माध्यमातुन सर्व्हीसेस सुरु केलेली आहे. जो नविन ॲग्रीमेंट केलेला आहे 1/03/2017 पासुन त्या कॉट्रॅक्ट मध्ये 2010 ची अधिसुचना लागु करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे इतरही महानगरपालिका किंवा महाराष्ट्र एस.टी. आहे त्या ठिकाणी देखील परिवहन कर्मचाऱ्यांसाठी लागु असलेली अधिसुचना ही लागु त्या ठिकाणी सुध्दा करण्यात येते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, ओ.सी.डब्लु. ला 24 फेब्रुवारी 2015 चा जी.आर. लागु होतो की नाही ?

महापौर :– लिखित स्वरुपात आयुक्त साहेब आपणास उत्तर देतील.

प्रश्न क्र 70:– महानगरपालिका व खाजगी जाहिरात फलक (होर्डिंग) मध्ये जेव्हा जाहिरात दर्शित होत नाही किंवा जाहिरात होर्डिंग रिकामे असतात त्यावेळेस या होर्डिंग वर जनजागृती/सामाजिक संदेश देणे अनिवार्य करणे संदर्भात प्रश्न

श्री.निशांत गांधी :– मा.महापौरजी, नागपूर शहर मे जितने भी होर्डीग्स् लगे है जब उनपर जाहिरात नही लगी रहती है तब उस पर सामाजिक संदेश लिखने चाहियें। पर्यावरण से संबंधित हो या ट्राफिक रुल्स् से संबंधित हो ये करने से होर्डीग्स् का जिनको काम मिला है, उन्होने वह करना चाहियें।

महापौर :– सन्माननिय सदस्य श्री.निशांत गांधी यांनी चांगला विषय येथे मांडला आहे. या संदर्भात जे काही आपल्याला धोरणात्मक निर्णय घेता येईल तो आपण नक्की घेवु त्या संदर्भात प्रशासनाला तसा अवधी देवु

श्री.प्रविण भिसीकरः– मा.महापौरजी, स्थावर विभागाने झोनल लेव्हलवर 10 झोनच्या सहा.आयुक्तांना

त्याचे बर्डन दिले आहे. तर 10 ही झोनच्या सहा.आयुक्तांनी ती माहीती आहे काय की महानगरपालिकेचे जाहिरातीचे होर्डीग्स् कुठे कुठे लागले आहे. कारण की मागच्या पाच वर्षामध्ये त्या संदर्भात माहिती मागितली होती परंतु आतापर्यत ते मिळाले नाही. म्हणुन 10 झोनच्या सहा.आयुक्तांना आता जे 10 ही झोनचे जाहिरातीचे टेन्डर काढले आहे ते स्पॉट माहिती आहे काय?

श्री.निशांत गांधी :– मा.महापौरजी, जब आउटडोर ॲडर्व्हटाईजमेंट पॉलिसी 2001 है उसमे ऐसा अमेडमेंट करे की उनके लिये मॅनडेटरी हो जायें।

प्रश्न क्र 71:– नागपूर शहरातील वर्ष 2016–2017 हया आर्थिक वर्षात मंजूर झालेल्या विविध विकास कामांचा तेव्हा अस्तित्वात असलेला प्रभाग व विभाग निहाय मुख्यालयातुन मंजुर झालेल्या विकास कामांचा तपशील संदर्भात प्रश्न

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, हा प्रश्न लोककर्म विभागाशी संबंधित आहे आणि त्या संदर्भात उत्तर मी वाचुन दाखवितो विचारलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने ती प्राप्त करुन संकलीत करण्यास गतिमान प्रशासनाला वेळ लागत आहे. सबब माहिती उपलब्ध करुन देण्यास वेळ उपलब्ध करुन देण्यात यावा, माहिती प्राप्त होताच आपणांस व्यक्तीशः पुरविण्यात येईल. मा.महापौरजी, यातील माझा उपप्रश्न असा आहे की यासाठी जो वेळ लागणार आहे तो वेळ देण्यासाठी काही हरकत नाही. मा.महापौरजी या आधी आपला निर्णय झाला सभागृहामध्ये मा.महापौरजींनी आदेश दिले की सर्व प्रश्नोत्तरे वेबसाईटवर टाकले पाहिजे, अजुनही आपण टाकले नाही. गतीमान प्रशासन आहे. तुमचे विचारलेले प्रश्न कोणते आहे आणि उत्तर कोणते आहे हे मला कळतच नाही. आणि त्यांना जेवढे समजते त्या आधारावर प्रत्येक जण उपप्रश्न विचारत असते. म्हणुन पारदर्शकता असली पाहिजे. आपल्या घोषणापत्रामध्ये आपण म्हटले होते,

प्रश्न क्र 72:– जुना गोरेवाडा येथील बंद झालेला फिल्टर प्लॅन्ट मधील कर्मचाऱ्या संदर्भात प्रश्न

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, जुना गोरेवाडा पंम्पींग हाउस मे जो 18 कर्मचारी थे उनको पिछले कई सालो से जिन्होने 12 से 14 साल नागपूर शहर की जनता को शुध्द पाणी पिलाया उनको आज वही पंम्पींग बंद होने के बाद पेंच 1, पेंच 2, पेंच 3 मे काम नही दिया। जो रल्वे का ड्रायव्हर है उनको बोलते हम पत्थर फोडो वह काम कैसे हो सकता। अभी जो माहिती मिली है उसमे 4 कर्मचारी को लिया गया है। बाकी 14 कर्मचारी को नही लिया गया है। उनकी जानकारी दिजीयें।

महापौर :– आपणांस लिखीत उत्तर दिले आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, उत्तर समाधानकारक नाही.

श्री.प्रविण भिसीकर :– मा.महापौरजी, मिनीमम वेजेस नुसार पेमेंट त्यांच्या अकाउंट मध्ये गेले पाहिजे.

महापौर :– संबंधित अधिका–यांनी उत्तर दयावे.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, जिवन मरणाचा प्रश्न आहे..

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्री.गायकवाड) :– मा.महापौरजी, हा जो गोरेवाडाचा प्लान्ट होता तो जवळपास 100 वर्षापुर्वीचा प्लान्ट होता तो ऑफसेट झाला होता त्याच्याऐवजी पेंच टप्पा 2 चा जो प्लान्ट आहे त्याची कॅपिसिटी वाढविली, या प्लान्टवर त्या कर्मचा–यांची आवश्यकता नव्हती तरीसुध्दा ते जे 18 कर्मचारी होते त्या कंत्राटदारांनी रितसर नोटीस दिली होती. आणि त्यांना सांगितले होते की त्यांना इतरत्र काम देण्यासाठी तयार आहोत आणि त्यापैकी 4 लोकांना त्यांनी काम दिले आणि 14 लोकांना ते काम देण्यास तयार आहे.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, आपण त्यानंतर काही लोकांना कामावर घेतले की नाही.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्री.गायकवाड) :– मा.महापौरजी,18 लोक होते त्यापैकी आपण 4 लोकांना कामावर घेतले आणि बाकी लोकांना ते दुसरीकडे कामावर घेण्यास तयार आहे. ज्या ठिकाणी कामे नाही त्या ठिकाणी आपण काम कसे देणार.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, जे 18 कर्मचारी होते ते महानगरपालिकेचे होते की खाजगी कॉट्रॅक्टरचे होते, या संदर्भात माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्री.गायकवाड) :– मा.महापौरजी, ते आपले कर्मचारी नव्हते ते कॉट्रॅक्टरचे कर्मचारी होते.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, मानवतेच्या आधारावर त्यांना ओ.सी.डब्लु. कंपनीने काम दयावे, आता

कोणते काम दिले पाहिजे हा आपला अधिकार आहे काय परंतु काम दिले पाहिजे अशी सभागृहातर्फे विनंती आहे.

महापौर :— प्रश्नोत्तराचा तास आता संपला आहे. 1 तास 40 मिनीटे झाले निगम सचिवांनी लक्षवेधीचे वाचन करावे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, मा.सदस्य ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी 3 फेब्रुवारी 2018 च्या सर्वसाधारण सभेत एक लक्षवेधी सूचना लावली आहे. आणि ही लक्षवेधी सूचनेचे मी वाचन करतो. दि. 03 फेब्रुवारी 2018 च्या सर्वसाधारण सभेत महानगरपालिकेच्या इतिहासात आज न घडलेली घटना घडली. सभागृहाचे नियमीत कामकाज सुरु असतांना मोठया संख्येने नारे निर्देशने करुन महिला सभागृहात घुसल्या त्यामुळे मा.महापौरजींना कामकाज संपवावे लागले, या महिलांना सभागृहाची नियम, व परंपराची माहिती नसल्याने त्यांनी सभागृहाची गरिमा व परंपराचे व नियमांचे उल्लंघन केले. प्रसार माध्यमांसमोर याची कबुली देतांना सभागृहाच्या एका सन्माननिय सदस्यांने त्यांना मागुन धक्का देवुन व दारावरील मनपा कर्मचा—यांसोबत धक्काबुक्की करुन बळजबरीने सभागृहात घुसविले अशी कबुली माध्यमासमोर व पत्रकारांसमोर व पदाधिका—यांसमोर दिली सभागृहाच्या नियम, परंपरा व गरिमाला काळीमा फासना—या या सदस्यांच्या विरोधात सभागृहाने काय कारवाई केली त्याची माहिती या सभागृहात देण्यात यावी.

मा.महापौरजी, कलम 1 (एक्स) अंतर्गत मा.आयुक्त यांना एक वक्तव्य करावयाचे आहे आणि मा.आयुक्त या संदर्भात वक्तव्य करतील.

निगम आयुक्त :— मा.महापौरजी, दिनांक 03/02/2018 रोजी नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या दरम्यान घडलेली जी घटना होती त्यामध्ये शासकीय कामामध्ये व्यत्यय आणल्याबद्दल नगरसेवक व आशा प्रवर्तक युनियन यांच्याविरुध्द मा.महापौरजी यांच्या निर्देशानुसार दिनांक 03/02/2018 रोजी पोलिस निरीक्षक, सिटी कोतवाली, महाल, नागपूर येथे तक्रार दाखल करुन संबंधित नगरसेवक व त्यांच्यासोबत आलेल्या महिलांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची सूचना सिटी कोतवालीला देण्यात आली होती. या अनुषंगाने पोलिस स्टेशन कोतवाली यांनी गुन्हा क्र 32/18 भा.द.वि. कलम 353,143,149,109, व मुंबई पोलिस कायदा चे कलम 135 यांच्याप्रमाणे गुन्हा नोंदविल्याचे दि. 5 फेब्रुवारी 2018 रोजी त्याचा अहवाल सादर केलेला आहे तसेच मा.महापौरजी यांच्या निर्देशानुसार अति.आयुक्त (2) यांची या संपुर्ण घटनेची सखोल तपासणी करण्याच्या दृष्टीकोणातुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने अति.आयुक्त (2) यांनी दि. 06/02/2018 च्या पत्रानुसार पोलीस निरीक्षक सिटी कोतवाली, सहा.आयुक्त, सा.प्र.वि. संबंधित नगरसेवक जे की प्रभाग क्र 18 (ड) चे आहे. श्रीमती प्रिती मेश्राम,आशा व गट प्रवर्तक युनियन यांना त्यांचे बयान नोंदविण्याकरीता दि. 12/02/2018 व 14/02/2018 रोजी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले असता दिलेल्या वेळेमध्ये सिटी पोलिस स्टेशनचे पोलिस बयान नोंदविण्याकरीता उपस्थित झालेले नाही म्हणुन त्यांना दि.14/02/2018 रोजी अति.आयुक्त(2) यांनी पुन्हा बयान नोंदविण्याकरीता 17/02/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता बोलाविले असता तेथील 4 पोलीसांचे बयान नोंदविण्यात आलेले आहे. उपरोक्त सांगितल्याप्रमाणे प्रशासनातर्फे 03/02/2018 रोजी महानगरपालिकेच्या सभेदरम्यान घडलेल्या घटनेच्या संदर्भात केलेली कारवाई वरीलप्रमाणे आहे. आणि पुढील सभागृहाच्या पटलावर संपुर्ण विस्तृत अहवाल या घटनाच्या निमीत्ताने मा.महापौरजी यांना सादर करण्यात येईल.

श्री.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, ही लक्षवेधी लावतांना खरेतर, 3 फेब्रुवारीची 2018 ची ही घटना आहे. पण या पुर्वीच्या सभागृहामध्ये सन्माननिय सदस्यांनी घंटा बडवत सभागृहाच्या कामामध्ये.....

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर असा आहे की ज्या नियमाअंतर्गत ही लक्षवेधी आलेली आहे त्या लक्षवेधीवर मा.आयुक्तांचे निवेदन झाल्यानंतर कुठलेही चर्चा करता येत नाही, या सदर्भातील नियम मा.सचिवांनी या ठिकाणी वाचुन दाखवावा.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, हा नियम योग्य आहे. यानंतर स्थगन प्रस्तावाचे वाचन करावे.

महापौर :— सन्माननिय निगम सचिवांनी स्थगन प्रस्तावाचे वाचन करावे

निगम सचिव :— मा.महापौरजी, मा.नगरसेवक श्री.दयाशंकर तिवारीजी यांनी सभा कामकाज नियमावली चे कलम 1 (ट) नुसार स्थगन प्रस्ताव या सदना समक्ष दिलेले आहे या स्थगन प्रस्तावाचे मी वाचन करीत आहे. मा.महापौरजी, दिनांक 20/02/2018 च्या सर्वसाधारण कलम 1 (ट) अंतर्गत कोणतीही नस्ती तांत्रिक

मान्यतेकरीता अधिक्षक अभियंता यांना मौका पहाणी करणे बंधनकारक आहे काय? असल्यास उपरोक्त मौका पहाणी किंवा तपासणी बुकमध्ये नोंद असते काय? यावरील राज्य शासनाच्या पी.डब्लु.डी. मॅन्युअल मध्ये काय तरतुद आहे? सि.एस.आर. लागु करण्यापुर्वी प्रत्येक बाबींवर दर पृथकरन करुन ते न्यायसंगत आहे अशी मान्यता देण्याचा अधिकार कोणाला आहे. जर तो चुकीचा आहे त्यामुळे लोकहिताचे काम प्रभावित होत असेल तर कायदेशिर कारवाईचे प्रावधान काय?

महापौरः— सभागृहात विषय पत्रिकेला सुरूवात करतो. स्थगन प्रस्तावावर चर्चा करावयाची आहे.

श्री प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, स्थगन प्रस्तावावर चर्चेची अनुमती आपण प्रदान केली आहे काय ? या संदर्भात सभागृहाला माहिती द्यावी.

महापौर :— अनूमती प्रदान करण्यांत आली आहे, चर्चा करावी.

श्री दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका मे अधिक्षक अभियंता इस पद पर राज्य सरकार के पी.डब्लु.डी. विभाग के व्यक्ति हमारे यहां पदावनत है। मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से यह जानकारी लेना चाहुंगा कि अधिक्षक अभियंता की डयुटी लिस्ट क्या है। और नागपूर महानगरपालिका मे उसकी कार्यप्रणाली किस प्रकार से होनी चाहिये, इस बात की जानकारी सभागृह मे दी जाये।

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :— मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे कि तांत्रिक मान्यता देतांना..

श्री दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, मी प्रश्न विचारला नाही, मी विचारले कि, तुमची डयुटी लिस्ट महानगरपालिकेमध्ये काय आहे, ती सांगा माझा प्रश्न त्यानंतर राहील.

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :— मा.महापौरजी, अधिक्षक अभियंता कार्यालयात आलेल्या कुठल्याही तांत्रिक कामाच्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देतांना महाराष्ट्र शासनाने ठरविलेल्या नियमानुसार तांत्रिक मान्यता देणे, टेंडर पेपर्स अप्रुव्हल करणे, त्यानंतर कुठलेही काम सुरू असतांना एखादया कामामध्ये क्वॉन्टीटी मध्ये वाढ झाली किंवा एखादया कामाचा एक्स्ट्रा ॲटम झाला तर त्याला अप्रुव्हल देणे त्यानंतर वार्षिक सी.एस.आर.ला मंजूरी देणे.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, मैंने आपसे निवेदन किया कि अधिक्षक अभियंता की डयुटी लिस्ट क्या है इसके बारे मे प्रशासन जानकारी दे। आजसे सभागृह मे नयी जिम्मेदारी शुरू हुई है कि, जिसकी जिम्मेदारी है वही खडे होकर बताये। मुझे ऐसा अपेक्षित था कि अगर किसी के बारे मे मैंने प्रश्न पुछा है तो उसको डयुटी अलॉट करनेवाले जो एच.ओ.डी. है उसने सभागृह मे जवाब देना चाहिये कि संबंधित व्यक्ति की जिम्मेदारी क्या है, मुझे नही लगता कि आपने निर्देश दिये कि अधिक्षक अभियंता खडे होकर के जवाब दे, मुझे नही लगता कि आयुक्तजी ने कहां कि अधिक्षक अभियंता ने जवाब देना चाहिये। उसके बावजूद खुद होकर के उन्होने जवाब दिया यह किसकी अनुमती से जवाब दिया इसका उल्लेख सभागृह मे किया जाये।

अपर आयुक्त (श्री सिद्यीकी) :— मा.महापौरजी, एस.ई. च्या वरचे अधिकार हे सी.ई.ला असते परंतु सी.ई. चा चार्ज त्यांच्याकडे आहे. टॅक्नीकली 25 लक्षाच्यावर टी.एस.देण्याची जबाबदारी अधिक्षक अभियंता यांची आहे. या कामाचे टेंडरचे सॅग्शन, सी.एस.आर. या सर्व बाबी पाहण्यांत येते.

श्री दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, 25 लक्षाच्यावर टी.एस. देण्याची जबाबदारी अधिक्षक अभियंता यांची आहे. टॅक्नीकल सॅग्शन देत असतांना आपण टॅक्नीकल सॅग्शन फाईलवर द्यावे कि साईडवर जावून दिले पाहिजे याबाबत पी.डब्लु.डी. मॅन्युअल काय म्हणते, याची माहिती स्वतः अधिक्षक अभियंता यांनी द्यावी अशी आपल्या माध्यमातुन विनंती करतो.

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :— मा.महापौरजी, तांत्रिक मान्यता देतांना पी.डब्लु.डी. मॅन्युअलमध्ये प्रत्येक साईटची व्हिजीट केलीच पाहिजे असे संबोधले नाही परंतु आवश्यकता वाटली तर अधिक्षक अभियंता असो, कार्यकारी अभियंता असो, मुख्य अभियंता असो तांत्रिक मान्यता ही ज्याच्या अखत्यारीतील आहे, त्यांनी त्या कामाच्या साईटला व्हिजीट देवून त्यानंतर तांत्रिक मान्यता द्यावी. कारण कि कामाची संख्या इतकी जास्त असते कि प्रत्येक कामाच्या साईटवर जावून तांत्रिक मान्यता देणे शक्य नसते.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, माझ्या प्रभागाच्या तीन—चार फाईल आहेत. ज्याच्यात यांनी साईट व्हिजीट लिहिले आहे आणि हे म्हणतात कि यांच्याकडे एवढा कामाचा व्याप असतो कि यांना वेळ नसतो हे दुविधापुर्ण मनःस्थितीचे उत्तर आहे. जेव्हा कोणता ही मॅन्युअल तयार होते कमीत कमी किती टक्के रेंडम चेकिंग

आपण केली पाहिजे. आणि कोणत्या प्रकारचे काम जे धोकादायक असु शकतात, त्याचे आपण टॅक्नीकल सॅग्शन देण्यापूर्वी मौका तपासणी केली पाहिजे. असे काही निकष आहे काय ? आहे किंवा नाही.

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :— मा.महापौरजी, एकुण कामापैकी साधारणतः पांच टक्के कामाला साईट व्हिजीट करावयास पाहिजे.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, पांच टक्के कामाला साईट व्हिजीट करावयास पहिजे जनरली किती लाखापर्यंतच्या कामाची फाईल राहिली तर आपण साईट व्हिजीट करतात.

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :— मा.महापौरजी, किंमतीवर डिपेंड नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, आपण नागपूर महानगरपालिकेत रूजु झाल्यानंतर किती ठिकाणी टॅक्नीकल सॅग्शन देत असतांना साईट व्हिजीट केली.

अधिक्षक अभियंता (श्री.सोनटक्के) :— मा.महापौरजी, निश्चितपणे मला सांगता येणार नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, कोई भी जिम्मेदार अधिकारी जब अपना कक्ष छोडकर के बाहर साईट व्हिजीट पर जाता है तो उसके ऑफिस मे व्हिजीट बुक होना चाहिये और वह कहां जा रहा है इस बात का उल्लेख होना चाहिये। यह होना चाहिये या नही प्रशासनीक नियमो से इस बात की जानकारी महापौरजी आप मा.निगम सचिव के माध्यम से दिलवाये ।

महापौर :— निगम सचिवांनी माहिती द्यावी.

निगम सचिव :— मा.महापौरजी, प्रत्येक कार्यालयात एच.ओ.डी. यांनी आपले एक मुव्हमेंट रजिस्टर्ड ठेवले पाहिजे असे निर्देश आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयात अश्याप्रकारचे मुव्हमेंट रजिस्टर आहे काय ? यांनी ज्याठिकाणी व्हिजीट केली ती त्या मुव्हमेंट रजिस्टर्डमध्ये नमुद आहेत काय ? याची माहिती देण्यांत यावी.

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :— मा.महापौरजी, माझे कार्यालयात मी मुव्हमेंट रजिस्टर्ड ठेवलेले नाही, परंतु ते ठेवण्यांत येईल.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, प्रशासन चलाने के नियम होते है और मुव्हमेंट रजिस्टर इसलिये रखा जाता है कि, कोई व्यक्ति अगर प्रशासकीय कार्य से बाहर जा रहा है तो उस बात की प्रशासन को जानकारी होनी चाहिये कि वह कहां गया। कोई भी व्यक्ति अपनी मनमर्जी से अपना ऑफिस छोडकर के बाहर घुम रहा है, यह स्थिती उत्पन्न नही होनी चाहिये इसलिये मुव्हमेंट रजिस्टर रखा जाता है। अधिक्षक अभियंता बडे गर्व के साथ कह रहे है कि मेरे यहां मुव्हमेंट रजिस्टर ही नही है। इसका मतलब कोंडवाडा विभाग मे इनको भेजना चाहिये क्या ? कारण कि यह मोकाट है और मोकाट को पकडने की अपने यहां परंपरा है। मा. महापौरजी, जानवरो को तो मोकाट पकडने की परंपरा है, लेकिन कोई अधिकारी अगर मोकाट हो जाता है और प्रशासन के विहित नियमावली के बाहर जाकर के बर्ताव करता है और अगर वह राज्य सरकार का अधिकारी है तो उसपर कारवाई करने के महानगरपालिका को क्या अधिकार है। उसके सी.आर. मे नोंद करने के लिये निगम आयुक्त को क्या अधिकार है इस बात की जानकारी सभागृह मे दी जाये।

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, महानगरपालिकेचे 10 झोन आहे त्या 10 झोनमध्ये मुव्हमेंट रजिस्टर ठेवले आहे काय ? ठेवले आहे कि नाही या गोष्टीची जानकारी देण्यांत यावी.

महापौर :— प्रशासनानी माहिती द्यावी, कोणत्या झोनमध्ये मुव्हमेंट रजिस्टर ठेवले आहे.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, स्थगन प्रस्ताव स्विकारल्यानंतर आपण वेळ दिलेली नाही, इथे लिहीले आहे की योग्य वाटेल अशा वेळ दिली आहे त्यामुळे आपण सूचना करावी कि हे कामकाज आपण किती वेळेपर्यंत स्थगित करणार आहे. स्थगन प्रस्ताव स्वीकारल्यानंतर किती वेळेपर्यत हे कामकाज स्थगित केले आहे. मा.महापौरजी, विषय पत्रिकेचे कामकाज स्थगित आहे. आपण किती वेळेपर्यंत स्थगन प्रस्तावावर चर्चा घेणार आहे. आपण वेळेची घोषणा करावी.

महापौर :— मुव्हमेंट रजिस्टरचा विषय महत्वाचा आहे.

श्री. प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, ज्याअर्थी आपण हा स्थगन प्रस्ताव स्विकारला त्या अर्थी त्याचा महत्व विषदच होते.

महापौर :— स्थगन प्रस्तावावर अर्धा तास चर्चा करु.

सहा.आयुक्त, (सा.प्र.वि.) (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 56 (2) मध्ये शस्तीची तरतूद आहे, नगरपालिका व महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या संदर्भात 56 (2) मध्ये तरतुद आहे आयुक्त प्रतिनियुक्तीवर असलेल्या परिवहन अधिकारी वगळुन महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकारणाने नियुक्त केलेल्या अश्या कोणत्याही अधिकारी व कर्मचा–यांना महानगरपालिकेचे आदेश होईपर्यंत निलंबित करु शकेल व अशाप्रकारे निलंबित करण्यांत आलेला अधिकारी हा परिवहन व्यवस्थापक किंवा कलम 45 अन्वये नियुक्त करण्यांत आलेला अधिकारी असेल तर असे निलंबन किंवा त्याच्या निलंबनसंबंधीची कारणे आयुक्तांनी ताबडतोब महानगरपालिकेला कळविली पाहिजे. व महानगरपालिकेनी निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्यात त्याचे निलंबत कायम केले नाही तर ते निलंबन संपुष्टात येईल. परंतु असा अधिकारी व कर्मचारी यांच्यावर असलेल्या आरोपांची चौकशी होईपर्यंत त्या अधिका–याचे व कर्मचा–यांचे निलंबन हे अस्थायी समजण्यांत येणार नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, सर्वप्रथम तो मैं अधिक्षक अभियंता का अभिनंदन करना चाहुंगा कि, उन्होने गर्व के साथ यह बात स्विकृत किया कि, मैं मेरे पास किसी प्रकार का कोई रजिस्टर नही रखता। इस बात से बाकी कर्मचारीयो ने प्रेरणा लेनी चाहिये। कारण जैसा बॉस हो, सेनापती जैसा फौज भी वैसी होती है। इन्होने समाज मे इंजिनिअरो को महानगरपालिका मे जीवन जीने का एक नया रास्ता दिखलाया कि मोकाट होकर के घुमो, ऐसा आदर्श प्रस्तुत करनेवाले आदर्श पुरूष आज हमारे सामने मौजूद है। इनपर क्या कारवाई करनी चाहिये इसका उल्लेख हमारे विभाग ने अभी बताया, जिसमे आयुक्त महोदय को अधिकार दिये गये। मा. महापौरजी, इनपर क्या कारवाई की जाये मैं इस बात पर भाष्य नही करता कारण कोई व्यक्ति सभागृह मे खडे होकर के अपनी गलती को शतःप्रतिशत स्विकृती प्रदान करता हो तो उसको पक्ष रखने के लिये अलग से समय देने की आवश्यकता नही ऐसा मुझे लगता है, इस सभागृह को भी वही लगता होंगा। मा.महापौरजी, दुसरा विषय अधिक्षक अभियंता, मुख्य अभियंता नेबताया कि सी.एस.आर. को मंजूरी प्रदान करना यह उनके मातहत आता है। मा.महापौरजी, वर्तमान मे जो सी.एस.आर. नागपूर महानगरपालिका मे कार्यान्वित किया गया है, और महानगरपालिका के इतिहास मे पहली बार मा.आयुक्तने उसका विमोचन किया है, ऐतिहासिक सी.एस. आर. को लागु और घोषित करने से पूर्व उसपर किसी प्रकार की एक्सरसाईज मान्यवर महोदय ने की है क्या ? इस बात की सभागृह मे जानकारी दी जाये।

अधिक्षक अभियंता (श्री.सोनटक्के):–मा.महापौरजी,नागपूर महानगरपालिकेचे जे सी.एस.आर असते ते दरवर्षी आपण नवीन करावयास पाहिजे पण आतापर्यंतचा आपला जे काम होते त्यामध्ये महाराष्ट्र पी.डब्लु.डी. जे सी. एस.आर. तयार करतात, आपण त्याला बेस पकडुन महानगरपालिकेचे सी.एस.आर. तयार करतो. मागच्या जी. बी.मध्ये ठरले होते त्यामध्ये एक कमेटी बनविलेली होती, त्या कमेटीमध्ये तालेवार साहेब, बोरकर साहेब आणि अजून एक दोन लोक त्यात होते. त्यामध्ये आपण काय केले कि बिल्डींगचा जो सी.एस.आर. आहे, तालेवार साहेब व त्यांच्या अधिनस्थ जे डेप्युटी इंजिनिअर होते, त्यांनी तो तयार केला आम्ही तो चेक केला आणि रस्त्यांचा जो सी.एस.आर. होता माटे म्हणुन इंजिनिअर होते व बोरकर म्हणुन कार्यकारी अभियंता आहे प्रकल्पचे यांनी तयार केला बेस तोच ठेवला आहे, महाराष्ट्र पी.डब्लु.डी.चा जो सी.एस.आर. आहे तोच आपण बेस घेतला आहे. आतापर्यत आपण तेच करतो की महाराष्ट्र पी.डब्लु.डी. चा सी.एस.आर आपण आपल्या पध्दतीमध्ये अवलबंवितो

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, काल, स्थिती, परिस्थिती, भुगोल, व्यक्तिगत अडचने, भौगोलिक अडचने, इसके आधार पर भी सी.एस.आर. का निर्धारण होता है। सी.एस.आर. निर्धारण करते समय रेती कितने दुर से आ रही है इसका भी उल्लेख होता है। सी.एस.आर.निर्धारीत करते समय मोहल्ले से खोदी हुई मटटी को फेंकने के लिये लोड कितना लगेगा उसका भी उल्लेख होता है। सी.एस.आर.निर्धारीत करते समय नाले की डिसाल्टींग करते समय वहा की कंडीशन क्या है उसका भी उल्लेख होता है। मा.महापौरजी, हम गालिच्छ वस्ती के नगरसेंवक है, मेक्झीमम स्लम हमारे वार्ड मे है। और स्लम भी ऐसा है कि दो फिट, तीन फिट की गलिया है, और तीन फिट की गली के निंचे पुराने जमाने की डाली हुई सिव्हर लाईन हैं। और सिव्हर लाईन भी जहां रोडपर चार फिट डांबर है तो सिव्हर लाईन उससे तीन फिट निचे ही होंगी। यांनी आठ फिट नव फिट निचे सिव्हर लाईन है और दो फिट की गली है। उस स्थिती मे एक व्यक्ति खडे होकर के काम करता है वही मटटी खोदता है, वही घमेला उठाता है, वह दुसरे को देता फिर तिसरा व्यक्ति घमेला लेकर के बाहर

जाता है। ऐसी स्थिती मे काम करते समय सिव्हर लाईन का सी.एस.आर. बनाते समय किन बातो पर ध्यान रखना चाहिये, इन बातो का अध्ययन इन्होने किया है क्या ? अगर किया है तो सिव्हर लाईन का सी.एस.आर. क्या बनाया, इस बात की जानकारी सभागृह मे दी जाये।

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :– मा.महापौरजी, सी.एस.आर. बनवितांना दिलेले ॲटम आपण दिलेले आहे यामध्ये एक परिपत्रक काढलेले आहे कि कुठल्याही बाबीचे दर हे कमी जास्त वाटत असेल तर त्यांनी एस.ई. ऑफिसला द्यावे. आपण त्याच्यावर विचार करू. आपण जो सी.एस.आर. पब्लिश केला आहे, त्यातील कुठलेही ॲटम रिव्हाईज होत नाही असे मुळीच नाही. त्यात कंन्सीडरेशन होईल, जसे कॉन्ट्रेक्टर असोसिएशनचे म्हणणे असेल तर त्यांनी यावे, चर्चा करावी, त्यामध्ये आपण सुधारणा करण्यांस तयार आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, मी येथे कॉट्रक्टर असोसिएशनचा प्रतिनिधी म्हणुन उभा नाही. मी एक सामान्य उदाहरण सांगतो या सभागृहात नगरसेवक आहे श्री.तभाने ते पूर्वी नागपूर महानगरपालिकेत कॉन्ट्रक्टर होते. मी स्थायी समितीचा अध्यक्ष होतो, माझे प्रभागात एक गेटचं काम श्री.तभाने यांनी घेतला. तभानेनी 16 प्रतिशत बिलो टेंडर टाकले. मी त्याला बोलाविले कि, प्रविण भिसीकर जेव्हा स्थायी समितीचे अध्यक्ष होते तेव्हाची ही फाईल आहे, त्यांचे एक वर्ष त्यानंतर संदिपजीचे दोन वर्ष व माझे वर्ष पकडुन चार वर्ष जुनी ही फाईल आहे तु 16 प्रतिशत बिलो टाकले तुझे काय होईल, त्यावेळी तभाने मला म्हणाला कि मी इंजिनिअर आहे, मी सांगीतले कि बाबा तु इंजिनिअर आहे, आम्ही सुध्दा सोशल इंजिनिअर आहोत तु हे काम कसे करणार. मा.महापौरजी, नंतर मला माझे वार्ड फंडातुन पैसे देवून हे काम करावा लागले. कारण नागपूर शहरात आयुक्तांच्या आदेशाने जे सिमेंटचे गेट होते त्यावर सुप्रिम कोर्टानी त्यानंतर प्रतिबंध लावले. मा. महापौरजी, एखाद्या शिकलेला इंजिनिअर जेव्हा अश्याप्रकारची चुक करू शकते. मग जे इंजिनिअरींग ग्रेज्युवेट नाही व नागपूर महानगरपालिकेत वर्षानुवर्ष पिढयांनापिढी लागोपाठ ठेकेदारचा काम करीत आहे त्यांना हया सी. एस.आर.ची परिभाषा काय समजणार आहे. मा.महापौरजी, संपुर्ण देशभरात चर्चा आहे, मंहगाई वाढली, मंहगाई वाढली, मंहगाई वाढली, सिव्हर लाईनमध्ये सी.एस.आर.चे रेट कसे काय कमी झाले हे मला कळले नाही. हे म्हणत आहे कि आम्ही रिवाईज करून देवु जेव्हा रिवाईज करायचे होते तेव्हा सी.एस.आर.लागु होण्यापूर्वी तुम्ही याला रिवाईज का केला नाही. मा.महापौरजी, एक सामान्य उदाहरण सांगतो, आपण ज्याला चिनी मिटटीचा पाईप म्हणतो तो एक पाईप जी.एस.टी.शिवाय 220 रूपयात येतो, तो 2 फुटचा पाईप असतो आणि सी.एस.आर. मध्ये 196 रूपये त्याचा रेट आहे, एक मिटरचा, एक मिटर 196 रूपयांचा बाजारात जी.एस.टी.शिवाय तो 220 रूपयात भेटते, त्यानंतर कार्टींग व लोडिंग आणि अनलोडींग सी.एस.आर.मध्ये नमुद काय आहे सी.एस.आर.चा आपण पान उघडले, पान क्रं. 117, ॲटम क्रं. 927 त्याच्यात नमुद असे आहे कि, पाईप आणणे, खडडा करणे, पाईप टाकणे, ज्वाईंट भरणे, माती भरणे, लेव्हल करून देणे, त्याचे 196 रूपये रनिंग मिटर आहे. जो पाईपच 220 रूपयात दोन फिटचा येते म्हणजे त्याला एक मिटर घेतला तर 385 रुपयांचा पाईप होते तो ठेकेदार जर 200 रूपयात तो टाकणार तर त्या खडडयामध्ये ठेकेदाराला सुध्दा टाकावा लागेल. मा.महापौरजी, आज किसान मर रहे है और कल ठेकेदार मरेगें और यह बोलेंगे कि हमने तो रिवाईज करने का मौका दिया था, हमारे पास आकर के रिवाईज क्यों नही कर लिया। इन्होने अपनी डयुटी लिस्ट मे बताया कि सी.एस.आर. का निर्माण करना यह इनकी जिम्मेदारी है। मा.महापौरजी, केवल इतना ही नही आपको जानकर के आश्चर्य होंगा, मटटी फेंकने के लिये गडडा खोदने का रेट 71 रूपये, मा.महापौरजी, एक किलोमिटर का खडडा खोदने का लेबर का रेट 350 रूपये है। यह 71 रूपये देते है और उसमे खडडा खोदना, पाईप डालना और मटटी डालना 125 रूपये कर दिया अभी पुरी पुरानी चिजे गायब हो गयी। गल्ली से मटटी फेंकना है, मटटी फेंकने के लिये मा. आयुक्त मैं आपसे निवेदन करना चाहता हुॅ, ठेकेदार जो मट्टी फेंकते है उसके लिये जगह उपलब्ध करवाते है ताकि पता तो चले कि कितनी मट्टी आयी और कहां से आयी। उसकी लिड देते समय हम पांच कि.मि. की लिड दे देते है। नागपूर शहर मे कोई जगह बताईये कि सेंटर नागपूर से मट्टी उठाने के बाद पांच कि.मि.के अंदर फेंक सके। 10–10 कि.मि. तक शहर फैल गया मट्टी फेंकने की जगह नही है। क्या होता है एक फाईव व्हिलर से मैंने मटटी उठाया और मैंने कार्पोरेशन के कचरे के टप मे डाल दिया। यहां से वहां तक के मटटी उठाने के पैसे ठेकेदार को मिल गये और कचरे के टप से मटटी उठाने का पैसा कनक को मिल गया, और ठेकेदार को बहोत कम पैसा मिला एक टन का उसको 250 रूपये मिला और कनक को 1300 रूपये मिला। मा.महापौरजी, ठेकेदार मट्टी फेंकेगा तो 250 रूपये मिलेगें, और कनक उस मटटी को उठायेगा तो 1300

रूपये मिलेगें इतनी तफावत इसमे है। मैं ठेकेदारो को मदद करो यह नही कहुंगा लेकिन ठेकेदार ने कहां से मट्टी उठाकर फेंकना चाहिये इसके लिये अगर हम कोई जगह निर्धारीत करेगें तो वहां पर मटटी जा रही है या नही जा रही है इस बात का हमे पता चलेगा। अन्यथा कोई प्रायव्हेट आदमी वहापर मट्टी डाल देंगा, मा. महापौरजी, यह केवल इस बात का हल नही है जो आर.सी.सी. पाईप है उसके भी वही हाल है, बडा आश्चर्य होता है अब मैं क्या बताउ पिछले समय नागपूर महानगरपालिकाने इस सी.एस.आर. का अवलंब किया था उस सी.एस.आर.मे आर.सी.सी. पाईप डालने के लिये 826 रूपये रनिंग मिटर का रेट था। ओर 826 रनिंग मिटर का जो रेट था वह पाईप लेईंग का था, केवल पाईप बिछाने का था उसके अलावा मटटी फेंकने का अलग था, गडडा खोदने का अलग था। और मा.महापौरजी, अभी एक सी.एस.आर. और उस सी.एस.आर. मे 778 रूपये मे आपको पाईप भी डालना है, गडडा भी खोदना है, मटटी भी भरना है, सब करना है। अगर मंहगाई कम हो गयी तो इन्होने एक प्रेस लेकर बोलना चाहिये कि मंहगाई कम होने के कारण नागपूर महानगरपालिका ने नागरिको के हित मे यह रेट कम दिये। मा.महापौरजी, पहले गडडा खोदने का रेट अलग था, मटटी भरने का रेट अलग था, मट्टी फेंकने का रेट अलग था। उसके बावजूद 826 रूपये का रेट था अभी सभी काम एक ही आदमी को करना है और उसको रेट दिया है 773 रूपये मा.महापौरजी 826 रूपये के रेट मे भी लोग अगर सिव्हर लाईन और ड्रेन लाईन का काम नही लेते थे तो कल जाकर के नागपूर महानगरपालिका के सिव्हर लाईन और ड्रेन लाईन का काम लोग नही लेगें। जिसकी वजह से नगरसेवको के वार्डो के काम प्रभावित होंगें तो इसकी अंतिम जिम्मेदारी किसकी होनी चाहिये और इस प्रकार से अनदेखी करके जल्दी से अगर हमने सी. एस.आर.को घोषित कर दिया। मा.महापौरजी, अगर बच्चा प्रिमॅच्युअर हो जाये तो उसके रखने के लिये इनक्युबलेटर है, यह सी.एस.आर. भी प्रिमॅच्युअर हो गया इसको कहां रखना चाहिये इसका उल्लेख अगर अधिकारी महोदय करे तो ज्यादा अच्छा होंगा।

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :–मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जे सांगीतले ज्या ज्या आयटममध्ये अशी तफावत आढळत आहे त्यात आम्ही सुधारणा करू आणि ते रेट सुधारु.

श्री दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, नगरसेवको के वार्डो मे पुरानी बस्तीयो मे सबसे ज्यादा काम सिव्हर लाईन के है। स्ट्रॉम वॉटर लाईन के काम है और सबसे ज्यादा काम यहां होते समय जो काम इन रेट के कारण प्रभावित हो रहे है। मा.महापौरजी, मान्यवर महोदय ने एज ए चिफ इंजिनिअर यह कहां कि सुपरइंटेंडेंट की यह जिम्मेदारी है अगर उस समय सुपरइंटेंडेंट इंजिनिअर अपना काम ठिक तरीके से नही कर रहा है तो एज ए चिफ इंजिनिअर सुपरइंटेंड इंजिनिअर पर क्या कारवाई करनी चाहिये। एज ए मुख्य अभियंता आप जानकारी दे।

अधिक्षक अभियंता (श्री सोनटक्के) :–मा.महापौरजी, कुठलेही सी.एस.आर. पब्लिश झाल्यानंतर कुठल्या ॲटममध्ये तफावत आढळत असेल तर त्याला जर पॉइंट आउट करीत असेल तर त्याला रिॲनालिसीस करतो आपण नेहमी हीच पध्दत आहे. मुख्य अभियंता देखील अधिक्षक अभियंतांना हेच सांगेल.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, मागच्या वर्षीचा सी.एस.आर. राज्य शासनाने केव्हा घोषित केला आणि आपण कोणत्या तारखेला लागू केला, या वर्षीचा सी.एस.आर कोणत्या तारखेला घोषित केला आपण केव्हा लागु केला, याच्या याच्यावरुन आपल्या लक्षात येते की ही भानगड कशामुळे झाली किसने जल्दी जल्दी मे सी.एस.आर. घोषित किया इसकी जानकारी कृपापुर्ण इस सभागृह मे दि जायें।

अधिक्षक अभियंता (श्री.सोनटक्के) :– मा.महापौर महोदया, या वर्षीचा जो ई डी. एस.आर. पी.डब्लु.डी ने पब्लीश केला तो दोन ते तिनदा पब्लीश केला त्यामध्ये बरेचसे लॅक्युनाज होते. जी.एस.टी. मुळे लोकांमध्ये संभ्रम होता तो फायनली 22 सप्टेबर 2017 रोजी पब्लीश केला आणि आपण जो आपला सी.एस.आर. लागु केला तो 15 जानेवारी 2018 ला लागु केला आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, मागच्या वर्षीचा सी.एस.आर. केव्हा डिक्लीअर केला होता आणि आपण कोणत्या तारखेला आपण लागु केला होता.

मुख्य अभियंता (श्री.सोनटक्के) :– मा.महापौर महोदया, मागच्या वर्षीच्या सी.एस.आर. ची डेट संदर्भात मला सांगता येणार नाही.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, या संदर्भातील माहिती प्रशासनाने दयावी.

नगरयंत्री (श्री.तालेवार) :– मा.महापौर महोदया, मागच्या वर्षीचा सी.एस.आर. आपण लागु केलेला नव्हता. 2014–2015 चा जो सी.एस.आर. पी.डब्लु.डी. विभागाने लागु केला होता तोच आपल्याकडे कंटीन्युव होता.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, 2014–15 चा सी.एस.आर आपण कोणत्या तारखेला लागु केला होता.

नगरयंत्री (श्री.तालेवार) :– मा.महापौरजी, मला तारीख निश्चित माहिती नाही. 2014–15 चा सी.एस.आर. आपण त्याच वर्षीच्या कार्यकाळात लागु केला होता.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, 14–15 चा सी.एस.आर. आपण 2016 ला लागु केला हे खरे आहे काय?

नगरयंत्री (श्री.तालेवार) मा.महापौरजी, त्या संदर्भात माहिती घेवुन सांगता येईल.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, हम दो–दो साल सी.एस.आर. को रिवाईज नही करते और एका एक हमने सी.एस.आर. को 6 महिने मे मंजूर कर दिया। जिस दिन पी.डब्लु.डी. ने सी.एस.आर. घोषित किया उसी महिने मे हमने व्हेरीफिकेशन करके नागपूर महानगरपालिकामे लागू करना चाहिये। आपके महापौर के कार्यकाल मे मा.प्रविणजीने प्रश्न डाला उस विषय पर सभागृह ने निर्देश दिये की महानगरपालिकाने इन सारी चिजो के लिये दैनंदिन दिन मे महानगरपालिका की काम के लिये अपना सि.एस.आर. बनाना चाहियें। मा. महापौरजी, मुख्य अभियंता ने बताया की तालेवारजींने बिल्डींग का सि.एस.आर. बनाया और माटे ने बाकी ॲटम का सि.एस.आर बनाया ये बाकी ॲटम मे सिव्हर लाईन नही थी क्या कृपया इसका उल्लेख मा.मुख्य अभियंताजी करें, ऐसा मे निवेदन करना चाहुॅंगा।

अधिक्षक अभियंता (श्री.सोनटक्के) :– मा.महापौरजी, 2017–18 चा जो सि.एस.आर आपण तयार केला आहे त्यामध्ये प्रॉपर सिव्हर लाईनचे ॲटम आलेले नाही. एम.जी.पी. चा जो सि.एस.आर. रिवाईज व्हायचा आहे एम.जी.पी. च्या सि.एस.आर. च्या बेसिसवर आपण सि.एस.आर. तयार करणार आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, जेव्हा या सभागृहाने निर्देश दिले की आपण आपला सि.एस.आर. तयार केला पाहिजे, याचा अर्थ असा आहे की प्रायमरी ॲक्शन सुध्दा आपल्याच विभागाने करायला पाहिजे. दुस–याच्या रेट घेवुन आपण सी.एस.आर. तयार करायला नाही पाहिजे, हा मुळ आधार आहे. आपणही वेगवेगळे रेट घेतले पाहिजे, जिऑग्राफिकल कंडीशन घेतली पाहिजे, त्यानंतर आपण आपला सि.एस.आर. तयार करायला पाहिजे, त्याचे रेट आले नाही म्हणुन आम्ही केले नाही हे बोलुन चालणार नाही. सभागृहाने दुस–याच्या आधारावर आपला सि.एस.आर. तयार करावा असे रुलिंग दिलेले नाही. सभागृहाने रुलिंग दिलेले आहे की आपण आपला सि.एस.आर तयार करायला पाहिजे. मा.महापौरजी, सभागृहाने दिलेल्या निर्देशाचे जर पालन करीत करीत नसेल तर त्याचे काय करायला पाहिजे मा.महापौरजी, मा.महापौरजी, हे वारंवार असे म्हणतात की माझी येथे राहण्याची इच्छा नाही, जबरदस्ती मला ईकडे ठेवले आहे. मला परत पाठवुन दया, मी आमदारांचे ऐकत नाही, आम्ही तर नगरसेवक आहे. आता यांना ऐकायचंच कुनाचे नाही आहे हे चिफ इंजिनिअर नाही जे अधिक्षक अभियंता आहे ते ऐकत नाही. चिफ इंजिनिअर ऐकतात, चिफ इंजिनिअर म्हणुन जो अधिक्षक अभियंता अशा प्रकारचे शब्द वापरतात, जे आपली डयुटी पुर्ण करीत नाही, जे डयुटीवर आपले मुव्हमेंट रजिस्टर ठेवत नाही अशा मानसांवर चिफ इंजिनिअरनी काय कारवाई करायला पाहिजे जसे चिफ इंजिनिअर म्हणुन यांनी निर्देश दयावे यांना अडचणीचे होत असेल मा.महापौरजी सभागृहाने ही सर्व भावना ऐकुन मा.आयुक्तांनी निर्णय घ्यावा आणि आपण तसे निर्देश दयावे, ज्याला काम करायची इच्छा नाही त्याला येथे ठेवण्यास काहीच अर्थ नाही असे मला वाटते, यांच्या संपूर्ण चर्चेवरुन असे दिसते की फक्त हवेहवेमध्ये हे गोष्ट करतात म्हणुन मी यांना नमस्कार करतो, आपणही महानगरपालिकेने यांना नमस्कार करावा.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, हा संपुर्ण विषय सभागृहासमोर स्पष्ट झालेला आहे, नियमाअंतर्गत असणारी व्हीजीट बुक उपलब्ध नाही, मौका तपासणी करुन टेक्नीकल संक्शन दिले याचे सुध्दा प्रमाण उपलब्ध नाही, सोबतच सी.एस.आर. मधील सिव्हर लाईन आणि स्ट्रॅाम वॉटर लाईनमध्ये झालेले दर पृथकरण चुकीचे आहे ही सर्व बाब सभागृहासमोर निर्देशनास आली आहे. ज्यांच्याकडे ही जिम्मेदारी होती त्या अधिक्षक अभियंताच्या चुकीमुळे झालेले आहे असे लक्षात येते. म.न.पा. ने आपले स्वतःचे सी.एस.आर. तयार करावे असा सभागृहाने निर्णय घेतला होता त्याकडे सुध्दा दुर्लक्ष करण्यात आले आहे. एकीकडे मुंबई महानगरपालिकेचे स्वतःचे सी.एस.आर. आहे, सभागृहाने निर्णय घेतल्यानंतरही महानगरपालिकेचे सी.एस.आर. का तयार करण्यात

आले नाही. हे संपूर्ण प्रकरण गंभीर आहे म्हणुन अधिक्षक अभियंताला परत पाठवावे व नियमाप्रमाणे कारवाईचे निर्देश मा.आयुक्तांना दयावे.

महापौर :– मा.सत्तापक्ष नेता यांनी केलेली सूचना गंभीर प्रकारची आहे त्याला अनुसरुन आयुक्तांनी म.न.पा.चे सी.एस.आर. बनविण्याचे निर्देश दयावे, संबंधित अधिक्षक अभियंताला परत पाठवावे व नियमाअंतर्गत कारवाई करावी.

ठराव क्रमांक 168:– महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे

तरतुदींनुसार नागपूर शहराकरीता सुधारीत विकास योजना, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. TPS-2496-2843-CR-300(A)-97 UD-9, दि. 07.01.2000 व क्र. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, दि. 10.09.2001 नुसार मंजूर करण्यांत आलेली आहे. उक्त विकास योजना दि. 01.03.2000 व दि. 21.09.2001 पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाशी अधिसुचना क्र. TPS-2401/855/CR-76/UD-9, दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीतील सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 52(क) नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन “प्रशमित संरचना” म्हणुन घोषित करण्यासाठी शासन निर्णय क्र. TPS–1814–CR–82/14/नियम/नवि-13, दि. 07.10.2017 अन्वये अधिसुचना प्रसिध्द् केलेली आहे. उक्त अधिसुचनेनुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत मंजूर विकास योजना आराखडयात दर्शविण्यात आलेल्या निवासी उपयोगी/वाणिज्य उपयोगी / सार्वजनिक – निमसार्वजनिक उपयोग / औद्योगिक उपयोग हया जमिनीवर दि. 31.12.2015 पुर्वी पुर्ण झालेले अनधिकृत अभिन्यास, अनधिकृत भुखंडके, अनधिकृत बांधकामे तसेच अधिकृत अथवा मंजूरी प्राप्त अभिन्यासात करण्यांत आलेली विसंगत बांधकामे प्रशमन शुल्क आकारून नियमित करून घेण्याकरीता विशिष्ठ कालावधी ठरविणे आवश्यक असल्याने, उक्त कालावधी निश्चित करण्याकरीता सदर विषय मा. सभागृहापुढे मंजूरीकरीता ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

शासनाने, दि. 07.10.2017 रोजी मंजुर केलेल्या अधिसुचनेतील नियमावलीनुसार त्यांत खालीलप्रमाणे प्रावधान केलेले आहे.

नियम क्र. 3 :– These rules shall come into force at once.

नियम क्र. 9 :– Every Planning Authority shall, within six months From the commencement of these rules, publish notice, in local newspapers widely Circulated in its area, inviting applications, in the form provided by it in the public notice, from the owners or occupiers of unauthorized development, for consideration to declare such structure as compounded structure and stating therein the time and date on or before which the application must reach to it, and applications received thereafter shall not be considered.

कलम 52(क) नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन “प्रशमित संरचना” म्हणुन नियमीत करावयाची असल्याने सदर प्रशमित संरचनेच्या कार्यवाहीकरीता नागरीकांकडून / वास्तुविशारद/पंजीकृत परवानाधारक/ अभियंता यांचेकडून विहीत नमुद नमुन्यात संपुर्ण माहितीसह अर्ज प्राप्त करण्यास्तव मा. सभागृहाने ठरविल्यानुसार ज्या दिवशी उक्त जाहिर सुचना प्रसिध्द केल्या जाईल त्या दिनांकापासुन पुढील 6 महिन्याचे कालावधीत (कार्यालयीन वेळेत) असे विहित नमुन्यातील आवेदन पत्र स्विकारल्या जातील, या प्रमाणे प्रशासनाद्वारे प्रस्तावित करण्यात येत असुन हा कालावधी निर्धारीत करण्याचे तसेच विहित नमुन्यातील आवेदन पत्राचा नमुना, क्षतीपुर्तीबंध (Indeminity Bond) व हमीपत्राच्या नमुन्यास तसेच आवेदन पत्रासोबत रू. 5000/- ना परतावा तपासणी शुल्क घेण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून याबाबत विभागाने सखोल अभ्यास करून आगामी सभेमध्ये विस्तृत माहितीसह विषय सभागृहात सादर करावा या मा.सत्तापक्ष नेता श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार विषय कार्यालयास परत पाठविण्यांत येतो. याची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, 125 मध्ये चर्चा होत असतांना मागच्या सभेमध्ये गोंधळ झाला होता आणि तो विषय राहुन गेला होता आणि मला असे वाटते की त्या विषयावर चर्चा करणे अत्यंत महत्वाचे आहे.

महापौर :– मी विषय क्र 126 पुकारला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी विषय क्र 125 संदर्भात मी निवेदन करतो आहे. ते मान्य करणे न करणे तो सर्वस्वी आपला अधिकार आहे. मागच्या सभेमध्ये विषय क्र 125 वर चर्चा चालु असतांना सभागृहामध्ये गोंधळ झाला, ती चर्चा अर्धवट राहिली, हे माझे निवेदन आहे यावर आपण आपला निर्णय दयावा, तो मंजूर झाला की नामंजूर झाला. त्यावेळी दराच्या संदर्भात चर्चा चालु असतांना गोंधळ झाला होता असा माझा समज आहे. कदाचित गैरसमज असु शकतो. आपण माझा समज नक्की करावा.

महापौर :– 125 हा विषय मंजूर झालेला आहे आता 126 वर चर्चा करावी.

श्री.प्रकाश भोयर :– मा.महापौरजी, विषय क्र 126 वर मला सूचना दयायची आहे. मा.महापौरजी हमी पत्राच्या नमुन्यानुसार तसेच आवेदनपत्रा सोबत 5,000/ रुपये ना परतावा तपासणी शुल्क घेण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत. वास्तविक पाहता मा.महापौरजी, आपल्याला माहिती असेल की 5,000/ रुपये ना परतावा आपण घेतले तर मा.महापौरजी आम्ही राजकीय क्षेत्रातील अनेक कार्यकर्ता असल्यामुळे तो कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता असो, जेव्हा आम्ही एखादे आरोग्य शिबीर घेतो, आम्ही ते शिबीर निःशुल्क घेतो तेव्हा नागरिकांचा प्रतिसाद फार मोठया प्रमाणात असतो. आणि त्याचप्रमाणे 3,000/– रुपयांच्या टेस्टींग जर आम्ही 300/– रुपयांमध्ये करीत असतो तेव्हा आम्हाला तो प्रतिसाद फार कमी येतो. माझी विनंती आपणांस या संदर्भात आहे की हे 5,000/– रु ना परतावा आज घेण्यापेक्षा पुर्ण नागरिकांकडुन ते फ्री मध्ये घेण्यात यावे आणि त्यानंतर जेव्हा कंपाउन्डींग शुल्क एखादया व्यक्तीला लावु उदा. 55,000 हजार रु त्याचा कंपाउंडिंग शुल्क असतांना त्याचा भुखंड व बांधकाम क्षेत्रामध्ये ते प्लस करण्यात यावे, अर्ज घेत असतांना 5000 रुपये घेवु नये या पध्दतीने जर आपण 5000 रु घेतले, ही योजना जर आपल्याला यशस्वी करायची असेल तर अर्ज फ्री घ्या.उद्या चालुन जर 1 लाख अर्ज आपल्या महानगरपालिकेमध्ये आले आणि 60 हजार लोकांनी आपले घरे नियमीत करुन घेतले तर उरलेले जे 40 हजार आहे त्या संदर्भात नागपूर महानगरपालिकेमध्ये हा डाटा उपलब्ध नाही त्यानंतर जर आपल्याला उरलेल्या लोकांवर जर आपल्याला दंडात्मक करावाई करायची असेल तर आपल्याकडे असलेल्या डाटाच्या माध्यमातुन आपण त्यांच्यावर कारवाई करु शकतो. म्हणुन माझी या सभागृहाला आणि मा.महापौरजी व माआयुक्तांला अशी विनंती आहे की हे 5000 रु प्रथम आवेदन करतांना न घेता ते नंतर घ्यावे आणि त्यांचे जे कंपाउन्ड शुल्क आहे त्यामध्ये प्लस करण्यात यावे, ही आपणांस माझी सूचना आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, माझी आपल्यामार्फत प्रशासनाला विनंती आहे की, हे नोटीफिकेशन निघाल्यावर कुठल्या कुठल्या गोष्टींचे कंपाउन्डींग होणार आहे. मग कंजेस्टेड वस्तीमध्ये काय होणार आहे. इतर ठिकाणी काय होणार आहे. त्याची निट माहिती दिली पाहिजे, उद्या या सभागृहातुन निर्णय झाल्यानंतर वर्तमानपत्रामध्ये येईल की या कंपाउन्डींगला आपण मंजूरी दिली पण एक्झॅक्टली काय कंपाउन्डींग होणार आहे.

मग आपण मार्जीनल स्पेस सोडल्या की नाही सोडल्या या सगळयांची मराठीमध्ये माहिती दयावी, हा विषय फार महत्वाचा आहे. विशेषतः कजेस्टेड वस्त्यांसाठी महत्वाचा आहे, त्यामुळे सिलसिलेवार काय होणार आहे. मी जे अनधिकृत घर बांधले आहे त्यामध्ये माझे किती कंपाउन्डींग होणार आहे. याची निट माहिती प्रशासनाने येथे दयावी, त्यानंतर या विषयासंदर्भात अजुन चांगल्या सुचना आल्या त्याचा पण अवलंब करावा, माझी आपणातर्फे प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी माहिती दयावी.

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे) :— मा.महापौरजी, शासन निर्णय 07/10/2017 च्या अनुषंगाने कंपाउन्डींग चार्जेस आकारुन जे अनधिकृत बांधकाम आहे ते नियमीतीकरणाबद्दलचा प्रस्ताव आहे. दिनांक 31/12/2015 पुर्वी करण्यात झालेल्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात कंपाउन्डींग चार्जेस आकारुन त्या इमारती नियमीतीकरणासंदर्भात हा शासन निर्णय आहे. सभागृहाने त्या संदर्भात कालावधी निश्चित करुन तो प्रसिध्द करावयाचा आहे. त्यातील नियम क्र. 5 मध्ये जे अनधिकृत बांधकामे या संरचने अंतर्गत करुन विचारात घेतली जाणार नाही त्या संदर्भात मी माहिती सादर करतो. कोणत्याही कायद्यान्वये अथवा प्रतिबंधात्मक क्षेत्र जसे नदी, कालवे, तलाव, ब्लु लाईन, आणि रक्षा क्षेत्र जसे खदान, हेरीटेज इमारती, डंम्पींग ग्राउंड, पर्यावरणीय क्षेत्र जसे 1:5 पेक्षा जास्त उताराचे क्षेत्र, पहाड पट्टी जंगल, इत्यादी क्षेत्राच्या ठिकाणी अनधिकृत विकास कार्य करणे प्रतिबंध आहे. तसेच ज्या ठिकाणी बफर झोनची आवश्यकता असते व जो बफर झोन अंतर्गत येतो.

श्री.नरेंद्र (बाल्या) बोरकर :— मा.महापौरजी, हा सामान्य जनतेचा विषय आहे. या विषयासंदर्भात जी माहिती आहे ते विस्तृत मराठी मध्ये सर्व नगरसेवकांना दयावे आणि नंतर विषय परत आणावा.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, हा जो विषय आहे शासनानी अतिरिक्त बांधकाम जे आहे ते संपुर्ण रेगुलर करण्यासंबंधी घेतलेला निर्णय आहे.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, नागपूर शहरात अनेक शेत्या होत्या त्यावर कुठलिही परवानगी न घेता लेआउट निर्माण झालेले आहे. अशा लेआउट ला महानगरपालिकेव्दारे आपण मंजूरी देणार आहे काय? त्या संदर्भात सुध्दा माहिती देण्यात यावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, कंपाउन्डींग आपण किती क्षेत्रापर्यंतच्या बांधकामाचे करणार आहोत, जर एक एफ.एस.आय. अनुज्ञेय आहे जर त्यांनी एक एफ.एस.आय. पर्यत बांधकाम केले ते रेगुलराईज होणार आहे काय? साईड मार्जिनमध्ये आपण रिलॅक्सेशन देणार आहे काय? या संदर्भामध्ये कंन्फुजन आहे. या विषयासंदर्भात श्री.प्रविणजी दटके असतील, बाल्याजी बोरकर असतील त्यांनी हा जो विषय उपस्थित केला की याचा कालावधी आपल्याला निश्चित करायचा आहे की कुठल्या कालावधी पर्यत हे धोरण राबवायचे आहे आणि प्रशासनाच्या माध्यमातुन जो कालावधी प्रपोज करण्यात आला तो 6 महिन्यापर्यतचा कालावधी प्रपोज केलेला आहे. मा.महापौरजी हा 6 महिन्याचा कालावधी कमी पडतो साधारणतः नागपूर शहरात 5 लाख मालमत्ता धारक आहे आणि अपेक्षित दोन ते अडीच लाख अनधिकृत बांधकामे किंवा अधिकचे बांधकाम झालेले जर लोक असतील तर अडीच लाख लोकांना पुढच्या 6 महिन्यामध्ये आपले नकाशे तयार करणे आणि ते महानगरपालिकेच्या ऑफीसमध्ये सबमिट करणे त्याला मंजूरी घेणे हा कालावधी कमी पडतो म्हणुन मा. महापौरजी हा 8 ते 10 महिन्याचा कालावधी असला पाहिजे. याची पॉलिसी जी आहे ती स्वयंस्पष्ट सभागृहामध्ये आपण घेवुन या की आपण यामध्ये कुठले कुठले रिलॅक्सेशन यामध्ये अनुज्ञेय करणार आहे आणि त्याचे प्रचलित शुल्क काय राहील? या संदर्भातील विस्तृत माहिती घेवुन हा विषय आपण पुन्हा एकदा सभागृहामध्ये आणावा.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, यामध्ये लिहीले आहे की सेवन स्कीम वगळुन एन.आय.टी. काही दिवसानंतर डिसॉल्व होत आहे तो ही भाग आपल्याचकडे आहे त्यामुळे हा फार विचारपुर्वक करण्यासारखा विषय आहे. आपण जर आज येथे मंजूर करुन घेतले उद्या नागरिकांना काय सांगणार आहे नगरसेवकांना सुध्दा काहीही माहीत नाही. उद्या तुमच्या घरी कोणी येणार नाही. नगरसेवकांच्या घरी रांगा लावतील, त्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की, ही पॉलिसी सुस्पष्ट करावी, याचे प्रेझेंटेशन करावे, माझी तर आपणासं विनंती आहे की पेपरमध्ये पुर्णच्या पुर्ण ॲड दयावी की या गोष्टी होणार आहे, या गोष्टी होणार नाही आणि मग सभागृहात ही पॉलिसी आणावी जेणेकरुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल, ज्यांनी अनधिकृत बांधले आहे. जे नियमात होईल तेच होईल आणि जे अतिक्रमन आहे ते तुम्हाला तोडता येईल आज आपण हे मोघम केले तर आपण अडचणीमध्ये जाउ म्हणुन माझी या सभागृहातर्फे मा.विरोधी पक्षनेते असतील सभागृह नेते असतील मा.महापौरजी

असतील यांना माझी विनंती आहे की पॉलिसी निट आणुनच यावर निर्णय करावा.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, माझी यामध्ये आपणांस विनंती आहे की, प्रशासनाने तो आराखडा तयार करावा कारण की कंजेस्टेड जे घर आहे, भिंतीला लागुन भिंत आहे, तसेच कॉमन भिंत आहे. आणि कॉमन भिंतीवर त्यांनी घर तयार केले आहे कंजेस्टेड घरामध्ये, ज्यांचे बंगले असतील, चांगली प्रशस्त जागा असेल, एखादे त्यांनी टिनाचे शेड टाकले असेल, तिथपर्यंत ठिक आहे. जे म्हाडाच्या कॉर्टरमध्ये किंवा जे ईकॉनॉमीकल विकर कंडीशन असेल एन.आय.टी ने जे 350 स्केअर फुट, 400 फुट, 600 फुट अशा पध्दतीचे जे केलेले आहे. त्या लोकांकरीता जो आपण ठराव पास केला आहे की आपण जी प्लस थ्री मध्ये आपण त्यांना करणार आहे. त्याला आपण सरसकट बांधकामाला मंजूरी देणार आहोत की, त्याच्या 3 ते 4 शेडला मंजूरी देणार आहोत की मागच्या साईडला जी ओपन जागा आहे त्याला आपण मंजूरी देणार आहोत. प्रत्येकांनी वेगवेगळया पध्दतीचे बांधकाम आपल्या सोयीने केले आहे.

श्री.संजय बंगाले :— मा.महापौरजी, या विषयावर अत्यंत गंभीर चर्चा सभागृहात सुरु आहे. नागपूर शहरात सात ते साडेसात लाख लेआउट आहे. स्लममध्ये जे रिझर्वेशन आहे त्यासंदर्भात धोरण ठरविण्याचा विषय आहे. त्यामुळे माझी मा.महापौरजी यांना विनंती आहे की स्थापत्य समितीकडे हा विषय अग्रेषित करुन या मध्ये जे गटनेते आहे त्यांना बोलावुन त्यांच्यासमोर प्रेझेंटेशन करुन उपरोक्त विषय पुढच्या सभागृहाच्या बैठकीमध्ये आणावा.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, या संदर्भात एक स्पेशल सभागृह घ्या, त्यामध्ये सर्व नगरसेवकांना बोलवा, सर्व आर्कीटेक्ट लोकांना बोलवा, ज्यांना ज्यांना वाटते त्यांना बोलवा, जनतेसमोर करुन घ्या, परंतु पुढच्या सभागृहात हा विषय आला पाहिजे. दोन्ही विषय आहे हा विषय लवकर व्हायला पाहिजे आणि सर्वासमोर यायला पण पाहिजे.

श्री.अभय गोटेकर :— मा.महापौरजी, ऑक्युपेंन्सीचा हा विषय आहे हा विषय लवकरात लवकर मंजूर करुन घ्यायला पाहिजे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या विषयासंदर्भात ज्या काही सूचना सन्माननिय सदस्यांनी दिलेल्या आहे त्या सूचनांचा अंतर्भाव करुन त्यांच्या ज्या काही क्युरी आहे त्यावर येणाऱ्या 15 दिवसाच्या कालावधीमध्ये या संपूर्ण सभागृहामध्येच सभागृहातील संपूर्ण नगरसेवकांच्या संबंधित असणारे जे कोणी पत्रकार आहे, त्या सर्वांना या ठिकाणी बोलावुन त्यांच्यासमोर अभ्यासपुर्ण प्रेझेंटेशन करुन त्यांच्या प्रश्नांना उत्तर देवुन येणा—या 20 तारखेला मार्च महिन्याच्या सभागृहातच कोणत्याही स्थितीत हा विषय पुन्हा घेवुन यावा असे निर्देश आपण प्रशासनाला दयावे.

ठराव क्रमांक 169:— विकास योजना — नागपूर.

शासन निर्णय क्र. टिपीएस—2406/3490/प्र.क्र.108/08/नवि—9, दि. 17.04.2008 रोजीचे मंजुर अधिसुचनेद्वारे मौजा — भानखेडा, सर्व्हे क्र. 85, नगर भुमापन क्र. 1396,1397 मधील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर परीसरात दर्शविण्यात आलेल्या 18.00 मी. रूंद (उत्तर—दक्षिण) विकास योजना रस्ता वगळून सदर क्षेत्र सार्वजनिक—निमसार्वजनिक भागात समाविष्ट करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये जागेच्या वापरात फेरबदल करणेबाबत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे तरतुदीनुसार नागपूर शहराकरीता तयार करण्यांत आलेली सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस — 2496 — 2643 — सी.आर. — 300 (ए) — 97 — युडी — 9, दि. 07.01.2000 व क्र. टीपीएस — 2400 — 1628 — सी आर —200 — 2000 —यु.डी.—9, दि. 10.09.2001 नुसार मंजुर करण्यांत आलेली आहे. तसेच शासनाचे, नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस— 2401/855/ सीआर— 76 /युडी—9 दि. 27/02/2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीतील सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरित नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण

म्हणुन घोषित केलेले आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर परिसरातील पायाभुत सुविधा आधुनिकीकरणाबाबत नागपूर सुधार प्रन्यासव्दारे इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय क्षेत्र लगतच्या जमिनीवर बि.ओ.टी. तत्वाव्दारे व्यावसायिक वापराकरीता देण्यात येणाऱ्या क्षेत्राला विभक्त होण्याकरीता कलम 37(2) अन्वये विकास आराखडयात शासन निर्णय क्र. टिपीएस–2406/3490/प्र.क्र.108/08/नवि–9, दि. 17.04.2008 चे मंजुर अधिसुचनेनूसार 18.00 मी. रूंद रस्ता समाविष्ट करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आलेली होती.

दरम्यान बि.ओ.टी प्रस्ताव नामंजुर झाल्याने नागपूर सुधार प्रन्यासतर्फे आधुनिकीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्याने, उक्त 18.00 मी. रूंद रस्त्याची आवश्यक नसल्याने सदर रस्ता वगळून, रस्त्याअंतर्गतची जागा पुर्ववत सार्वजनिक–निमसार्वजनिक झोन मधे समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मा. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर यांच्याद्वारे विभागास प्राप्त झालेला आहे. त्यानूसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये 18.00 मी. रूंद उत्तर–दक्षिण विकास योजना रस्ता वगळून पुर्वस्थितीत सार्वजनिक व निमसार्वजनिक झोनमधे समाविष्ट करणेस्तव प्रस्तावित असुन उक्त जागा हि नझुल सरकार मेडीकल विभाग, मेयो हॉस्पीटल यांचे मालकीची आहे.

सबब सदर प्रस्तावातील फेर बदलासंबंधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे केल्यानंतर मौजा – भानखेडा, सर्व्हे क्र. 85, नगर भुमापन क्र. 1396,1397 मधील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर परीसरातील 18.00 मी. रूंद (उत्तर–दक्षिण) विकास योजना रस्ता हे आरक्षण रद्द करून रस्त्याअंतर्गतची जागा सार्वजनिक–निमसार्वजनिक झोन मधे समाविष्ट करण्यासाठी महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्रमांक 170ः– मौजा भानखेडा येथील 1) खलाशी लाईन, शिव मंदीर जवळ 2) खलाशी लाईन, बौध्द विहार जवळील म.न.पा.चे सार्वजनिक संडास तोडण्याचे प्रस्तावास दि. 14.11.2017 राजी मा. आयुक्त यांनी मान्यता देवून त्यास सभागृहाची मान्यता आवश्यक असल्याने महासभेचे निर्णयार्थ सादर केलेले आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाला मा. सदस्य श्री. प्रविण दटके यांनी यांनी सादर केलेल्या उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

उपसुचना

मागील 20 वर्षापासून गाडीखाना येथे नागपूर म.न.पा.ने खुल्या जागेत संडास बांधलेले आहेत. मागील अनेक दिवसांपासून वस्तीतील सर्व नागरिकांनी स्वतःचे संडास स्वतःच्या घरी बांधलेले आहे. तेव्हा खुल्या जागेत बांधलेल्या संडासामुळे तेथे दररोज घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्याचा वाईट परिणाम आजूबाजूला राहणा–या लोकांच्या आरोग्यावर होतो. या सर्व बाबींचा विचार करून खुल्या जागेत बांधलेले संडास तोडण्यात यावे.

हस्ता/–सुचक प्रविण दटके
हस्ता/–अनुमोदक नेहा नरेंद्र वाघमारे

ठराव क्रमांक 171:– नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा (जिल्हास्तर) योजना अंतर्गत एकुण रू. 70,00,000/– रकमेचा 3 (तीन) कामाचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचे असून या कामाकरीता महाराष्ट्र शासन यांचे 100 टक्के अनुदान प्राप्त असून या करीता म.न.पा. च्या दक्षिण नागपूर क्षेत्रातील खालील दिलेल्या यादीनुसार एकूण 3 कामांचा समावेश करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनीय राशी | तांत्रीक मंजूरीचे क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. 34 सिध्देश्वरी येथे गडर लाईनचे काम करणे | रू. 2499000 | 66/ई.ई. (झोन–3) दि. 23.10.2017 |
| 2 | प्रभाग क्र. 34 बाबा ताजूददीन नगर व मॉ भगवती नगर येथे गडर लाईनचे काम करणे | रू. 2450000 | 67/ई.ई. (झोन–3) दि. 23.10.2017 |
| 3 | प्रभाग क्र. 34 मॉ भगवती नगर येथे गडर लाईनचे काम करणे | रू. 2051000 | 68/ई.ई. (झोन–3) दि. 23.10.2017 |
| | एकूण राशी | रू. 7000000/– | |

ठराव क्रमांक 172:– नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाद्वारे होणाऱ्या मालमत्ताच्या खरेदी विक्रीची व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता कर भरणा केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्या संदर्भात प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

मा. सभापती कर आकारणी व कर संकलन समितीच्या दिनांक 29.05.2017 बैठकीत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाद्वारे होणाऱ्या मालमत्ताच्या खरेदी विक्रीची व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता कर भरणा केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्या संदर्भात सदर प्रस्ताव तयार करुन सभागृहाची मान्यता घेऊन प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीकरिता पाठविण्याचा निर्णय कर आकारणी व कर संकलन समितीने घेतलेला आहे.

तसेच कर आकारणी व कर संकलन समितीच्या निर्देशानुसार संबंधित विषय स्थायी समिती अध्यक्षाकडे मंजुरीकरिता पाठविण्यात आला. समिती ठराव क्र. 240 दि. 16.11.2017 रोजी विचारात घेऊन मंजुरी प्रदान केली. महानगरपालिका सभागृहाची मंजुरी आवश्यक असल्यामुळे महानगरपालिकेच्या सभागृहा पुढे खालील प्रश्न विचारात घेण्याकरिता पाठविण्यात येते.

नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत मालमत्ता खरेदी विक्रीची प्रकरणे नागपूर शहरातील चार दुय्यम निबंधक कार्यालयात हजारो मालमत्तांची नोंदणी होत असते. मालमत्तेच्या खरेदी विक्रीची नोंदणी करतांना मालमत्तेसंबंधी मुद्रांक शुल्क अन्य नोंदणी शुल्काचा महसुल दुय्यम निबंधक कार्यालयाद्वारे मालमत्ता धारकांकडुन वसुल केला जातो.

परंतु खरेदी विक्री नोंदणी करतांना विक्रेता संबंधित मिळकती करीता updated मालमत्ता कर आकारणी

वरुन घेऊन पावती सादर न करता मिळकतीच्या जुन्याच Status च्या अनुषंगाने असलेल्या मालमत्ता कराची पावती सादर करतो. त्यामुळे मिळकतीमध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने करावयाचे मालमत्ता कर पुनर्निधारण वेळीच होत नाही व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. हयाकरिता मालमत्ता कर व कर आकारणी विभागाचे उक्त मिळकतीच्या मालमत्ता कर संबंधी ''ना हरकत प्रमाणपत्र'' मिळकतीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराची नोंदणी करता सक्तीचे करण्याचे निर्देश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना शासन स्तरावरुन देणेबाबत शिफारास करणेबाबत निर्णय सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, विषय क्र 130 वर जो विषय आहे की महानगरपालिकेचे ना—हरकत प्रमाणपत्र घेतल्या शिवाय आपण खरेदी विक्री व्यवहार करण्यासाठी आपण बंदी आणु, मा.महापौरजी, खरेदी विक्रीचे जे अधिकार आहे ते स्टॅम्प ॲक्टनुसार होते. कायदयामध्ये अशी काही तरतुद आहे काय की महानगरपालिकेचे सभागृह स्टॅम्प ॲक्ट कसे बदलु शकते किंवा याचे इम्प्लीमेंटशेन कशा प्रकारे होईल या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौरजी, सन्मानिय सदस्यगण दिनांक 20/03/2017 रोजी कर आकारणी व कर संकलन विशेष समिती मधील बैठकीमध्ये सूचना सूचविल्या की जे भुखंड डेव्हलप करतात ते डेव्हलप केल्यानंतर त्यावर फ्लॅटस्कीम तयार होते, ती फ्लॅट स्कीम झाल्यावर लगेच त्याचे असेसमेंट होण्याकरीता जे बिल्डर आहे किंवा बांधकाम व्यवसायिक जे आहे ते जुन्याच मालमत्ता कर रिसिप्टवर आपली रजिस्ट्री करुन घेतात. त्या अनुषंगाने त्या विशेष समितीने सूचना केली होती आणि सदरहु सूचना स्थायी समितीने ठराव क्र 240 दि. 16/11/2017 रोजी शिफारस केली आणि केलेली शिफारस ही सभागृहाला निर्णय घेण्याकरीता प्रस्तुत करण्यात आली आहे.

श्री.अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, या विषयामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की समितीने शिफारस केलेली आहे सभागृहाची मान्यता घेवुन प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजूरी करीता पाठविण्याचा निर्णय कर आकारणी व कर संकलन समितीने केला आहे. त्यामुळे मा.प्रफुल्लजीने म्हटले की आपल्याला अधिकार आहे काय? आपल्याला अधिकार नाही त्यामुळे आपण हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवित आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, या ठिकाणी कर संकलन समितीने जो ठराव केला त्याला मा.स्थायी समितीनेसुध्दा मंजूरी प्रदान करुन सभागृहापुढे पाठविलेला आहे. मा.महापौरजी, आपण कुठलेही टॅक्स रिकव्हरी बंधने टाकुन आणु शकत नाही. त्याची एन.ओ.सी. घेतांना आता मेश्राम साहेबांनी सांगितले की लोक फ्लॅट स्किम करतात परंतु टॅक्स भरत नाही. टॅक्सच्या संदर्भामध्ये आपण या सभागृहामध्ये एक विशेष बैठक घेतली आणि त्यावर चर्चा झाली. चुकीच्या पध्दतीने टॅक्स आकारणी होत आहे. मा.महापौरजी 1/04/1970 पासुन जुन्या इफेक्टनी टॅक्स आकारणी होत होती ती चुकीच्या पध्दतीने होत होती आणि आमचा टॅक्स कमी करा म्हणुन नागरीक फिरत होते. मागच्या वेळी सभागृहाने ठराव केला त्याचा 1/4/2015 पासुन त्याचा इफेक्ट दिसला आणि मग आमच्या दटके साहेबांनी त्यावर नोटीस आणली आणि 01/04/2015 पासुनचा इफेक्ट देणारा ठराव रद्य करण्याची त्यांनी शिफारस केली. आता त्याचा नविन इफेक्ट आता 01/04/2017 पासुन होईल आणि तो पण इफेक्ट चुकीचा आहे. अशा चुकीच्या पध्दतीने कर आकारणी होत आहे. त्याला आपण नोटीस न देता कर आकारणी करीत आहे. त्याची डिमांड त्याला मिळत नाही आणि त्याचा आक्षेप घेण्याचा सुध्दा आपण त्याला अधिकार देत नाही आणि अशा पध्दतीमध्ये नविन बंधने त्याच्यावर लादु की आपण टॅक्स भरल्याशिवाय तुम्हाला एन.ओ.सी. मिळणार नाही आणि एन.ओ.सी. मिळाल्याशिवाय रजिस्ट्री होणार नाही, अशी शिफारस आहे आणि ही पुर्णतः अन्यायकारक शिफारस आहे. दुसरा यामध्ये महत्वाचा विषय असा आहे की, लोक आक्षेप घेण्याकरीता किंवा म्युटेशनसाठी अर्ज केल्यानंतर किती दिवसापर्यत आपले अर्ज पेंडींग राहतात, एकीकडे आपण नागरिकांवर बंधन टाकतो की आपण टॅक्स भरला पाहिजे आणि नियमित भरला पाहिजे पण दुसरीकडे कर्मचाऱ्यांवर बंधन नाही. त्यांच्याकडे आलेल्या अर्जाचा निपटारा किंवा असेसमेंट नोटीस, कायद्याप्रमाणे त्याला कारवाई पुर्ण केली पाहिजे यामध्ये महानगरपालिकेमध्ये काम करणा—या प्रशासनाचे कुठलेही धोरण नाही.

श्री.अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, नागपूर शहरामध्ये एकापेक्षा जास्त डेव्हलपमेंट अथॉरिटी आहे. ती म्हणजे नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगरपालिका, दोन डेव्हलपमेंट अथॉरिटी आहे आणि साधारणतः फक्त मेश्राम साहेबांच्या एका शब्दामध्ये येथे गल्लत होत आहे. हा विषय फक्त

बिल्डर आणि डेव्हलपर करीता मर्यादीत नाही, ज्यावेळी एखादी प्रॉपर्टी रिसेल होते त्यावेळी त्याच्या ॲग्रीमेंटमध्ये असे असते की विकत घेणाऱ्यावर सर्व लायबिलीटी येणार आणि विकत घेणा—यावर लायबिलीटी येत असतांना आपली जी टॅक्स प्रणालीवर प्रफुल्लजींने प्रकाश टाकलेला आहे आणि शहराचा व्याप पाहता आपले कर्मचारी शेडयुल प्रमाणे जे असेसमेंट व्हायला पाहिजे ते होवु शकत नाही. त्यामुळे अनेक वेळा असे आढळले की 1991 च्या टॅक्स रिसिप्टवर आजही अनेक लोक टॅक्स भरीत आहे. आणि ती रिसीप्ट दाखविल्यानंतर टॅक्स पेड असा त्याचा अर्थ निघतो. पण ज्यावेळी विकत घेणारा ज्यावेळी ती प्रॉपर्टी विकत घेतो त्यावेळी सर्वच्या सर्व 1991 पासुनचे ऐरिअर्स विकत घेणा—यावर लागतात. आणि त्याच्यामध्ये आता जो आपल्याकडे नविन नियम आला की आपल्याला नविन प्रॉपर्टीचे टॅक्सचे असेसमेंट करतांना अनेक जे प्लॉट एन.आय.टी. च्या 572/1900 मध्ये ते सुध्दा रिसेल होत आहे. आणि ज्यावेळी त्याची असेसमेंट करण्याची वेळ येते त्यावेळी 10 वर्ष मागे आपण जावु शकत नाही. तो भुर्दंड विकत घेणा—यावर लागतो त्यामुळे हा एक इंटरलॉक आहे आणि तो इंटरलॉक ज्या ज्या वेळी खरेदी विक्री होईल संबंधीत मालमत्तेची किंवा फ्लॅटची त्यावेळी त्याला ॲटोमॅटीकली नागपूर महानगरपालिकेमध्ये यावे लागेल आणि याच्यामध्ये एक सूचना आहे त्या सूचनेमुळे प्रफुल्लजींचे समाधान होईल, ती सूचना महत्वाची आहे. ही जी शब्दरचना या ठिकाणी केली आहे की नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक नियंत्रक विभागातर्फे होणा—या मालमत्तेच्या खरेदी विक्रीचा व्यवहाराची नोंदणी करतांना मालमत्ता कर भरल्याबद्दल ना—हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्यासंदर्भातील प्रश्न विचारात घेणे त्याऐवजी नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक नियंत्रक विभागाव्दारे होणा—या मालमत्तेची खरेदी विक्रीच्या व्यवहाराची नोंदणी करतांना प्रचलित दराप्रमाणे चालु वर्षापर्यंत मालमत्तांचे कर निर्धारण करुन मालमत्ता कर भरणा केल्याबद्दलचा ना हरकत प्रमाणपत्र सक्तीचा करावा असे जर असते तर मा.प्रफुल्लजींने जो आक्षेप घेतला तो आक्षेप निरस्त होईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मालमत्ता कर नियमाप्रमाणे आपल्याला असे कुठलेही बंधन टाकता येणार नाही. की खरेदी विक्री करतांना आपण हे ना—हरकत प्रमाणपत्र घ्यावे, मी या संदर्भात अनेक त्रुटया सांगितल्या, आणि 2012 मध्ये एक बातमी आली होती की नागपूर शहराच्या थकबाकीदारामध्ये प्रफुल्ल गुडधे सर्वात मोठा कर थकबाकीदार आहे. मा.महापौरजी, सर्वात मोठा कर थकबाकीदार ही लिड बातमी होती, त्यामध्ये भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या अनेक नगरसेवकांच्या नावे आले की अनेक नगरसेवक थकबाकीदार आहे. आता मी माझे उदाहरण सांगतो की मी ज्या भुखंडावर फ्लॅट स्कीम उभी केली त्याचा पुर्ण कर भरला आहे एका भुखंडावर अनेक मालमत्ता तयार झाली त्या ठिकाणी 50 फ्लॅट तयार झाले, त्याचे असेसमेंट पण सुरु झाले ते लोक नियमीत कर भरीत आहे. मात्र जुन्या भुखंडधारकाची कर मालमत्ता ती रद्य झाली नाही तो थकबाकीदार आहे. मा.महापौरजी, या ठिकाणी सन्माननिय ठाकरे साहेबांचा अनुभव माझ्यापेक्षा अधिक आहे मात्र माझे म्हणणे आपण ऐकुन घ्यावे, अशा पध्दतीने टॅक्सवर अनेक बंधन आणत आहे. लोक डिफॉल्ट होत असल्याचे अनेक कारणे आहे या ठिकाणी ट्रान्सपरन्सी नाही, रेंन्ट चार्ट बरोबर नाही, कुणाला तिनपट लावुन टाकले अशा अनेक चुका झाल्या त्या वेळोवेळी आपण दुरुस्त करीत गेलो, मधल्या काळामध्ये रेंन्ट चार्ट आला त्याच्यावर विरोध होता त्यानंतर कॅपीटल बेस व्हॅल्युव करायचे की ॲन्युअल लिटील व्हॅल्युव बेस करायचे यामध्ये संभ्रम होते अनेक कारणांमुळे लोक थकबाकीदार झाले, चुकीच्या कर आकरणीबाबत लोक थकबाकीदार झाले, मा.महापौरजी, म्युटेशनसाठी अर्ज केला, म्युटेशनचे कितीतरी अर्ज 2009 पासुन पेंडींग दाखवित आहे. मागच्या वर्षी एक विशेष कॅम्प घेतला होता आणि प्रभागातील नागरिकांचे म्युटेशनचे अर्ज मी स्वीकारुन झोन कार्यालयामध्ये दिले, किती म्युटेशनच्या अर्जाचा निपटारा झाला मा.महापौरजी, अजुनही म्युटेशन झाले नाही. कर आकारणी व्यवस्थेमध्ये जर त्रुटया आहे आणि वरतुन आपण जर असे अनेक बंधन आणत असेल की त्यांनी एन.ओ.सी. घेतली पाहिजे जो पर्यत तुम्ही एन.ओ.सी. धेत नाही तोपर्यत रजिस्ट्री करता येणार नाही. मला असे वाटते की हे पुर्णतः चुकीचे होईल आणि अन्यायकारक होईल, मा.महापौरजी, सत्तापक्षांची या संदर्भामध्ये काय भुमिका असेल त्यांनी मांडावी.

श्री.विजय झलके :— मा.महापौरजी, प्रॉपर्टी ऑफ ट्रान्सपर ॲक्ट जो आहे त्यातील सेक्शन 22 (ए) नुसार कॉम्पीटंट अथॉरिटीकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. त्याच्यामुळे सेलडिड लावत असतांना आपण जर नागपूर महानगरपालिकेचा जर टॅक्स भरला आणि ना—हरकत प्रमाणपत्र जर घेतले तर त्याला काही हरकत नाही असे मला वाटते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, सत्तापक्षाचा जर या संदर्भात जर सपोर्ट असेल तर यामध्ये आमचा

विरोध नोंदवावा आणि हा प्रस्ताव मतदानासाठी टाकावा की अशा प्रकारे कुठल्याही प्रकारचे ना–हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी आपण नविन बंधन नागरिकांवर लादु नये ही कॉग्रेस पक्षांची आणि विरोधीपक्ष नगरसेवकांची धारणा आहे आणि त्यांचे म्हणणे आपण पटलावर नोंदवुन घ्यावे, यासंदर्भात जर आपल्यापेक्षा विभिन्न मत असेल तर ते आपण या संदर्भात मतदान घ्यावे आणि हा प्रस्ताव सभागृहापुढे मतदानासाठी ठेवावा.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.प्रफुल्लजींने जो मुद्या मांडला आहे त्याच्यामध्ये वस्तुस्थिती आहे. या संदर्भात मागे मी आयुक्त साहेबांना बोललो की साहेब आपण पब्लीकमध्ये जावुन, नगरसेवकांना विश्वासात घेवुन त्या त्या परिसरात कॅम्प लावुन आपण कर घ्यावा. आता कराच्या संदर्भात जे ऑब्जेशन घेतले आहे, हाउस ने दोनपट कर लावला आहे आणि कर आकारणी विभागाने त्या ठिकाणी पाचपट कर लावला आहे. आपल्या कार्यालयाकडून अशा प्रकारच्या ज्या चुका होत आहे आणि आपल्याकडे म्युटेशनच्या ज्या केसेस आहे त्या केसेस किती दिवसामध्ये म्युटेशन अर्ज दिल्यानंतर केले पाहिजे याचे उत्तर विभागाने मला दयावे..

श्री.अविनाश ठाकरे :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, अतिशय योग्य प्रश्न उपस्थित करीत आहे. कारण म्युटेशनचे अर्ज का प्रलंबित प्रश्न आहे, कारण जुने ऐरिअर्स प्रलंबित आहे. जुने ऐरिअर्स प्रलंबित असल्यामुळे म्युटेशन होणारच नाही.

श्री.तानाजी वनवे :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, कुणाकडे एकही पैसा किंवा जुना कर बाकी नसतांना सुध्दा म्युटेशन करण्यासाठी दोन–दोन वर्ष लागतात, तिन–'तिन वर्ष लागतात मी आपल्याला त्या फाईली पुढच्या वेळला आणुन देतो, त्यांचे म्युटेशन का झाले नाही. आणि हीच स्थिती झोपडपट्यामध्ये आहे. मोठया बंगल्यांचा मी विषय नाही करीत, जे प्रफुल्लजी म्हणत आहे की एन.ओ.सी चा जो प्रश्न आला तर तो आपले घरच बांधु शकणार नाही आणि शासनाचे मुद्रांक शुल्कामध्ये मोठया प्रमाणात नुकसान होईल, म्हणुन प्रफुल्लजींने जे म्हटले आहे ते जर मंजूर करायचे असेल तर ते मंजूर करा आपण मतदान घेवुन तो विषय आपण घेवु शकता याला आमचा कट्ट्र विरोध आहे.

श्री.जगदीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, इस विषय के संदर्भ मे कई लेआउट या स्लम मे प्रशासनने म्युटेशन करने के लिये दो–दो साल तिन– तिन साल लगाते है, और इस संदर्भ मे आपके पास स्टाफ कम होंगा तो स्टाफ को बढाओं लोग पैसे भरने के लिये तैयार है, और हमारा खजाना खाली है। ऐसी स्थितीमें एक ठोंस कदम उठाकर लोगोंका म्युटेशन कराना चाहियें, सत्तापक्षनेता और प्रफुल्लजींने जो विषय यहापर रखा है इसके लिये जनता की परेशानी हटायें और अपना इनकम बढायें।

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, कई झोनमे सर्व्हर डाउन रहता है उसका भी हमारे आय के उपर परिणाम पड रहा है। सर्व्हर डाउन रहने से कई लोग वापस चले जाते है इसलीयें सर्व्हर के उपर भी ध्यान देना चाहियें।

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, निश्चिती रुपसे यह जो प्रस्ताव एन.ओ.सी. का लाया हुवा है इसपर मेरा विरोध है। इसके भी पहले यह विषय पर ध्यान आकर्षीत किया था की किस तरह से नागपूर महानगरपालिका की आय बढायी जायें । कर वसुली के संदर्भ मे एक विशेष बैठक सदन के अंदर बुलायी गयी थी सबने अपने उपाय योजना वसुली को लेकर दी थी। लेकीन उन किसी भी चिज को अंमल न करके एक नया प्रस्ताव एन.ओ.सी. का लाकर नागपूर की जनता को त्रस्त करने का कार्य इस प्रस्ताव के माध्यम से किया जा रहा है। इसलिये इस प्रस्ताव का हम विरोध करते है।

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, एक अत्यंत महत्वाच्या आणि गंभीर विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे. खरे म्हणजे कर संकलन समितीला ही आवश्यकता का पडली, याचा देखील विचार करणे आज आवश्यक आहे. सन्माननिय विरोधी पक्ष नेत्यांनी, सन्माननिय प्रफुल्ल गुडधे यांनी जे मत मांडले त्याच्यावर देखील विचार करणे आवश्यक आहे. ही खरी परिस्थिती आहे. की ज्या पध्दतीने प्रशासनाने मागच्या 8 ते 10 वर्षातीलच नव्हे तर त्याच्या पुर्वीपासुन जी काही सिस्टीम ठरविली आहे. त्या सिस्टीममध्ये अनेक प्रकारच्या त्रुटया या निश्चितच निर्माण झाल्या आहे. मग त्या झोनस्तरावर असेल, केंद्रीय स्तरावर असतील, त्यामध्ये देखील गडबडी निश्चित आहे. परंतु हे होत असतांना असे एक दोन नव्हे तर असे अनेक प्रकरणे या शहरात आहे की ज्या प्रकरणामध्ये म्युटेशन होत नाही हे जरी सत्य असले किंवा म्युटेशनच्या फाईली पडलेल्या असतात ते जरी सत्य असले ज्याचे समर्थन करने निश्चीतच बरोबर नाही. त्याचे समर्थन किंबहुना कोणी करणार नाही. ते होत असतांना

एखादा सर्वसामान्य गरीब मानुस एखादी प्रॉपर्टी विकत घेतो, त्या प्रॉपर्टीच्या वेळेला त्याला सांगण्यात येते की या प्रॉटर्टीचा टॅक्स मी भरलेला आहे ऑलरेडी आणि ज्यावेळी त्याची सेलडिड होते आणि सेलडीड झाल्यानंतर वर्षभर झाल्यानंतर त्याला कळते की आपल्या प्रॉपर्टीवर जुन्या ओरीजनल मालकाने अनेक हजारो आणि लाखो रुपयांचा टॅक्स भरला नाही. आता तो टॅक्स भरायला जवाबदार हा तो व्यक्ती असतो हे पण सत्य आहे. स्लम मध्ये असे अनेक प्रकरणे होतात, स्लममध्ये लोक आपआपले प्रॉपर्टी सहज विकतात त्यावेळी जुनी जी थकीत प्रॉपर्टी असते ती थकीत प्रॉपर्टी टॅक्स हा ते भरत नाही आणि तो भरला नसतांना सर्वसामान्य गरीब व्यक्ती जेव्हा मोठया उत्साहाने स्वतःचे घर म्हणुन नविन प्रॉपर्टी विकत घेतो त्यावेळी काही दिवसांनी त्याला कळते ज्यावेळी त्याला डिमांड येते, म्युटेशनच्या वेळी त्याला कळते की याच्यावरती हजारो रुपयांचा टॅक्स थकीत आहे आणि त्यामुळे मी कर समिती अध्यक्षांचे मी अभिनंदन करतो की या पध्दतीचा विषय आणुन सर्व सामान्य मानसाला येणा–या पुढच्या काळामध्ये जी काही समस्या निर्माण होईल, ती समस्या निर्माण होण्याकरीता त्यांनी आताच अटकाव आणला आहे. त्यामुळे विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्याविषयी त्यांच्यापध्दतीने विरोध केलेला आहे. सत्तापक्षांचे संपुर्ण समर्थन आहे. की या पध्दतीचा जो नियम आहे एन.ओ.सी. चा तो आपण निश्चीत घेणे गरजेचे आहे. मा.विरोधी पक्ष नेत्यांची मागणी आहे की याच्यावर मतदान घ्यावे, आम्ही देखील सत्तापक्ष तयार आहे की या विषयावर सर्वसामान्य गरीब व्यक्तीचा पुढचा त्रास कमी होण्याकरीता हा विषय मंजूर करण्याकरीता गरज पडल्यास आपण मतदान घ्यावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी त्यांची जी भुमिका या ठिकाणी मांडली की घर खरेदी करणारा जो व्यक्ती आहे त्यांच्याकडुन कर वसुली करतो, ज्या भुखंडावरती आपण कर लावतो जे मोकळे भुखंड आहे त्याला 1/04/1970 पासुन टॅक्स लावतो आणि हा 1/04/1970 पासुन कर लावल्यामुळे जुना थकबाकीदार मोठया प्रमाणात थकबाकीदार होत आहे. जुना थकबाकीदार हा मुद्यामपणे थकबाकीदार होत नाही. त्याला ती गरज भासत नाही. परंतु जो टॅक्स आहे तो अन्यायकारक आहे. 01/04/1970 पासुन कशाला लावत आहे? का लावत आहे? त्या संदर्भात मी एक उदाहरण सांगतो एका लेआउट मध्ये पाण्याची लाईन टाकली, पाण्याची लाईन टाकल्यानंतर आपल्या कर विभागाने वॉटर वर्क्स विभागाला सांगितले की तेथे पाणीपुरवठा होतो काय? तर आपल्या जलप्रदाय विभागाने लिहुन दिले की तेथे वॉटर लाईन टाकण्यात आलेली आहे. मात्र पाणीपुरवठा होत नाही. मा.महापौरजी त्याचे जर इंटरकनेक्शन झाले नाही, पाणीपुरवठा होत नाही, तर आपल्याला 40 टक्के सामान्य पाणीपुरवठा कर तेथे लावता येत नाही ही वस्तुस्थिती आहे मा.महापौरजी, मग आपल्या कर विभागाने 40 टक्के पाणीकर तेथे लावुन टाकला, तो चुकीच्या पध्दतीने लावला मग हा लावत असतांना तुम्हाला आक्षेप घेण्याचा कालावधी दिला काय? आक्षेप घेण्याचा कालावधी दिलेला नाही.

श्री.अविनाश ठाकरे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मी यासाठी घेतले संपुर्ण आकडेवारी आता शेवटची बैठक ज्यावेळी टॅक्स कमेटीची झाली. त्यावेळी टॅक्स कमेटीच्या बैठकीमध्ये नागपूर शहरातील डिसप्युटेड किती प्रॉपर्टी आहे, कोर्टामध्ये किती आहे, सरकारी प्रॉपर्टी किती आहे, याची संपुर्ण आकडेवारी घेतलेली आहे आणि त्याची संख्या फार नगन्य आहे. या सभागृहाचा वेळ वाया जावु नये म्हणुन हा विषय आलेला नाही हे ऑन रेकॉर्ड आहे.

महापौर :– निगम सचिवांना सूचित करण्यात येते की त्यांनी या विषयावर मतदान घ्यावे.

निगम सचिव :– मा.महापौरजी, या विषयावर हातवर करुन आपल्याला मतदान घ्यायचे आहे. पहिले या विषयाच्या समर्थनार्थ जे नगरसेवक आहे यांचे मतदान घेण्यात यावे, त्यानंतर या विषयाच्या विरोधात जे नगरसेवक आहे त्यांचे मतदान घेण्यात यावे.

अशा रितीने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाद्वारे होणाऱ्या मालमत्ताच्या खरेदी विक्रीची व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता कर भरणा केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्या संदर्भात प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

मा. सभापती कर आकारणी व कर संकलन समितीच्या दिनांक 29.05.2017 बैठकीत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाद्वारे होणाऱ्या मालमत्ताच्या खरेदी विक्रीची व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता कर भरणा केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्या संदर्भात सदर प्रस्ताव तयार करुन सभागृहाची

मान्यता घेऊन प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीकरिता पाठविण्याचा निर्णय कर आकारणी व कर संकलन समितीने घेतलेला आहे.

तसेच कर आकारणी व कर संकलन समितीच्या निर्देशानुसार संबंधित विषय स्थायी समिती अध्यक्षाकडे मंजुरीकरिता पाठविण्यात आला. समिती ठराव क्र. 240 दि. 16.11.2017 रोजी विचारात घेऊन मंजुरी प्रदान केली. महानगरपालिका सभागृहाची मंजुरी आवश्यक असल्यामुळे महानगरपालिकेच्या सभागृहा पुढे खालील प्रश्न विचारात घेण्याकरिता पाठविण्यात येते.

नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत मालमत्ता खरेदी विक्रीची प्रकरणे नागपूर शहरातील चार दुय्यम निबंधक कार्यालयात हजारो मालमत्तांची नोंदणी होत असते. मालमत्तेच्या खरेदी विक्रीची नोंदणी करतांना मालमत्तेसंबंधी मुद्रांक शुल्क अन्य नोंदणी शुल्काचा महसुल दुय्यम निबंधक कार्यालयाद्वारे मालमत्ता धारकांकडुन वसुल केला जातो.

परंतु खरेदी विक्री नोंदणी करतांना विक्रेता संबंधित मिळकती करीता updated मालमत्ता कर आकारणी वरुन घेऊन पावती सादर न करता मिळकतीच्या जुन्याच Status च्या अनुषंगाने असलेल्या मालमत्ता कराची पावती सादर करतो. त्यामुळे मिळकतीमध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने करावयाचे मालमत्ता कर पुनर्निधारण वेळीच होत नाही व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. हयाकरिता मालमत्ता कर व कर आकारणी विभागाचे उक्त मिळकतीच्या मालमत्ता कर संबंधी ''ना हरकत प्रमाणपत्र'' मिळकतीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराची नोंदणी करता सक्तीचे करण्याचे निर्देश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना शासन स्तरावरुन देणेबाबत शिफारास करणेबाबत निर्णय सभागृहाने विचारात घेवून मालमत्तांच्या खरेदी विक्रीचे व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता भरणा केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्याबाबत मतदान घेतले असता, विषय मंजूरीच्या बाजूने 86 मते व विरोधाचे बाजूने 31 मते पडलीत. त्यामुळे बहूमताने विषय मंजूर करण्यांत येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

ठराव क्रमांक 173:— मौजा — बोरगाव मधील खसरा क्र. 157/1, 157/2, 58/3, 59/1, 59/2, 59/3, 54/2 आणि 55 या मंजुर अभिन्यासातील भुखंड क्र. 47 ते 51 च्या दक्षिणेकडील खुल्या जागेवरील (क्षेत्र —1289.48 चौ.मी.) विकास योजनेतील ''क्रिडांगणाचे'' नामाभिधान वगळून जागा रहीवास विभागामध्ये समाविष्ठ करणेबाबत.

संदर्भः— कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.टिपीएस—2417/271/प्र.क्र. 128/17/नवि—9, दि. 24.10.2017

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार मौजा — बोरगाव, खसरा क्र. 157/1, 157/2, 58/3, 59/1, 59/2, 59/3, 54/2 आणि 55 या मंजूर अभिन्यासातील भुखंड क्र. 47 ते 51 च्या दक्षिणेकडील खुल्या जागेवरील (आराजी — 1289.48 चौ.मी.) दर्शविलेल्या क्रिडांगणाचे नामाभिधान वगळुन जागा रहिवास विभागामध्ये समाविष्ठ करण्यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्याबाबत प्रस्ताव दि. 29.12.2015 रोजीच्या महानगरपालिकेच्या सभेत ठराव क्र. 194 अन्वये मंजुर केलेला आहे. (प्रत संलग्न). त्यानूसार फेरबदलाच्या प्रस्तावावर नागरीकांच्या सूचना व हरकती मागविण्यास्तव दि. 24.03.2016 च्या दैनिक वर्तमान पत्रात (दैनिक हितवाद व दैनिक तरूण भारत) तसेच महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र दि. 23.03.2016 रोजी सुचना प्रसिध्द् करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने 30 दिवसाचे आंत नागरीकांच्या हरकती/सूचना मागविण्यात आल्या. या प्रकरणांत दिलेल्या मुदतीत एकही हरकत/सुचना प्राप्त झालेली नाही. त्यानुसार उक्त प्रस्ताव शासनास सादर

करण्यास्तव मा. सभागृहाने अंतीम ठराव पारीत करणे आवश्यक आहे.

यानुसार वैधानिक कार्यवाही पुर्ण करून शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना देण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, हा विषय मंजूर करण्यात यावा, नागपूर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार मौजा नारी खसरा क्र 109,110 या मध्ये डिसपेन्सरी करीता आरक्षीत करण्याकरीता आरक्षण क्र.एम.एन.13 अन्वये 0.448 हेक्टर जागा आरक्षित असुन याकरीता नारी खसरा क्र 97 बी,98, 93– 94 बी हे पार्क करीता आरक्षीत आहे. एम.एन. 29 अन्वये मौजा नारीची जमीन जी आहे याचे आरक्षण बदलविण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात यावे, अशी मी सूचना करतो.

श्री. प्रफुल गुडधेः– मा.महापौरजी,विषयाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या सभेच्या ठराव क्र 194 अन्वये या आधी आपण मंजूरी दिली होती. मात्र महानगरपालिकेची सभा झाली होती दि. 29/12/2015 ची ती गोंधळामध्ये झाली होती आणि या गोंधळामध्ये हा विषय मंजूर झाला होता. क्रीडांगणाचा वापर आपण रहिवासी भागामध्ये समाविष्ट करण्याचा माझा विरोध आहे. तो येथे आपण नोंदवावा, क्रीडांगणाचे आरक्षण हे रहिवासी विभागामध्ये कधीही समाविष्ट होणार नाही, व करु नये या संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे अनेक ऑर्डर आहे आणि सभागृहामध्ये जो ठराव मंजूर झाला होता तो गोंधळामुळे झाल्यामुळे या विषयाला माझा विरोध आहे आणि त्या विरोधाची नोंद आपण या ठिकाणी घेण्यात यावी.

श्री.तानाजी वनवे :'– मा.महापौरजी, प्रफुल्लजी गुडधे यांनी जे सांगितलेले आहे ते क्रीडांगणाला आपण एकदा मंजूरी दिली तर त्याला रहिवासी करता येत नाही. त्याच्यामध्ये उच्च न्यायालयाचे आदेश आहे. त्याच्यामुळे आपण या विषयावर विचार करावा अन्यथा आमचा या विषयाला विरोध आहे.

श्री.जगदीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, यह विषय मौजा बोरगाव का फ्रेन्ड् कॉलनी का है। यह विषय यहापर आया कैसा इसकी मै आपको विस्तृत जानकारी देता हुँ। नागपूर महानगरपालिकाने 1994 मे कमर्शीअल के लिये इस भुखंड को मंजूरी दी। और 12/10/1994 मे मंगला तालेवार को यह जमीन फ्रेन्डस् कॉलनी हाउसिंग सोसायटी के अध्यक्ष बेलेकर ने बिकी और 16/01/1986 को म.न.पा. व्दारा मंजूर हुवा इस भुखंड को उस सोसायटीने तालेवारने जब पैसे नही दिया तो उसको ठराव पारित करके रद्य किया गया। और उस सोसायटी का सेक्रेटरी तालेवार था, और तालेवार एन.आय.टी का जे.ई. था। और उसने नागपूर महानगरपालिका का सॅग्शन किया हुआ भुखंड है उसको पी.जी. लिख दिया। 2000 के डी.पी. प्लॅन मे इसको पी.जी. घोषित कर दिया गया। उसका कारण क्या था तालेवार उस सोसायटी का सेक्रेटरी था, और उसकी बहन के लिये प्लॉट लिया था उसका मेरे पास आज भी पुरावा है। जो लेआउट नागपूर महानगरपालिका ने मंजूर किया है उसको कॅन्सल करने का अधिकार एन.आय.टी. को है क्या ये मै आपसे पुछना चॉहता हुँ।

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, या ठिकाणी जी माहिती दिली ज्या क्रीडांगणाची जागा रहिवासी क्षेत्रामध्ये बसवुन राहिलो आहे तेथे ऑलरेडी घरे झाली आहे अशी त्यांची माहिती आहे त्यामुळे प्रशासनाने या संदर्भामध्ये माहिती करेक्ट करुन दयावे.

श्री.जगदीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, यह भुखंड को नागपूर महानगरपालिकाने 1984 ने मंजूरी दी कमर्शीअल के लिये उसका नक्शा मंजूर है। इसमे बहोत लोग सफर्ड हुये है। नागपूर शहर मे दो संस्थाये होने के कारण ऐसी बडी बडी गलतिया होती है और इसमे कई लोग सफर्ड होते है।

सहा.संचालक, नगररचना (श्री.गावंडे ) :– मा.महापौरजी, मौजा बोरगाव या जागेवर 53 ची नोटीस दिली होती तेथे एक शेड आहे परंतु तेथे 1981 मध्ये फ्रेन्डस् सहकारी गृह निर्माण संस्थेचा लेआउट मंजूर झाला होता आणि 2001 च्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये 47 ते 51 जे भुखंड होते त्यावर ग्रीन बेल्ट लिहीला होता तर आपण ठराव क्र 194 दि. 29/12/2015 रोजी त्यामध्ये ऐरर होते ते दुरुस्त करण्यासाठी 37 चा प्रस्ताव मंजूर केला होता परंतु त्यामध्ये मा.आयुक्तांना अधिकार प्रदान केलेले नव्हते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, या आधी जो विरोध केला तो मी वापस घेतो आणि या प्रस्तावाला आपण मान्यता प्रदान करावी अशी विनंती करतो.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, मी याला समर्थन करतो.

श्री.जगदीश ग्वालबंशी :–मा.महापौरजी, 2007 मे उसने रिवाईज प्लॅन के लिये मंजूरी दिया। इसमे जो घोटाले हुये है वह मे आपके सामने रखना चाहता हुॅं, सन 2010 रिवाईज प्लॅन के लिये मंजूरी दिया, उस वक्त उसे 3 लाख 78 हजार रुपये उसमे डेव्हलपमेंट चार्ज लिये, वासवानी से चार्ज लेने के बाद रिवाईज करने की आपने मंजूरी दि और उसने अपना टिन का शेड गिराकर वहापर जब बांधकाम किया। वह व्यक्ती का जो नुकसान हुआ है उसकी भरपाई कोन देंगा। नागपूर महानगरपालिकाने जिस भुखंड को मंजूरी दिया उसको कॅन्सल करने का अधिकार नागपूर सुधार प्रन्यास को है क्या?

निगम आयुक्त :– मा.महापौरजी, विषय क्र 131 संदर्भात सन्माननिय सदस्यांनी जे मुद्ये उपस्थित केले आहे एन.आय.टी. आणि एन.एम.सी. च्या भुमिकेच्या अनुषंगाने त्याची सखोल माहिती त्यांना लेखी स्वरुपामध्ये दोन दिवसामध्ये उपलब्ध करुन देवु.

ठराव क्रमांक 174:– प्रभाग क्र. २३, हिवरीनगर येथे रिध्दी सिध्दी मंदीराजवळ असलेले प्रवेशव्दार महानगरपालिकेने बांधलेले होते सदर्हू प्रवेशव्दार शिकस्त झालेले होते. स्ट्रक्चरल ऑडीटरनी जिवीत हानी टाळण्याकरीता हा प्रवेशव्दार शक्य तितक्या लवकर पाडण्याची शिफारस केली होती. त्यामुळे हा प्रवेशव्दार त्वरीत पाडण्यात आला तरी प्रवेशव्दार पाडण्याचा कार्यत्तर कार्यवाही करीता महानगरपालिका सभागृहाची मंजूरीचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्रमांक 175:– महानगरपालिकेतर्फे अनधिकृत जाहिरातीबाबत आकारण्यात येणारा दंड रु. १००/— ऐवजी वाढ करुन रु. २००/— करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून अनधिकृत जाहिरातीबाबत आकारण्यांत येणारा दंड रू १००/- ऐवजी वाढ करून रू. २००/- न करता रू. ५००/- करण्यांत यावा या मा. सत्तापक्ष नेता श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेसह विषय मंजूर करण्यांत येतो. या

मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्रमांक 176:– महानगरपालिका स्लम विभागामार्फत महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवरील घोषित झोपडपट्टीचे प्लेन टेबल सर्वे व सोशियो ईकॉनॉमिक सर्वे च्या आधारे व शासन निर्णयांचे अनुषंगाने प्रमाणित केलेल्या पात्र झोपडीधारकांना त्यांचे भोगवटयाखालील जमिनीचे पट्टेवाटप करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(g) मधील सुधारणे नुसार खालीलप्रमाणे तयार केलेल्या भाडेपट्टा करारनाम्याचे प्रारुप व त्यात नमूद अटीं व शर्थीना मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

भाडेपट्ट्याचे प्रारुप

नागपूर महानगरपालिका, नागपूर

---------- स्लम अभिन्यासातील भुखंडाचा ३० वर्षीय स्थायी भाडेपट्टा

पार्टी क्र. १ :- आयुक्त, नागपूर महानगरपालिका मार्फत अति.उपायुक्त(१),म.न.पा.नागपूर
सिव्हिल लाईन्स, नागपूर

पार्टी क्र. २ :- श्री. ............................. झोपडीधारक
घर नं. (प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार) - -----------ा स्लम, नागपूर

ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका (पार्टी क्र. १) यांनी महानगरपालिका ठराव क्र. ........... दि. ....... व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(g) अंतर्गत शासनाचे निर्णय पत्र क्र. ............................ . दि. ................... च्या मंजुरी अन्वये मौजा-नागपूर खसरा क्र. -----, येथील स्लम विभाग, म.न.पा. चे प्लेन टेबल नकाशानुसार महानगरपालिकेचे मालकीच्या एकुण आराजी ----------- चौ.मी. जागेवरील घर क्र. ---- अंतर्गत झोपडीधारकाचे भोगवटयाखालील ----- चौ.मी. जागा खालील अटींवर ३० वर्षाचे स्थायी भाडेपट्ट्यावर वाटप करावयाचे ठरविले आहे.

आणि ज्याअर्थी, या अभिन्यासातील घर क्र. ............ असलेली जागा, पार्टी क्र. २ यांचे वहीवाटीत व ताब्यात आहे.

आणि ज्याअर्थी, पार्टी क्र. २ खालील अटींवर या भुखंडाचा भाडेपट्टा घेण्यास तयार आहे,

त्याअर्थी, या भाडेपट्ट्याचा करारनामा खालील अटींवर करण्यात येत आहे.

अटीं व शर्थी :-

१. स्लम विभाग, म.न.पा. चे प्लेन टेबल नकाशानुसार मौजा-नागपूर ख. क्र. १८५ एकुण आराजी -------- चौ.मी. क्षेत्रावरील स्लम अंतर्गत चा घर क्र. ................ व झोपडीधारकाचे भोगवटयाखालील असलेली ------ चौ.मी जागा दि. ............... पासुन दि. ........... पावेतो ३० वर्षाचे भाडेपट्ट्याावर देण्यात येत आहे.

२. गृहनिर्माण विभाग , शासन निर्णय दि.०३ जानेवारी २०१७ मधील तरतुदीनुसार पार्टी क्र. २ यांना भाडेपट्टयाने द्यावयाचे जागेकरीताचे दि.०१.०१.१९९५ पासुन वसुल करावयाचे एकूण एकत्रित सेवाशुल्क रु. एवढे आहे. शासन निर्णयानुसार सुरुवातीला सदर एकत्रित सेवाशुल्काचा भरणा पार्टी क्र. १ मार्फत करण्यात येईल व संबंधीत घोषित गलिच्छ वस्तीतील पट्टे वाटप धारकांची पुनर्वसन योजना राबविल्यानंतर सदर एकत्रित सेवाशुल्काची वसुली पार्टी क्र. २ यांचेकडून करण्यात येईल.

३. शासन निर्णयानुसार अ.क्र. १ मध्ये नमूद जागेचा भाडेपट्टा हा पार्टी क्र. २ यांना --------- स्लम, नागपूर येथील त्यांचे भोगवटयाखालील जागेचे व्यक्तिगतरित्या भाडेपट्टा देण्यात येत असून या जागेवरील व्यक्तिगतरित्या भाडेपट्टा दिलेल्या झोपडपट्टीवासीयांची दोन वर्षाच्या आत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करणे तसेच तद्नंतर पार्टी क्र. २ यांनी एक वर्षाचे आत संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासदत्व स्वीकारणे अनिवार्य राहील. पार्टी क्र. २ यांनी सभासद होण्यास नकार दिला तर त्यांना देण्यात आलेला जागेचा भाडेपट्टा रद्द करण्यास पात्र राहतील.

४. उपरोक्त मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद नुसार -------- स्लम, नागपूर या झोपडपट्टीतील सर्व वैयक्तिक भाडेपट्टेधारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापित झाल्यानंतर या सर्व व्यक्तिगत भाडेपट्टाधारकांचे अधिनस्थ असलेल्या संपूर्ण जागेचा एकत्रित भाडेपट्टा संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नांवे करण्यात येईल व हि बाब पार्टी क्र. २ यांना मान्य राहील.

५. --------- स्लम, नागपूर या झोपडपट्टी संदर्भाने पुनर्वसन योजना राबविण्याचे स्थितीत अभिन्यास निर्माण करावयाचा झाल्यास त्यास्थितीत पोच रस्ता अथवा अभिन्यासाकरीता आवश्यक रस्त्याचे रुंदीत येणारी किंवा बाधीत होणा-या जागेचा भाग/बांधकाम इत्यादी काढुन टाकणे पार्टी क्र. २ ला बंधनकारक राहील.

६. पार्टी क्र. २ यांना निश्चित होणारी वार्षीक भुभाटकाचे रकमेचा भरणा वर्षाचे प्रथम आठवडयात दरवर्षी अग्रीम करणे बंधनकारक राहील. सदर मुदतीत रकमेचा भरणा न केल्यास, पार्टी क्र. १ ला भाडेपट्टा रद्द करुन जागेचा ताबा घेण्याचा अधिकार राहील.

७. जागेचा भाडेपट्टा प्रथम ३० वर्षाकरीता राहील व मुदतीनंतर महानगरपालिका वा शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देषाचे अनुषंगाने त्यावेळेच्या स्थितीस अनुसरुन सक्षम प्राधीकरणाचे अनुमतीने भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाहीचा निर्णय घेण्यात येईल. हि बाब पार्टी क्र. २ यांना मान्य राहील.

८. पार्टी क्र. २ यांना या जागेवरील अस्तित्वात असलेले वा प्रस्तावित बांधकामास नगर रचना विभाग, नागपूर महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त करणे व अनधिकृतरित्या असलेले बांधकाम काढून टाकणे आवश्यक राहील.

९. पार्टी क्र. २ यांना त्यांना भाडेपट्टयाने दिलेल्या जागेचा उपयोग फक्त सध्या सुरु असलेल्या निवासी /

वाणिज्यीक/निवासासह वाणिज्यीक या वापरासाठीच करता येईल. या वापराव्यतिरीक्त इतर वापर आढळून आल्यास भाडेपट्टा रद्द करुन जागेचा ताबा घेण्याचा अधिकार पार्टी नं. १ ला राहिल.

१०. पार्टी क्र. २ यांना त्यांना भाडेपट्टयाने दिलेल्या जागेचे कोणत्याही परिस्थितीत पोट विभाग करता येणार नाही अथवा या जागेत पोटभाडेकरु ठेवता येणार नाही. असे आढळल्यास भाडेपट्टा रद्द करुन जागेचा ताबा घेण्याचा अधिकार पार्टी नं. १ ला राहिल.

११. भाडेपट्टाधारकाने कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास पार्टी नं. १ अथवा त्यांचेकडुन नियुक्त अधिकाऱ्यास भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार अबाधित राहील. ह्यामुळे पार्टी नं. २ ह्यांना या जागेबाबत वा बांधकामाबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार राहणार नाही.

१२. या भाडेपट्ट्यातील अटी व शर्थी पार्टी नं. १ व २ ला मान्य आहेत. महानगरपालिकेने पारीत केलेल्या ठरावातील अटींचे पालन पार्टी नं. २ ला करावे लागेल. कोणत्याही शर्थीचा अथवा अटींचा अर्थ लावण्याचा अधिकार पार्टी नं. १ अथवा त्यांचेकडुन नियुक्त अधिकाऱ्यास राहील व तो अर्थ पार्टी नं. २ ला बंधनकारक राहील.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, विषय क्र 138 संदर्भात एन.जी.टी मध्ये काही पिटीशन झाली होती काय त्यावर काही निर्णय झाला होता काय या संदर्भात सभागृहात त्याची माहिती दयावी.

सहा.संचालक (नगररचना) (श्री.गावंडे) :— मा.महापौरजी, या संदर्भात ठराव क्र 46 दिनांक 20/06/2017 रोजी इनव्हार्यमेंटच्या अनुषंगाने एक तज्ञ समितीचा विषय होता. त्यामध्ये 3 अधिकारी महानगरपालिकेकडुन आणि 3 अधिकारी विविध विषयाचे अभ्यासक म्हणुन नेमणुकीचा ठराव होता परंतु आता या विषयावर दिनांक 29/1/2018 रोजी महाराष्ट्र शासनाने सर्कुलर जारी केलेले आहे की या तज्ञ समिती नेमणुकीचे आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित न्यायालयाकडे 4 रिट पिटीशन होते, त्यांनी ते रद्य केलेले आहे. 2016 चा जी.आर.आहे त्यामुळे हा विषय तुर्त मंजूर करण्याची आवश्यकता आहे.

ठराव क्रमांक 181:— श्री. राजेश भुतकर महानगरपालिका नागपूर हे सन 1991 मध्ये जलप्रदाय विभागात उपअभियंता या पदावर कार्यरत असताना गोरेवाडा येथील सी.आय. व एम.एस. स्क्रॉपचे जाहीर लिलावातील सी.आय. स्क्रॉप मालाची डिलेव्हरी प्रकरणी त्यांना आदेश क्र. 16/ओ.ॲन्ड.एम. दि. 18/04/1998 ला निलंबित करण्यात येवून त्यांचे विरुध्द सूरु केलेल्या विभागीय चौकशी अन्वये दोषारोप सिध्द

झाल्यामुळे त्यांना म.न.पा.च्या सेवेतून बडतर्फ करण्यासंबंधी म.न.पा. ठराव क्र. 98 दि. 31/01/2003 अन्वये गठीत सुनावणी समितीकडे अग्रेषीत करण्यात आले म.न.पा. ठराव क्र. 266 दि. 20/07/2004 अन्वये यांना निर्दोष ठरवून त्यांना त्यांचे मुळ पदावर पुनःस्थापीत करण्याचा ठराव पारीत करुन अमलबजावणीसाठी सभागृहाने परत केला. दि. 25/09/2005 ला ठराव क्र. 266 दि. 21/07/2004 अन्वये विखंडीत करण्यासंबधीत पत्र क्र. 278/विकाअ (चौ) 2005 दि. 25/09/2005 शासनाला पाठविण्यात आले व त्यानुसारदि. 15 मार्च2008 ला शासनाव्दारे ठराव क्र. 266 दि. 20/07/2004 विखंडीत करण्यात आला.

श्री. भूतकर यांनी या निर्णया विरुध्द रिट याचिका क्र. 60/2009 दाखल केली या रिट याचिकेचा निकाल दि 20/10/2010 ला लागला त्यानुसार.

In the writ petition there is a prayer for grant of reinstatement with full back wages and continuity of service. In the absence of any pleading in the writ petition regarding gainful employment or otherwise of the petitioner, we are not inclined to grant the prayer regarding back wages, as prayed in the writ petition. Insofar as the prayer as regards continuity of service and consequential reliefs is concerned, we leave the same to the corporation for consideration in accordance with law.

म.न.पा. ठराव क्र. 266 दि. 21/07/2004 व याचीका क्र. 60/2009 बाबत मा. उच्च न्यायालयाने दि. 20/10/2010 रोजीचे आदेशानूसार त्यांना राज्य शासनाने दिलेला आदेश रद्दबादल ठरवून आदेश क्र. 166/ओ. ॲन्ड.एम. दि. 29/01/2011 अन्वये ठराव पुनःस्थापीत करण्यात आले. श्री. राजेश भूतकर यांचे विरुध्द असलेल्या फौजदारी केस क्र. 101/2002 च्या कोर्टाचे दि. 05/04/2011 च्या आदेशानुसार benefit of doubt च्या आधारे दोषमुक्त केले.

" It shows that the evidence given by the prosecution is doubtful and not free from doubt. It definitely benefit to the accused person. In above circumstances the benefit of doubt goes to the accused person."

सदर आदेशाबाबत कायदयाचे सल्लागार ॲड. सी. एस. कप्तान यांचे दि. 07/05/2012 ला अभिमत खालीलप्रमाणे प्राप्त झाले.

In that view the issue of payment of back wages can not be considered he is already reinstated. hence issue regarding full payment of back wages could be rejected as Shri Bhutkar was paid 75 % of his wages while he was not in service issue of continuity and period of his absance may be considered as per rules.

आदेश क्र. 166/ओ.ॲन्ड.एम. दिनांक 26/03/2013 नुसार दिनांक 17/04/1998 ते 28/01/2011 पर्यन्तचा निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी समजण्यात यावा असे मा. आयुक्ताचे दि. 26/03/2013 चे आदेश झाले. या आदेशाविरुध्द श्री. भुतकर यांनी रिट याचिका (W.P. 4200/2013) दाखल केली सदर रिट याचीका याचिकाकर्त्याचे परत घेण्याचे विनंती नुसार व शासनाकडे अपील करण्याचे प्रावधान असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका दिनांक 16/09/2013 रोजी निकाली काढली.

दिनांक 13/11/2013 रोजी श्री. भूतकर यांनी मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे अनुषंगाने शासनाकडे अपील क्र. 4771/2013 दाखल केली.

शासनाकडे दाखल केलेली अपील त्वरीत निकाली काढण्यास्तव श्री. भुतकर यांनी पुनश्च मा. उच्च न्यायालयात रिट याचीका क्र 5709/2014 दाखल केली मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिकेमध्ये श्री. भूतकर यांनी शासनाकडे दाखल केलेली अपील शासनाने 4 महिण्यामध्ये निकाली काढण्याचे आदेश देवून दि. 09/12/2014 रोजी निकाली काढले.

सदर अपील दिनांक 08/09/2017 रोजी शासनातर्फे निकाली काढण्यात आली त्यानुसार.

आदेश

1) अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत आहे.

2) आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी उक्त प्रकरणी पारित केलेला दिनांक 26/03/2013 चा आदेश रद्द करण्यात येत आहे.

3) उपरोक्त 'निष्कर्ष' या सदरातील अ. क्र. 5 मधील तरतूदीची तपासणी करुन, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

4) अपिलाच्या अनुषंगाने खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

सदर प्रकरणी "Benefit of doubt" चे आधारे मा. उच्च न्यायालयाने दोषमुक्त केलेले आहे. तसेच यापुर्वी आयुक्तांनी श्री. भुतकर यांचा दिनांक 17.04.1998 ते 28.01.2011 हा साधारणतः 13 वर्षाचा कालावधी निलंबन काळ गृहीत धरणेबाबत आदेशित केले असता त्या आदेशास नगर विकास विभागात अपील मध्ये रद्द करण्यात आले असुन शासनाचे सदर आदेशातील अ.क्र. 5 वरील तरतुदींची तपासणी करून आयुक्त मनपा यांनी आवश्यक कार्यवाही करणेबाबत आदेशित केले आहे.

या प्रकरणी निलंबन कालावधीत 75 % Payment श्री. भुतकर यांना दिले आहे. व याबाबत यापुर्वी Sr. Standing Counsel श्री. कप्तान यांचे अभिप्राय मागविले असता "issue regarding full payment of wages could be rejected as Shri Bhutkar was paid 75 % of his wages, while he was not in service . Issue of continuty and period at his absence may beconsidered as per rules " असे अभिप्राय दिले होते

करीता श्री. भुतकर यांना निलंबन कालावधीत 75 % Payment दिले असल्याने व Sr. Standing Counsel श्री. कप्तान यांचे अभिप्राय लक्षात घेता कोणतीही थकबाकी अनुज्ञेय न करता 17.04.1998 ते 28.01.2011 हा कालावधी इतर सर्व प्रयोजनार्थ जसे निवृत्तीवेतन इत्यादीकरीता कर्तव्य कालावधी गृहीत धरण्याकरिता सक्षम प्राधिकारी म.न.पा. सभागृह असल्यामुळे उक्त प्रकरणात उचित निर्णय घेण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून फक्त सेवा ज्येष्ठता ग्राहय धरावी. तसेच सभागृहाचा मानस हा No work No wages चा असल्यामुळे आर्थिक लाभ देण्यांत येवू नये या मा. सत्तापक्ष नेता श्री.संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेसह विषय मंजूर करण्यांत येतो. या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, भुतकर यांना 75 टक्के वेतन दिलेले नाही. त्यांच्यावर अन्याय झालेला

आहे. त्यांना राज्य सरकारनी बरी केलेले आहे, हायकोर्टाने बरी केलेले आहे आणि आपणही त्यांना बरी केलेले आहे कारण आपण त्यांना जॉईन करुन घेतले, त्याच्या वेतनाश्रेणीमध्ये पुर्ण तफावत आहे. त्यावर कप्तान साहेबांनी वेगळे अभिप्राय दिलेला आहे आणि पुरानिक साहेबांनी वेगळा अभिप्राय दिलेला आहे. माझी आपणांस विनंती आहे की जसे निवृत्त झालेले तत्कालीन कार्यकारी अभियंता दिलीप जामगडे साहेब यांना जसे थकीत बाकी देण्यात आले आहे तसेच यांना सुध्दा देण्यात यावे ही विनंती.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, या विषयामध्ये मा.सदस्यांनी आता जो उल्लेख केला आहे श्री.भुतकर यांना आपल्या कार्यालयाने व न्यायालयाने त्यांना निर्दोष केले आहे. त्याच्यामुळे दोन विधी तज्ञाचे दोन वेगवेगळे मत आहे. परंतु जर आपण जामगडेवर आरोप असतांना दिले आहे तर भुतकरांना का देण्यात येवु नये, हे माझे म्हणणे आहे. कार्यालयाने याची माहिती दयावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, या ठिकाणी महानगरपालिकेचे अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये अनेक अनियमितता आपल्याला आढळुन येतात आणि महानगरपालिकेचे अधिकारी बरोबर काम करीत नाही म्हणुन आपण त्याच्यावर निलंबनाची कारवाई करतो आणि कालांतराने बडतर्फे मा.आयुक्तांच्या माध्यमातून करतो आणि चौकशी समितीचा काहीही अहवाल असला तरी या सभागृहाने सातत्याने कर्मचा—यांच्या बाजुनेच भुमिका घेतली आहे. अधिकाऱ्यांच्या बाजुनेच भुमिका घेतली आहे. साहेबराव राउतांपासुन तर शेवटपर्यंत आपण ही भुमिका घेतली आहे. आणि कुठेतरी अधिका—यांचे संरक्षण व्हावे त्यांच्यावर अन्याय होवु नये, ही भावना निश्चितपणाने सर्व सभागृहाची सातत्याने राहिली आहे. कुठल्याही पक्षाची सत्ता असली तरी परंतु मा.महापौरजी, हे किती दिवस चालवायचे हा माझा मुळात प्रश्न आहे. कुठेना कुठे कट ऑफ करण्याची आवश्यकता भासणार आहे. अन्यथा एक ट्रेन्ड चालला जाईल की, महानगरपालिकेमध्ये काहीही करा, कसेही वागा, आपले कोणी काही बिघडवु शकत नाही, दोन, चार, पाच नगरसेवकांची जर शिफारस आपण आणली तर आपण पाहिजे तसा ठराव सभागृहाच्या माध्यमातुन आपण करुन घेवु शकतो आणि आपल्या वागण्याचे समर्थन करु शकतो. आता या ठिकाणी मा.मनोज भाउंनी जो विषय येथे मांडला ती गोष्ट पण खरी आहे. एका कर्मचा—यांच्या संदर्भात एक निर्णय झाला, दुस—या कर्मचा—यांच्या संदर्भात दुसरा झाला, तिस—या कर्मचा—यांच्या संदर्भात तिसरा निर्णय झाला, त्यामुळे कर्मचा—यांच्या मनामध्ये ही भावना निर्माण होवु नये, एखादयाच्या संदर्भामध्ये आपण वेगळा निर्णय घेतो आणि आमच्या संदर्भामध्ये आपण वेगळा निर्णय घेतला. मा.महापौरजी, या ठिकाणी यांना बडतर्फ केले होते, बडतर्फ केल्यानंतर यांचा ठराव याच सभागृहाने विखंडीत केला होता. विखंडीत केला म्हणजे काय केले सभागृहाने त्यांच्या कामाची चौकशी केली होती काय ? फक्त सहानुभूती म्हणुन की त्यांचे नुकसान होवु नये, या एकमेव भावनेमुळे महानगरपालिकेच्या सभागृहाने त्यांचा ठराव रद्य केला आणि आयुक्तांनी शिफारस मान्य केली. त्यांना 75 टक्के वेतन मिळाले आता उर्वरित वेतनासाठी पुन्हा सभागृहामध्ये ठराव आणायचा आहे. महानरगपालिकेच्या विरोधामध्ये आपण मा.उच्च न्यायालयामध्ये जातो आपल्या राज्य शासनाकडे अपील करतो मा.महापौरजी हे पण काही बरोबर होणार नाही. एकीकडे सहानुभूतीपुर्वक या कर्मचा—यांची सेवा सुरक्षित ठेवण्याचे काम जर हे सभागृह करीत असेल तर त्या कर्मचा—यांची सुध्दा जबाबदारी राहणार आहे. किती घोटाळे झाले मा.महापौरजी, असे जर आपण करीत राहु तर सरसकट सर्वांना असेच वाटेल की कितीही घोटाळे करा, स्क्रॅप विकुन टाका किंवा महानगरपालिकेची जमिन विकुन टाका, आमचे काही बिघडु शकत नाही. मा. महापौरजी या संदर्भामध्ये सर्वकष विचार होण्याची आवश्यकता आहे. मी भुतकरांच्या विरोधात नाही. वैयक्तीक त्यांचा आणि माझा कधीही संबंध आलेला नाही. परंतु कुठलाही कर्मचारी या महानगरपालिकेत कसाही वागेल असा मॅसेज सभागृहाच्या माध्यमातुन जावु नये, ही निदान अपेक्षा आहे. या संदर्भामध्ये यथायोग्य निर्णय आपल्याला सर्वांना घ्यायचा आहे. हा निर्णय घेत असतांना एका कर्मचा—यांचा प्रश्न नाही. एका कर्मचा—यांना आपण संरक्षित करु पण या सभागृहाचं, या नागपूर महानगरपालिकेचं, या शहरातील तमाम 30 लाख जनतेच हित आपल्याला पहावं लागणार आहे. त्याच्या श्रमाच्या पैशातुन महानगरपालिकेमध्ये कर वसुल होतो, एकीकडे आपण ठराव करीत आहे. जर तुम्ही कर भरला नाही तर तुम्हाला मालमत्ता विकता येणार नाही. त्याच्यावर बंधने आणतो पण आपल्याला अधिकारी, कर्मचा—यांवर सुध्दा वचक आणावा लागेल, त्यांच्यावर सुध्दा बंधणे आणावे लागतील, की तुमचे वागणे हे लोकांना अभिप्रेत असले पाहिजे. लोकांसाठीच असले पाहिजे, या संदर्भामध्ये आपण यथायोग्य निर्णय घ्यावा याचा अधिकार मा.महापौरजी, आम्ही आपल्याला प्रदान करतो आणि

हा विषय आपण स्वतः हाताळावा.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन प्रफुल्ल गुडधे यांच्या मताशी मी सहमत आहे. परंतु भुतकारांचा जो विषय आहे त्यावेळी मी नगरसेवक होतो. मला त्याची माहिती आहे पुर्ण म्हणुन मी कुठल्या कर्मचा—यांना वाचवावे किंवा त्यांना मदत करावी हा माझा मानस नाही. त्यावेळी ज्या अधिका—यांच्या कारकिर्दीमध्ये ती फाईल तयार झाली होती त्याला भुतकर दोषी नव्हते म्हणुन न्यायालयाने त्यांना बरी केले,

श्री.रविंद्र भोयर :— मा.महापौरजी, त्या तत्कालीन चोकशी समितीचा मी अध्यक्ष होतो. त्या समितीमध्ये मा.प्रा. अनिल सोले पासुन सर्व सदस्य होते आणि सहा महिन्याच्या सखोल अभ्यासानंतर या महानगरपालिकेतील प्रत्येक अधिका—यांची सखोल चौकशी केल्यानंतर त्यावेळेस समितीने जो ठपका ठेवला तो ठपका आजच्या विरोधी पक्ष नेत्यांनी पुसुन टाकावा ऐवढे सर्टीफिकेट देण्याची आज आवश्यकता नाही, असे माझे प्रामाणिक मत आहे. मा.विरोधी पक्षनेते श्री तानाजी वनवे त्या वेळेस सभागृहाचे सदस्य नव्हते.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मा.सदस्यांनी जे सांगितले त्याही वेळी काही विशीष्ट अधिका—यांना वाचविण्यासाठी काही अधिका—यांचा बळी घेण्यात आला, ही वस्तुस्थिती होती. आता त्या समितीने काय निर्णय घेतला.

श्री.रविंद्र भोयर :— मा.महापौरजी, त्यावेळेस तानाजी आपण महानगरपालिकेचे सदस्य नव्हते, आपण जी माहिती दिली ती करेक्ट करुन घ्यावी, ही घटना घडली 1997 ते 2002 च्या काळात मा.सिध्दीकी या ठिकाणी आहे. त्यावेळेस महानगरपालिकेचे सर्व नविन खरेदी केलेले पाईप हे स्क्रॅपमध्ये विकल्या गेले होते आणि त्याच्यावर ही चौकशी समिती होती. अडीच अडीच लाख रुपयांचे जे व्हॉल होते ते स्क्रॅपमध्ये विकल्या गेले होते. त्यामुळे महानगरपालिकेमध्ये झालेला हा महाघोटाळा होता आणि त्याची चौकशी आजचे मा.मुख्यमंत्री तत्कालीन महापौर श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी ही चौकशी समिती गठीत केली होती. महापौर यांच्या निर्देशानुसार आणि त्या समितीच्या अहवालामध्ये आज कोण्या अधिका—यांना वाचविणे आणि कोण्या अधिका—यांवर आक्षेप घेणे हा विषय नाही आहे. महानगरपालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान झाले आणि त्यानंतर सुध्दा एखादया अधिका—यांना वाचविण्यासाठी आम्ही जर प्रयत्न करीत असु मला असे वाटते की या ठिकाणी आपण महानगरपालिकेच्या हिताची बाब करतो आहे, असे समजण्याची अजिबात कारण नाही.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, मा.प्रफुल्ल गुडधे यांनी मांडलेला विषय बरोबर आहे. जुन्या काळात जे काही निर्णय झाले असतील त्याच निर्णयावर आधारित आजही निर्णय करा, हे म्हणणे फारच चुकीचे आहे. आणि जो पर्यत लहान लहान कर्मचा—यांचे विषय आले त्यांना आपण नो वर्क नो. वेज म्हटले जितके दिवस काम केले नाही तितके दिवस पगार देणार नाही असे या सभागृहाने निर्णय केला आहे. आज अधिका—यांचा विषय आला तर आपण 75 टक्के दया, 90 टक्के द्या, माझी तर या सभागृहाच्या माध्यमातुन सर्व सदस्यांच्या माध्यमातुन विनंती आहे की त्या काळात जर भुतकर साहेबांनी काम केले नसेल त्या पुर्ण काळाचा एक रुपया सुध्दा त्यांना देवु नये, जो कर्मचा—यांसाठी निर्णय आहे तोच अधिका—यांसाठी असला पाहिजे. रिपोर्ट आला आहे, अडीच अडीच लाखांचा व्हॉल विकतो आहे. पाईप विकले आहे. त्यांना धाक सुध्दा राहणार नाही. आज एकानी असे केले मा.महापौरजी, तुम्हाला सांगायला अडचण नाही. आज मार्केट विभागाच्या कर्मचा—यांनी महिना महिनाभर पैसे वापरले, टॅक्स विभागाचे अनेक कर्मचारी जुन्या काळात काही डि.सी.आर. लिहायचे दिवस होते, त्या काळात पुर्णच्या पुर्ण पैसे महिनाभर वापरायचे त्यांच्याही बाबतीत कुठलाच धाक उरला नाही. आणि जर धाक उरणार नाही एकीकडे आपण नागरिकांवर अनधिकृत होर्डींग्स् लागले तर 100 रुपयांचे 500 रुपये करीत आहे. दुसरीकडे आपण टॅक्ससाठी एन.ओ.सी.मागत आहे आणि तिसरीकडे आपण कर्मचा—यांनी घोटाळे केले किंवा ज्या कर्मचा—यांनी त्या काळात कामच केले नाही त्यांना पैसे देत आहे अशा वेळला कॉट्रॅक्डीक्टरी निर्णय होतील. माझी या सभागृहाला, विरोधी पक्ष नेत्यांना, सभागृह नेते, सर्व गटनेते, सर्व जेष्ठ सदस्य यांना विनंती आहे की ज्या काळात त्यांनी काम केलेले नाही त्या काळाचा पगार बिलकुल देवु नये, ही माझी विनंती आहे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या विषयावरती सभागृहामध्ये चर्चा झाली. सन्माननिय सदस्य प्रफुल्लजी गुडधे, श्री.प्रविणजी दटके, तानाजी वनवे, मनोज सांगोळे यांनी विषय मांडले ही बाब अत्यंत खरी आहे की ज्यावेळी एखादया लहान कर्मचा—यांचा विषय येतो त्यावेळी नो वर्क नो वेजेसचा निर्णय हे सभागृह घेत असते आणि त्याचवेळी अधिका—यांच्या बद्दलचा विषय येतो आणि त्यामुळे यावरती निर्णय घेणे अत्यंत महत्वाचा असते परंतु या संपुर्ण नस्तीचा जर अभ्यास केला तर लक्षात असे येते की, एक निर्णय पहिले झाला समितीने ठपका

ठेवला. त्यानंतर कोर्टात गेले आणि कोर्टाने दोषमुक्त ठरविले, आणि त्यानंतर सिनिअर कौन्सील यांनी त्यांचे मत या ठिकाणी दिलेले आहे की 75 टक्के निलंबनाची पेमेंटची जी रक्कम आहे ते निलंबनाच्या कालावधी मध्ये दयावी. आता त्याला वाढविले पाहिजे हे तर मुळीच नाही. जामगडे यांच्या केस मध्ये असे झाले तर याही केस मध्ये असे झाले पाहिजे हे तर म्हणणे बरोबर नाहीच, परंतु सन्माननिय सदस्य श्री.प्रविणजी दटके यांनी सुचविल्याप्रमाणे माझी आपणाला विनंती आहे की, मा.आयुक्तांना निर्देश दयावे की यामध्ये सिनिअर कौन्सिलर याचे मत जरी 75 टक्के दयावे असे असेल परंतु आपण एकीकडे सर्वसामान्य कर्मचा–यांना वेगळा निर्णय लावत असतांना आणि अधिका–यांना सुध्दा तोच निर्णय लावावा या करीता नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात यावे.

ठराव क्रमांक 182ः– स्थायी समीती पारित ठराव क्र.४३८ दि.३०.०१.२०१८ नुसार मौजा-सिताबर्डी, नगर भुमापन क्र. १६८५, नारंग टॉवर,पाम रोड,सिव्हील लाईन्स,नागपूर येथील पहिल्या मजल्यावरील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची एकूण ६९७.३३५ चौ.मी. बांधकाम क्षेत्र असलेली जागा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांना त्यांचे विभागीय कार्यालयासाठी रु.३,०६,५८४/- प्रति महिना भाडे आकारुन आवश्यक अटी व शर्तीवर प्रथम ११ महिण्यांचे कालावधीकरीता भाडेतत्वावर देण्याकरीता तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांनी आवश्यकतेनुसार विनंती केल्यास पुढील प्रत्येक ११ महिण्यांचे अधिकतम ५ वर्षापेक्षा जास्त असणार नाही अशा कालावधीकरीता मुदतवाढ देण्याचे अधिकार आयुक्त,महानगरपालिका यांना प्रदान करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(C) नुसार मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून भाडेवाढ करीत असतांना दरवर्षी ५% वाढ न करता त्या वेळेच्या रेडीरेकनर नुसार वाढ करण्यांत यावी. या मा. सत्तापक्ष नेता श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यांत येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

प्रमुख अटी व शर्थी :-

१. भाडेधारकाला भाडेविषयक आवश्यक करारनामा करणे बंधनकारक राहील.
२. भाडेधारकाला मासिक भाडयाचा आगावू भरणा दर महिन्याचे ५ तारखेच्या आधी करणे बंधनकारक राहील.
३. पुढील प्रत्येक ११ महिन्यांचे कालाधीकरीता मुदतवाढ देतेवेळी नमूद भाडयात ५% वाढ करण्यात येईल.
४. भाडे कालावधीत निर्धारीत आवश्यक इमारत देखभाल शुल्क (Maintenance charges), विद्युत खर्च इ. चा भरणा करण्याची जबाबदारी भाडेधारकाची राहील.
५. भाडेधारकाला कुठल्याही स्थितीत सदर जागा हस्तांतरीत करता येणार नाही अथवा गहान ठेवता येणार नाही. तसेच पोटभाडेकरु ठेवता येणार नाही.असे आढळल्यास सदर जागेचा भाडेकरार तात्काळ स्वरुपात रद्द करण्यात येईल व जागा ताब्यात घेण्यात येईल.
६. भाडेकरारनाम्यातील अटींव शर्थी भाडेधारकाला बंधनकारक राहतील.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, एन.एच.आय. ला जागा देण्यासंदर्भात मुळीच हरकत नाही त्यामध्ये एकच माझी सूचना आहे 11 महिन्याच्या कालावधी करीता भाडेतत्वावर देण्याकरीता त्यामध्ये 5 परसेंटची वाढ करण्याचे लिहिले जरी असले तरी अनेकदा असे लक्षात येते की रेडीरेकनर बराच वाढत असतो, त्यामुळे एन. एच.आय. आहे म्हणुन 5 परसेंट मध्ये देवुन दयावे असे करण्यापेक्षा दरवर्षी जो रेडीरेकनरचा दर आहे त्यानुसार त्यावर भाडेपट्टे आकारण्यात यावे.

ठराव क्रमांक 183ः– मौजा गाडगा, येथील नगर भुमापन क्र. 318 क्षेत्र 0.65 हेक्टर या डिक दवाखाना परिसरातील जागेवर नागरी सुविधा केंद्र व व्यापारी संकुल असा वापर बदल करण्याची मंजुरी झाल्याने डिक दवाखाना व इतर 5 जुने टिनचे शेड असे एकूण 564.84 चौ.मी. क्षेत्रफळाचे टिन शेडस् तसेच जलप्रदाय विभाग मुख्यालय, धरमपेठ हिंदी प्राथमिक शाळा, ऑरेंज सिटी वॉटरचे कार्यालय, जलप्रदाय विभाग जुना असे 4 सिमेंट कॉंक्रीटचे स्ट्रक्चर्स (एकूण क्षेत्रफळ 1664.50 चौ.मी.) पाडण्याचे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात

घेवून प्रस्तावित वास्तु पाडल्यानंतर निघणारा मलबा व इतर किमती साहित्याची बोली /विक्री निवीदेद्वारे करण्यांत यावे. या मा. सत्त्तापक्ष नेता श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेसह विषय मंजूर करण्यांत येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, विषय क्र 141 मध्ये मध्ये मला प्रशासनाला सूचना करावयाची आहे काही वेळी याचे टेन्डर काढत होतो आपण एखादे बिल्डींग किंवा एखादे सर्वसामान्य घर जरी तोडायचे असेल तर त्यातुन सर्वसामान्य लोकांना रेव्हेन्यु मिळत असतो, परंतु आपल्याकडे अनेकदा हे पाळल्या जात नाही. त्यामुळे हे करीत असतांना बोली लावुन किंवा टेन्डर बोलावुन या नंतरच्या सर्व घटनामध्ये महानगरपालिकेची कुठलेही इमारत किंवा कुठलेही प्रॉपर्टी पाडायची असेल तर बोली लावुन किंवा टेन्डर करुनच हे करण्यात यावे या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यात यावा.

ठराव क्रमांक 184:– प्रभाग क्र. 7 येथे पाचपावली आयुर्वेदिक दवाखाना व समाजभवनच्या मागे NUHMअंतर्गत नवीन दवाखाना इमारत बांधणे प्रस्तावित आहे.

प्रस्तावित दवाखान्याचे बाजुला शिकस्त असलेली टी.बी. दवाखान्याची इमारत बंद असून वापरात नाही. सदर इमारत तोडून प्रस्तावित दवाखान्याची पार्कीगची व्यवस्था सदर जागेवर करता येईल. व नवीन प्रस्तावित दवाखान्याचा नागरिकांना योग्य उपभोग घेता येईल. करीता टी.बी. दवाखान्याची इमारत पाडण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून विषय स्थापत्य व प्रकल्प समितीकडे पाठवून, समितीच्या सहवालासह पुढील सभेत सादर करावा. या मा. सत्त्तापक्ष नेता श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेनुसार विषय स्थापत्य व प्रकल्प समितीकडे पाठविण्यांत येते. याची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

ठराव क्रमांक 185:– विकास योजना – नागपूर (अतिरीक्त क्षेत्र) मौजा – हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या अतिरीक्त क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 अन्वये

- कलम 25 च्या तरतुदीनूसार विद्यमान जमिन वापर नकाशा विहीत कालावधीत सादर न झाल्याने त्यास दि. 20.11.2014 ते दि. 24.09.2015 या कालावधीकरीता मुदतवाढ मिळण्याबाबतचा प्रस्ताव मा. सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पाठविण्याचे मंजुरीस्तव.
- कलम 28(3) च्या तरतुदीनूसार नियोजन समितीचा अहवाल दि. 29.07.2017 पर्यंत सादर होणे आवश्यक होते. या प्रकरणांत नियोजन समितीचा अहवाल दि. 26.12.2017 ला नियोजन प्राधिकरणाकडे प्राप्त झाला असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 28(3) खालील कार्यवाहीस दि. 30.07.2017 ते दि. 26.12.2017 पर्यंतच्या कालावधीसाठीच्या मुदतवाढीस नियोजन प्राधिकरणाची मंजुरी मिळणेस्तव.
- कलम 60 अंतर्गत वाढीव क्षेत्रासाठी तयार करण्यांत येत असलेल्या विकास योजनेतील 611.07 हेक्टर क्षेत्राकरीता नगर रचना परीयोजना तयार करण्याचा इरादा जाहिर करणे तसेच कलम 59 ते 112 अन्वये प्रारूप नगर रचना परियोजना तयार करून मंजुरीकरीता शासनाकडे पाठविण्याबाबत.
- प्रारूप विकास योजना शासनास कलम 30 अन्वये सादर करणे व प्रारूप नगर रचना परियोजना तयार करून मंजुरीकरीता शासनाकडे पाठविण्यास्तव मा. आयुक्त, महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करणे.

संदर्भ:–1) सहाय्यक संचालक, नगर रचना नागपूर तथा नगर रचना अधिकारी, यांचे महानगरपालिका, नागपूर

यांना असलेले पत्र क्र. प्रा.वि.यो/हुडकेश्वर –नरसाळा/कलम 28/अहवाल/ससंनाग/1765, दि. 14.11.2017.

नियोजन समितीचे शासकीय सदस्य यांचे मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना असलेले दि. 11.08.2017 रोजीचे पत्र.

नियोजन समितीचे महानगरपालिका यांचेकडील सदस्य यांचे मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना असलेले दि. 26.12.2017 रोजीचे पत्र.

सहाय्यक संचालक, नगर रचना नागपूर तथा नगर रचना अधिकारी, यांचे महानगरपालिका, नागपूर यांना असलेले पत्र क्र. प्रा.वि.यो/नागपूर(वा.क्षे)/हुडकेश्वर नरसाळा/कलम 28(4) ससंनाग/79, दि. 09.01.2018.

शासन निर्णय क्र. नामपा–2011/प्र.क्र. 1/नवि–26, दि. 14/05/2013 अन्वये मौजे–हुडकेश्वर (बु.) व मौजे – नरसाळा या महसुली गावांचे 972.82 हे. क्षेत्र, नागपूर महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस–2413/405/प्र.क्र. 213/2013/नवि– 9, दि. 14/10/2013 नुसार, उक्त वाढीव क्षेत्राकरीता, नागपूर महानगरपालिका ही नियोजन प्राधिकरण म्हणुन कार्य करेल, असे अधिसुचीत करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या अतिरीक्त क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या कलम 21 ते 30 अंतर्गत नविन विकास योजना तयार करून कलम 30 अंतर्गत मंजुरीकरीता शासनाकडे पाठविण्यास्तव नागपूर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. 234, दि. 20.05.2014 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

मा. सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांनी आदेश क्र. D.P. (Addi area) Nagpur/JDTP/1603, दि. 14.11.2014 अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम – 24 अन्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर यांची नगर रचना अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे व मा. आयुक्त, म.न.पा. नागपूर यांनी पत्र क्र. मनपा/नरवि/1409, दि. 03.12.2014 अन्वये ''नगर रचना अधिकारी'' यांचे नियुक्तीस मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिके व्दारा नियुक्त मे. मोनार्च सर्व्हेअर्स अॅड इंजिनिअरींग कन्सल्टंट्स प्रा.लि. यांनी तयार केलेला प्रारूप विकास योजना आराखडा सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर तथा नगर रचना अधिकारी यांनी दि. 02.09.2016 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस सादर केलेला आहे.

त्याअनुषंगाने मनपा साधारण सभेतील ठराव क्र. 337, दि. 06.10.2016 अन्वये प्रारूप विकास योजना आराखडयास मंजुरी प्राप्त असून मौजा –हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या अतिरीक्त क्षेत्राचा प्रारूप विकास योजना आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 (1) अन्वये शासन राजपत्रात दि. 28. 11.2016 ला प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर व दोन स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात दि. 29.11.2016 ला प्रसिध्द झालेला आहे.

करीता,

नागपूर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. 234, दि. 20.05.2014 अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ठ करण्यात आलेल्या मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या अतिरीक्त क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा ईरादा जाहिर केला. नियोजन प्राधिकरणाकडून ईरादा जाहीर झाल्यानंतर ईरादा घोषित केल्याच्या

दिनांकापासून सहा महिन्यापेक्षा अधिक नसेल अशा वेळी म्हणजेच दि. 19.11.2014 पर्यंत विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करून त्यांत त्यातील जमीनीचा विद्यमान वापर दर्शविणे आवश्यक होते. तथापी विद्यमान जमीन वापर नकाशा दि. 24.09.2015 रोजी नियुक्त नगर रचना अधिकारी यांचेकडून नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत झालेला असल्याने या प्रकरणी दि. 20.11.2014 ते 19.05.2015 पर्यंत प्रथम मुदतवाढ व दि. 20.05.2015 ते 24.09.2015 पर्यंत दुसरी मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव मा. सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पाठविण्याचे मंजुरीस्तव.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 23 अन्वये नियोजन प्राधिकरणाने सर्वसाधारण सभेमध्ये दि. 20.05.2014 रोजी ईरादा जाहिर केल्यानंतर उक्त ईरादा शासन राजपत्रात दि. 19.04.2015 रोजी प्रसिध्द झालेला आहे. कलम 23 अन्वये शासन राजपत्रात नोटीस प्रसिध्द केल्याचे दिनांकापासून दोन वर्षापेक्षा अधिक नसेल अश्या मुदतीत म्हणजेच दि. 18.04.2017 पर्यंत प्रारूप विकास योजनेचा आराखडा प्रसिध्द करणे आवश्यक आहे. या प्रकरणी कलम 26 चे प्रसिध्दीकरण दि. 28.11.2016 रोजीचे शासन राजपत्रात प्रसिध्द झालेले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 28(2) अन्वये शासनाने शासकीय तज्ञ नियोजन समिती दि. 26.04.2017 रोजी व नियोजन प्राधिकरणाचे स्थायी समितीमधील सदस्यांची नियोजन समिती दि. 30.05.2017 रोजी गठीत केलेली आहे. कलम 28(3) नुसार नियोजन समितीने तिच्या नेमणुकीच्या दिनांकापासून दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अश्या कालावधीत म्हणजेच दि. 29.07.2017 पर्यंत नियोजन प्राधिकरणास प्रारूप विकास योजना प्रसीध्दीवरील प्राप्त आक्षेप/सुचनावरील अहवाल सादर करणे आवश्यक होते. या प्रकरणांत दि. 28.06.2017 व दि. 29.06.2017 रोजी प्रारूप विकास योजनेच्या प्राप्त आक्षेपांवर सुनावणी झालेली आहे व त्यानुसार शासकीय तज्ञ समितीने दि. 11.08.2017 रोजी व नियोजन प्राधिकरणाचे स्थायी समिती नियोजन समितीच्या सदस्यांनी दि. 26.12.2017 रोजी अहवाल नियोजन प्राधिकरणाकडे सादर केलेला असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 28(3) खालील कार्यवाहीस दि. 30.07.2017 ते 26.12.2017 पर्यंतच्या कालावधीसाठीच्या मुदतवाढीस नियोजन प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत, तसेच कलम 28(4) अन्वये नियोजन प्राधिकरणाकडे सादर नियोजन समितीच्या अहवालावर अंतिम निर्णय घेऊन मंजुरी प्रदान करणे.

तसेच, नागपूर महानगरपालिकेत नव्याने अंतर्भुत करण्यात आलेल्या मौजा – हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या वाढीव क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप विकास योजनेतील 611.07 हेक्टर क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 59 ते 112 अन्वये प्रारूप नगर रचना परियोजना तयार करून मंजुरीकरीता शासनाकडे पाठविणे, यास्तव तयार करण्यात आलेल्या प्रारूप विकास योजनेतील 611.07 हेक्टर क्षेत्राकरीता अधिनियमाच्या कलम 60 अंतर्गत नगर रचना परियोजना तयार करण्याचा ईरादा जाहिर करून वर्तमानपत्रे व महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द् करणे यास्तव प्रस्तावास मंजुरीबाबत.

प्रारूप विकास योजना शासनास कलम 30 अन्वये मंजुरीस्तव सादर करणे व प्रारूप नगर रचना परियोजना तयार करून मंजुरीकरीता शासनाकडे पाठविण्यास्तव संपुर्ण कार्यवाहीसाठी मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना अधिकार प्रदान करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून हुडकेश्वर–नरसाळा क्षेत्रातील नागरिकांना शुध्द पिण्याचे पाण्याचा पुरवठा लवकर करण्याचे दृष्टीने मौजा हुडकेश्वर(बु)व मौजा नरसाळा येथे उंचीवरील जलकुंभाचे बांधकाम उभारण्याची कार्यवाही मनपातर्फे सुरू आहे. तसेच सहा.संचालक, नगररचना

विभागामार्फत हुडकेश्वर–नरसाळा करीता ड्राप्ट डेव्हलमेंट प्लानला अंतीम स्वरूप देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. करीता सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उंचीवरील जलकुंभाकरीता खालीलप्रमाणे नमुद जागा आरक्षित करणे गरजेचे आहे.

| अनु क्र. | मौजा | सर्व्हे न. | आरक्षित करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| 1 | हुडकेश्वर (बु) संत ताजेश्वर नगर | 37 | संत ताजेश्वर नगर येथील मोकळया जागेच्या पश्चिम भागात मोकळया जागेवर |
| 2 | हुडकेश्वर (बु) | 38 | चंद्रभागानगर येथील मोकळया जागेवर(समाज मंदीरच्या बाजूला) |
| 3 | नरसाळा | 1 2 3 (अ,ब,ड) | भारतमाता, चिमोटे लेआऊट, नरसाळा येथील मोकळया जागेवर |
| 4 | नरसाळा | 153 | संभाजी नगर येथील मोकळया जागेवर |
| 5 | हुडकेश्वर (बु) | 51 | सवरबांधे लेआऊट, मोकळया जागेवर |

सबब हुडकेश्वर–नरसाळा क्षेत्रातील वरील खुल्या जागा या सार्वजनिक उपयोगाच्या वापराकरीता उंचीवरील जलकुंभ उभारण्यासाठी आरक्षित करण्याचा विषय मनपा सभेपुढे विषय क्र. 143 ला वरील सूचना जोडून मंजूर करण्यात यावी. या मा.सदस्या सौ. स्वाती चंद्रकांत आखतकर व सौ. विद्या योगेश मडावी यांनी सादर केलेल्या सुचना तसेच म.न.पा.ने गठीत केलेल्या समितीने सुचविलेल्या बदलासह विषय मंजूर करण्यांत यावा. या मा. सत्त्तापक्ष नेता श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेसह विषय मंजूर करण्यांत येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.भगवानजी मेंढे :– मा.महापौरजी, विषय क्र 143 मध्ये माझी एक सूचना होती. नरसाळा हुडकेश्वरचा जो डि.पी. प्लॅन बनलेला आहे. नरसाळा हे एक जुने गाव आहे तेथे लोक वस्ती बनली आहे. त्या लोकवस्तीमधुन 80 फुटाचा रस्ता दाखविला आहे. 80 फुटाचा रस्ता केल्यावर ते पुर्ण नरसाळा गाव हे उध्वस्त होईल, त्या करीता माझी सूचना होती त्या बाजुला एक लेआउट आहे चिमुरकर लेआउट म्हणुन तेथुन तो रस्ता वळविण्यात यावा अशी माझी सूचना आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जी सूचना केली आहे ती योग्य आहे. त्या सूचनेसह हा विषय मंजूर करावा.

श्रीमती.स्वाती आखतकर :– मा.महापौरजी, मला सुध्दा विकास आराखडाच्या संबंधी सूचना द्यावयाची आहे. मा.महापौरजी, हा विकास आराखडा गुगल इंटरनेटनी तयार केलेला आहे. मोठ–मोठे रस्ते विकास आराखडयामध्ये दर्शविलेले आहे. आताच माझ्या सहयोगींनी सांगितल्याप्रमाणे अनेक रस्त्याबाबत सुध्दा तसे झालेले आहे. माझी एक सूचना आहे. नागरिकांच्या सुख सुविधेसाठी नरसाळा हुडकेश्वर या भागामध्ये अनेक विकासाची कामे चालु आहे. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम असो, स्मशान घाटाचे बांधकाम असो, बगीचे असो, या ज्या जागा आहे या जागेवर बांधकाम सुरु आहे. या जागा त्याच कामासाठी आरक्षीत करण्यात याव्यात अशी माझी सुचना आहे.

ठराव क्रमांक 186:— नागपूर म.न.पा. च्या लाड—पागे शिफारसी नुसार सफाई कामगार पदोन्नत होवून जमादार/हवलदार या पदावर पदोन्नत झाल्यानंतर नागपूर म.न.पा. च्या पदस्थापनेत जमादार/हवलदार यांचे (वेतन श्रेणी ५२००—२०२०० ग्रेड १९००) असून हे पद वर्ग—३ मध्ये गणल्या जात होते. परंतु राज्य शासनाचे दि. ०७/०६/२०१७ च्या अधी सुचनेनुसार उक्त पद चतुर्थ श्रेणीतच येते. हे पद वर्ग—४ मध्ये आणण्यासाठी या पदाची (वेतन श्रेणी ४४४०—७४४० ग्रेड पे १३००—१८००) सुधारणा करण्यासाठी तसेच हे पद वर्ग—४ मध्ये केल्यानंतर त्यांच्या वारसांना लाड कमेटीचा लाभ मिळण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून हा विषय अति. उप निगम आयुक्त श्री. दांडेगावकर यांचेकडून संपुर्ण चौकशी करून, तसेच श्री. दांडेगावकर यांनी संबंधित जमादार व हवालदार यांचेशी चर्चा करून व स्थापना विभागाचेही अभिमत घेवून अंतिम निर्णयासह विषय पुढील सभेत सादर करावा या मा. सत्त्तापक्ष नेता श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेनुसार विषय अति. उपनिगम आयुक्त श्री. दांडेगावकर यांचेकडे पाठविण्यांत येतो. याची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

श्री.मोहम्मद जमालः— मा.महापौरजी, विषय क्र 144 के अंदर जो लाड—पागे समिती का उल्लेख किया गया है, इसके अंतर्गत लगभग 119 लोगो को प्रमोशन दिया गया था। उसमेसे 49 लोगों को मलवाहक जमादार करके प्रमोट कर दिया था। उसी तरीकेसे 70 लोगो को एम.एस.डब्लु. मे प्रमोट कर दिया था। 49 मलवाहक जमादार के ऑर्डर निकले थे उसमे से लगभग 30 लोगो ने इसे स्वीकृत किया था। बाकी 19 लोगो ने यह ऑर्डर लेने मे इनकार कर दिया था। वह 19 लोगों को लाड—पागे समितीकी सुविधा चाहियें थी इसलिये उन लोगों ने ऑर्डर को स्वीकार नही किया। जिन 30 लोगो ने ऑर्डर को स्वीकार किया है, आज उनके उपर यह अन्याय क्यौ की उनको उठाकर आप ग्रेड 3 से ग्रेड 4 मे डाल देंगें। इसलिये मेरी सूचना है मा.महापौरजी, मेरी सूचना है इस विषय को लेकर की 70 लोगों को भी एम.एस.डब्लु मे पदोन्नती दि गयी है। यहापर सिर्फ लाड पागे समिती का फायदा इनके परिवार को दिया जायें इसलिये इनको दोबारा ग्रेड 4 मे डाला जाये। मै चाहुँगा की इस विषय को लेकर एक समिती बनायी जायें। और जिन लोगों ने प्रमोशन लिया है उनकी एक बार राय लिजायें क्या वह लोग अपने परिवार के साथ मे लाड पागे समिती का लाभ आगे लेना चाहते है क्या। अगर उन लोगों को लाड पागे समिती का लाभ नही चाहिये तो उनका डिमोशन करने की कोई तात्पर्य नही है। मा.महापौरजी, मै चाहुंगा आप इस विषयपर गंभीरता पुर्वक ले और एक समिती का गठन किया जायें।

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, या विषयावर ज्यांना लाड पागे समितीचा लाभ नको आहे आणि काही लोकांच्या तक्रारी आलेल्या आहे. याच्यामध्ये उपायुक्त लेव्हलला एक समिती तयार करुन त्यांच्या मार्फत त्यांचे हेअरिंग घ्यावे त्याच्यामध्ये त्यांचे मत त्यांनी ऐकुन घ्यावे अशी माझी सूचना आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, काही कर्मचारी मला सभागृहाच्या बाहेर भेटले त्यांचे शिक्षण चांगले झालेले आहे आणि काही लोकांना असे वाटते की आमच्या वारसदारांना पुन्हा सफाई कामे आम्हाला दयायचे नाही. आणि आमचे वारसदार कुणी डॉक्टर झाले, कुणी इंजिनिअर झाले, कोणी खाजगी कंपनीमध्ये चांगल्या कामावर आहे. आम्हाला लाड पागे समितीच्या शिफारशींची आम्हाला आवश्यकता नाही. त्यामुळे आम्हाला पदावनत करु नका, आम्ही ज्या पदावर आहोत श्रेणी 3 मध्ये तिथे ठेवा मात्र ज्या लोकांना असे वाटते की आपल्यानंतर आपल्या मुलांनी सुध्दा सफाई कामगारांचे काम करावे त्याच्यासाठी हा निर्णय लागु राहील, मात्र ज्याला वाटते की मला गरज नाही त्याला श्रेणी 3 मध्येच राहु दया, या सूचनेसह हा विषय मंजूर करावा.

श्री.प्रविण दटके :'— मा.महापौरजी, विषय असा आहे की ज्याला लाड पागे समितीचा ज्याला फायदा पाहिजे तो त्याला मिळणार परंतु मुळ मुद्या असा आहे की पॉलिसी कुठल्या तरी एका निर्णयावर पाहिजे. मी मलवाहक जमादार तर मी कर्मचारी म्हणुन काम करेल, मला सफाई कर्मचारी म्हणुन कामही करायचे नाही, मला मलवाहक जमदार ही व्हायचे आहे, मला लाड पागे समितीचा फायदा ही पाहिजे आहे. एका बाजूला हा मुद्या आहे. आणि एका बाजूला हा मुद्या आहे की मी निट शिकलो आहे. माझा मुलगा बिलकुल सफाई करणार नाही तो इंजिनिअर आहे तो चांगल्याच पदावर राहील याच्यानंतर मी कुठलाही फायदा घेणार नाही, हा एक विचार आहे म्हणुन माझी एक विनंती आहे की जे क्लास 4 मधुन क्लास 3 मध्ये जाणारे असतील त्यांना

कुठलाही फायदा मिळणार नाही. जे क्लास 4 मध्ये राहतील त्याला सर्व फायदे मिळतील अशी पॉलिसी आहे आणि हीच पॉलिसी असली पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, मी या ठिकाणी सूचना करु इच्छितो की पॉलिसी अशीच आहे मात्र सर्वच्या सर्व 19 लोकांना रिवर्ड करीत आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, माझा मुळ मुद्या असा आहे की हे जे 19 लोक आहे त्यांना मलवाहक जमादार हवे आहे आणि त्याला जर लाड समितीची कुठलेही शिफारसची गरज नाही.

श्री.सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, पिछली बार जब लाड पागे कमेटीके माध्यम से सफाई मजदुरोकों परमनंट किया गया उस समय कुछ  लोगों को डायरेक्ट जमादार करके भी अपॉइंटमेंट कर दिया गया और देखा जाये तो यह जो प्रस्ताव है यह विभाग की और से आया है उसमे जो क्लास 4 से क्लास 3 मे जो प्रचलित नियम है उसके बारें मे यहापर निर्णय नही लिया गया है। मेरा इसपर सुझाव है की उपायुक्त स्तर की कमेटी बनाकर एक महिने के अंदर इसपर निर्णय लिया जायें।

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी,  या विषयासंदर्भात अति.उपायुक्त दर्जाचे श्री.दांडेगावकर हा विभाग सांभाळत आहे त्यांनी संपूर्ण या विषयाचा अभ्यास करुन आणि ओ.ॲन्ड.एम. ला सोबत घेवुन गरज पडल्यास या सर्वांना हेअरिंग देवुन पुढच्या वेळला सभागृहाच्या पटलावर हा विषय ठेवण्यात यावा.

ठराव क्रमांक 187:– नागपूर महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण विषय हाताळण्याकरीता अतिरिक्त आयुक्त स्तराचे कार्यरत किंवा सेवानिवृत्त अधिकाऱ्याची एन.इ.एस.एल. च्या Board वर डायरेक्टर म्हणून नियुक्ती करण्याचा तसेच महानगरपालिकेच्या महासभेपुढे मंजूरी करीता व नंतर शासनाकडे पाठविण्याबाबतचा खालील प्रमाणे प्रश्न सभागृहाने विचारात घेवून नागपूर महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण विषय हाताळण्याकरिता अतिरीक्त आयुक्त स्तराचे कार्यरत किंवा सेवानिवृत्त अधिका–याची एन.इ.एस.एल.च्या Board वर डायरेक्टर म्हणून नियुक्ती करतांना अतिरीक्त आयुक्त हे नागपूर महानगरपालिकेचेच अधिकारी असावे या मा. सत्तापक्ष नेते श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

“RESOLVED THAT in terms of Government of Maharashtra resolution bearing no. NMC 2009/C.No.125/Navi 16 dated 31st Day of August 2009, BOD has accorded its approval to take up various projects which are exclusively pertaining to conservation of environment being implemented by NMC at present for Monitoring, and to authorise NESL to monitor such projects.”

“RESOLVED FURTHER THAT BOD has authorized ED NESL to request general body of NMC to pass necessary resolution and to apply GOM to carry out necessary amendments in the Government of Maharashtra resolution bearing no. NMC 2009/C.No.125/Navi 16 dated 31st Day of August 2009.”

“RESOLVED FURTHER THAT BOD has accorded its approval to appoint the officer equivalent to the rank of Additional Commissioner, NMC, retired or in Service on the Board of NESL as Director, who shall be responsible for successful, timely and better execution of such various projects.”

“RESOLVED FURTHER THAT CS Parag Dasarwar (CP: 8227) Company Secretary in practice be and is hereby authorized to file necessary eform with the Registrar of Companies, Mumbai and to do all the needful in order to give effect to the resolution.”

ठराव कमांक 188 :– नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. विशेष सभा दिनांक 30.12.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त

ठराव कमांक 189 :– नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. स्थापत्य विद्युत व प्रकल्प विशेष समिती.
    1. सोमवार दि. 15.01.2018 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त
    2. बुधवार दि. 31.01.2018 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त
2. वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती
    1. गुरुवार दि. 11.01.2018 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
3. विधी विशेष समिती
    1. मंगळवार दि. 23.01.2018 दुपारी 04.00 वाजता चे कार्यवृत्त
4. शिक्षण समिती
    1. शुक्रवार दि. 05.01.2018 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
5. गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बोधणी विशेष समिती
    1. बुधवार दि. 10.01.2018 दुपारी 03.30 वाजता चे कार्यवृत्त
6. महिला बाल कल्याण विशेष समिती
    1. सोमवार दि. 08.01.2018 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

महापौर
नागपूर महानगरपालिका,नागपूर